सोलापूर तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | रविवार, दि. ५ जुलै २०२६ | वर्ष – ४ थे | अंक ८२ | पाने : ८ | किंमत रु. ६/– | dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# संरक्षण दलांना मिळणार ५२ हजार कोटींचे बळ; अत्याधुनिक शस्त्रास्त्रे, क्षेपणास्त्र खरेदीला मंजुरी

वृत्तसंस्था

नवी दिल्ली : संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या संरक्षण खरेदी परिषदेच्या बैठकीत सुमारे ५२ हजार कोटी रुपयांच्या संरक्षण खरेदी योजनांना तत्त्वतः मंजुरी देण्यात आली आहे. या योजनेंतर्गत लष्कर, नौदल आणि हवाई दलाला अत्याधुनिक शस्त्रे, क्षेपणास्त्रे, अँटी-ड्रोन प्रणाली, हवाई संरक्षण प्रणाली आणि पाळत ठेवणारी उपकरणे उपलब्ध करून दिली जातील. यामुळे देशाची युद्धसज्जता आणि सुरक्षा क्षमता पूर्वीपेक्षा अधिक बळकट होणार आहे.लष्करासाठी 'आकाश तरंग' ही अँटी-ड्रोन इलेक्ट्रॉनिक प्रणाली, खांद्यावरून डागता येणारी रणगाडाविरोधी क्षेपणास्त्र प्रणाली मध्यम पल्ल्याची हवाई संरक्षण क्षेपणास्त्र प्रणाली अतिशय कमी पल्ल्याची हवाई संरक्षण प्रणाली रणगाड्यांसाठी सुरक्षा प्रणाली आणि जेटआधारित कामिकेज (आत्मघाती) ड्रोन प्रणालीच्या खरेदीला मंजुरी देण्यात आली आहे. 'आकाश तरंग' सैन्याच्या तुकड्यांना शत्रूच्या ड्रोन हल्ल्यापासून प्रभावी संरक्षण देईल. खांद्यावरून डागता येणारे अँटी-टँक क्षेपणास्त्र शत्रूचे रणगाडे आणि चिलखती वाहने नष्ट करण्यास मदत करेल. तर, मध्यम पल्ल्याची हवाई संरक्षण क्षेपणास्त्र प्रणाली शत्रूचे हवाई धोके वेळेवर रोखण्यास सक्षम असेल. अतिशय कमी पल्ल्याची हवाई संरक्षण प्रणाली अनेक अडथळ्यांमध्येही प्रभावीपणे काम करेल. रणगाड्यांसाठीची नवीन 'ॲक्टिव्ह प्रोटेक्शन सिस्टीम' त्यांना शत्रूच्या हल्ल्यापासून वाचविण्यास आणि युद्धभूमीवर टिकून राहण्याची क्षमता वाढविण्यास मदत करेल. जेटआधारित कामिकेज ड्रोन प्रणाली कमी खर्चात अधिक मारक क्षमता प्रदान करेल. सुमारे ५२ हजार कोटी रुपयांच्या या संरक्षण खरेदी योजनांचा मुख्य उद्देश तिन्ही दलांना आधुनिक तंत्रज्ञान आणि स्वदेशी संरक्षण प्रणालींनी सुसज्ज करणे हा आहे. या अत्याधुनिक प्रणालींच्या समावेशामुळे भारताची राष्ट्रीय सुरक्षा, सीमेचे रक्षण आणि कोणत्याही आव्हानाचे खंबीरपणे सामना करण्याची क्षमता पूर्वीपेक्षा अधिक मजबूत होईल, असा सरकारला विश्र्वास आहे.






# राज्यात पुढील ४८ तास अतिवृष्टीचा इशारा



तभा वृत्तसेवा

पुणे : राज्यात गेल्या ४८ तासापासून संततधार पाऊस सुरू असून पुन्हा आगामी ४८ तास अतिवृष्टी होणार असल्याचा इशारा इन्सॅट थ्री डी आर या उपग्रहाने काढलेल्या छायाचित्राद्वारे हवामान खात्याने दिला आहे.

पुढील ४८ तास महाराष्ट्रात मान्सून सक्रिय राहणार असून कोकण, घाटमाथा, विदर्भ आणि मराठवाड्याच्या काही भागांत जोरदार पावसाचा अंदाज आहे.भारतात नैऋत्य मान्सून सक्रिय अवस्थेत आहे. मध्य भारत, पश्र्चिम किनारपट्टी, गुजरात, मध्य प्रदेश आणि महाराष्ट्रावर दाट ढग दिसत आहेत. बंगालच्या उपसागरातून मोठ्या प्रमाणात आर्द्रता येत असून पश्र्चिम किनारपट्टीवर ऑफ-शोअर ट्रफ सक्रिय आहे. त्यामुळे पुढील ४८ तासांत महाराष्ट्रातील अनेक भागांत जोरदार पावसाची शक्यता आहे.

## पावसाने जनजीवन विस्कळीत

मुंबई : मुंबईत गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसाने जनजीवन विस्कळीत झाले आहे. मुंबई, ठाणे, कल्याण, रायगड आणि पालघर या भागांमध्ये पावसाचा जोर कायम असून, कल्याणजवळील आडीवली-ढोकळी परिसर सर्वाधिक प्रभावित झाला आहे. सततच्या पावसामुळे संपूर्ण परिसर जलमय झाला असून, रस्ते, सोसायट्या आणि घरांमध्ये पाणी शिरल्याने नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.सलग कोसळणाऱ्या पावसामुळे परिसरातील अनेक सोसायट्या, चाळी आणि अंतर्गत रस्त्यांवर गुडघाभर पाणी साचले आहे. तळमजल्यावरील घरांमध्ये पाणी घुसल्याने फर्निचर, इलेक्ट्रॉनिक वस्तू आणि इतर घरगुती साहित्याचे मोठे नुकसान झाले आहे. अनेक कुटुंबांना रातोरात आपले सामान सुरक्षित ठिकाणी हलवावे लागले.


## टेलिग्रामला नोटीस

नवी दिल्ली : टेलिग्राम प्लॅटफॉर्मवर चित्रपट आणि ओटीटी वरील वेब सीरिज अनधिकृतपणे लीक केल्या जात असल्याच्या तक्रारींनंतर, केंद्र सरकारने टेलिग्रामला नोटीस बजावली आहे. माहिती आणि प्रसारण मंत्रालयाने टेलिग्रामला बेकायदेशीर चॅनेल्स आणि ग्रुप्सवर त्वरित कठोर कारवाई करण्याचे आणि केलेल्या कारवाईचा सविस्तर अहवाल १५ दिवसांच्या आत सादर करण्याचे निर्देश दिले आहेत.चित्रपटगृहात किंवा ओटीटी प्लॅटफॉर्मवर कोणताही नवा चित्रपट किंवा वेब सीरिज रिलीज झाल्यानंतर अवघ्या काही तासांतच त्याच्या अनधिकृतपणे लिंक्स टेलिग्रामवर उपलब्ध होतात. यामुळे मनोरंजन क्षेत्राचे कोट्यवधी रुपयांचे नुकसान होत असून, चित्रपट निर्माते, वितरक आणि डिजिटल प्लॅटफॉर्म्सनी याविरोधात आक्रमक भूमिका घेतली होती. भारताच्या या 'क्रिएटर इकॉनॉमी'चे रक्षण करण्यासाठी आणि चित्रपट सृष्टीतील भागधारकांचे हित जपण्यासाठी सरकारने हे कडक पाऊल उचलले आहे. टेलिग्रामने पायरसी रोखण्यासाठी आपल्या यंत्रणेत तातडीने सुधारणा करावी, असे निर्देश या नोटीसमध्ये देण्यात आले आहेत.

# दोन महिन्यांतच मिसिंग लिंकवर खड्डे !

तभा वृत्तसेवा

मुंबई : मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावरील प्रवासाचा कालावधी अर्ध्या तासाने कमी करणाऱ्या मिसिंग लिंक रस्त्यावर खड्डे दिसू लागल्याने चिंता व्यक्त होत आहे. ७ हजार कोटी खर्चून एमएसआरडीसीने या मार्गाची बांधणी केली. दोनच महिन्यांपूर्वी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते या पुलाचे लोकार्पण झाले होते.मुंबई-पुणे द्रुतगती महामार्ग हा एकूण ९४.५ किमी लांबीचा रस्ता आहे. द्रुतगती महामार्ग आणि राष्ट्रीय महामार्ग ४ हे दोन्ही रस्ते खालापूर टोल प्लाझा येथे एकत्र येतात आणि खंडाळा एक्झिट येथे वेगळे होतात. या भागात दरड कोसळण्याचे प्रमाण जास्त आहे. तसेच वाहतूक कोंडीही होते. त्यामुळे द्रुतगती मार्गावरील खोपोली एक्झिट ते सिंहगड इन्स्टिट्युट या भागात १३ किमीचा मिसिंग लिंक उभारण्याचे एमएसआरडीसीने केले आहे. या प्रकल्पाचे काम २०१९ साली सुरू करण्यात आले होते. अनेकदा मुदतवाढ दिल्यानंतर अखेर यावर्षी काम पूर्ण झाले.मुख्यमंत्र्यांनी त्याचे कनेक्टिंग लिंक असे नामकरण केले. मात्र पहिल्याच पावसाळ्यात या रस्त्यावर खड्डे पडले. घाट भागात सर्वाधिक पाऊस असल्याने रस्त्यावर खड्डे पडले; मात्र ते लगेचच बुजवण्यात आल्याचे एमएसआरडीसीकडून सांगण्यात आले.



# पेट्रोलनंतर डिझेलचा नंबर; आयसोब्युटेनॉल ब्लेंडिंगची तयारी सुरू; गडकरींची मोठी घोषणा

तभा वृत्तसेवा

मुंबई : पेट्रोलमध्ये इथेनॉल मिसळल्यानं अनेक वाहनांची अवस्था बिकट झाली आहे. इथेनॉल मिसळूनही पेट्रोलचे दर कमी होत नाहीत. त्याउलट वाहनाचा मायलेज मात्र कमी होत आहे. सोबतच वाहनं वारंवार नादुरुस्त होत आहेत. पेट्रोलमधील इथेनॉल मिश्रणानं कोट्यवधी ग्राहक मेटाकुटीला आलेले असताना आता डिझेलमध्ये १५ टक्क्यांपर्यंत आयसोब्युटेनॉल मिसळण्याची योजना तयार करण्यात आली आहे. जीवाश्म इंधनावरील अवलंबित्व कमी करण्यासाठी केंद्र सरकारनं हे पाऊल उचललं आहे. केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी याबद्दलची माहिती दिली आहे.

सरकारच्या पर्यायी इंधन धोरणाची माहिती केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी दिली. 'इथेनॉल थेट डिझेलमध्ये मिसळू शकत नाही. त्यामुळे इथेनॉलपासून आयसोब्युटेनॉल तयार करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. हा एक उत्तम पर्याय ठरू शकतो,' असं गडकरी म्हणाले. 'इथेनॉल थेट डिझेलमध्ये मिसळता येत नाही. त्यामुळे आम्ही आयसोब्युटेनॉल तयार करत आहोत. आयसोब्युटेनॉल डिझेलला पर्याय ठरू शकतो,' असं गडकरींनी सांगितलं.

डिझेलमध्ये १५ टक्के आयसोब्युटेनॉल मिसळण्यास परवानगी देण्याच्या दिशेनं काम करत आहे. यामुळे ऊर्जा क्षेत्रात देश आत्मनिर्भर होईल. स्वच्छ ऊर्जेच्या दिशेनं हे महत्त्वाचं पाऊल असल्याचं गडकरी म्हणाले. पायलट डेमोन्स्ट्रेशनमधून समोर आलेले निष्कर्ष उत्साह वाढवणारे आहेत. आम्ही १०० टक्के इथेनॉल आणि आयसोब्युटेनॉलवर दोन जनरेटर यशस्वीपणे चालवले. या इंधनांवर चालणारे इंजिन तयार केले जाऊ शकतात, ही बाब यातून सिद्ध झाली आहे.

आयसोब्युटेनॉल मिश्रणामुळे भारताची खजिन तेल आयात कमी होईल. त्यामुळे आयातीवर होणारा खर्च घटेल. परकीय चलन वाचेल, असं अधिकाऱ्यांना वाटतं.

पेट्रोलमध्ये होत असलेल्या इथेनॉल मिश्रणामुळे वाहनांचा मायलेज घटल्याच्या तक्रारी देशभरातून येत आहेत. पेट्रोलमध्ये होणाऱ्या इथेनॉल मिश्रणामुळे वाहनं वारंवार नादुरुस्त होत आहेत. त्यामुळे कार चालकांना आर्थिक भुर्दंड आणि मनस्ताप भोगावा लागत आहे. यानंतर आता डिझेलमध्ये आयसोब्युटेनॉल मिसळण्याचा निर्णय सरकारनं घेतला आहे.





## २३ संशयित 'आतंकवादी' घोषित

नवी दिल्ली : देशविरोधी कारवायांवर आणखी कठोर भूमिका घेत केंद्र सरकारने मोठी कारवाई केली आहे. बेकायदेशीर कारवाया प्रतिबंधक कायद्या अंतर्गत २३ संशयित व्यक्तींना अधिकृतपणे 'दहशतवादी' घोषित करण्यात आले आहे.हे सर्वजण पाकिस्तानस्थित लष्कर-ए-तैयबा , जैश-ए-मोहम्मद आणि इतर दहशतवादी संघटनांशी संबंधित असल्याचा आरोप आहे. गृह मंत्रालयाने याबाबत राजपत्र अधिसूचना जारी केली असून, या सर्वांची नावेच्या चौथ्या अनुसूचीमध्ये समाविष्ट करण्यात आली आहेत. सरकारच्या माहितीनुसार, या व्यक्ती जम्मू-काश्मीरमध्ये दहशतवादी कारवाया घडवून आणणे, तरुणांची भरती करणे, शस्त्रांची तस्करी करणे आणि दहशतवादी कारवायांना आर्थिक मदत पुरवणे अशा कामांमध्ये सक्रिय होते. सध्या यातील बहुतांश जण पाकिस्तान किंवा पाकिस्तानव्याप्त काश्मीर मध्ये वास्तव्यास असल्याचे सांगण्यात आले आहे.

# हवामान विभागाचे अलर्ट पाहूनच घराबाहेर पडा!

## मुख्यमंत्र्यांचे नागरिकांना आवाहन; कनेक्टिंग लिंकवरील खड्ड्यांच्या आरोपांना सडेतोड उत्तर

तभा वृत्तसेवा

मुंबई : राज्यात मुंबई महानगर प्रदेशासह (एमएमआर) ठाणे, रायगड, पालघर, पुणे, नाशिक आणि इतर भागात ६ जुलैपर्यंत अतिशय मुसळधार पाऊस आणि वादळाचा इशारा देण्यात आला आहे. सरासरीपेक्षा कितीतरी जास्त पाऊस होण्याची शक्यता असल्याने, नागरिकांनी हवामान विभागाचे 'अलर्ट' पाहूनच घराबाहेर पडावे आणि शक्यतो प्रवास टाळावा, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले आहे. मुंबईतील यशवंतराव चव्हाण सेंटर येथे माध्यमांशी संवाद साधताना ते बोलत होते.



पावसाची भीषणता लक्षात घेऊन अनेक ठिकाणी शाळांना सुट्टी देण्यात आली असून, राज्य सरकारकडून नागरिकांना दर तीन तासांनी मोबाईलवर एसएमएसद्वारे अलर्ट पाठवले जात असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. आपत्ती व्यवस्थापनाच्या सज्जतेबाबत माहिती देताना मुख्यमंत्री म्हणाले, एनडीआरएफ, एसडीआरएफ आणि आपत्ती व्यवस्थापन कक्ष प्रत्येक परिस्थितीवर बारीक नजर ठेवून आहेत. ज्या ज्या ठिकाणी अडचणी निर्माण होत आहेत, त्या तात्काळ दूर करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. अपघात टाळण्यासाठी आम्ही सातत्याने सूचना देत आहोत, लोकांनी या अलर्ट्सचे तंतोतंत पालन करावे.कनेक्टिंग लिंकवर पडलेल्या खड्ड्यांच्या मुद्द्यावरून विरोधक आणि समाजमाध्यमांवरून होणाऱ्या टीकेचा मुख्यमंत्र्यांनी चांगलाच समाचार घेतला. कनेक्टिंग लिंकवर जिथे कनेक्टर आहे, तिथे केवळ दोन खड्डे पडले आहेत. मात्र, पूर्ण कनेक्टिंग लिंकवरच खड्डे पडल्याचा डांगोरा पिटणे चुकीचे आहे. काही लोकांना प्रत्येक गोष्टीचा बाऊ करण्यातच आनंद मिळतो, असा टोला त्यांनी लगावला. कुठलेही मोठे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर पहिल्या पावसात त्याची 'ड्युरॅबिलिटी टेस्ट' (टिकाऊपणाची चाचणी) होत असते. नवीन उड्डाणपुलावर जेव्हा 'मॅस्टिक डांबर' टाकले जाते, तेव्हा ते सुरुवातीला एका जागी जमा होते आणि नंतर सेटल होते. या इंजिनिअरिंगच्या गोष्टी आहेत. तथापि, 'निंदकाचे घर असावे शेजारी' या उक्तीप्रमाणे जर काही कमतरता समोर आणल्या असतील, तर एमएसआरडीसी योग्य काळजी घेऊन त्या नक्कीच रेक्टिफाय (दुरूस्त) करेल, असे मुख्यमंत्री म्हणाले. नकारात्मक राजकारण करणाऱ्यांवर निशाणा साधत मुख्यमंत्री पुढे म्हणाले, देशातला सर्वात उंच पूल, देशातले सर्वात रुंद बोगदे आणि देशात पहिल्यांदाच धरणाच्या खालून बोगदा तयार करण्याचे ऐतिहासिक काम आपण करून दाखवले आहे. त्यामुळे निव्वळ टीका करण्यापूर्वी, हे अद्भूत काम करणाऱ्या इंजिनिअर्सचेही आभार मानले पाहिजेत, याचे भान टीकाकारांनी ठेवावे, असा टोलाही मुख्यमंत्र्यांनी लगावला.

# कोयना धरणात पाण्याची झपाट्याने वाढ

तभा वृत्तसेवा

कराड (सातारा) : कोयना धरणाच्या पाणलोट क्षेत्रात सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे धरणातील पाणीसाठ्यात वेगाने वाढ होत आहे. गेल्या २४ तासांत धरणात तब्बल२.१६ टीएमसी पाण्याची आवकझाली असून, पाण्याची पातळी सातत्याने वाढत असल्याने जलसंपदा विभागाने परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवले आहे. पावसाचा हा वेग कायम राहिल्यास येत्या काही दिवसांत धरणातून पाण्याचा नियंत्रित विसर्ग सुरू होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.शनिवार (४ जुलै) रोजी सकाळी ८ वाजेपर्यंतच्या आकडेवारीनुसार,कोयना धरणातील एकूण पाणीसाठा १८.१९ टीएमसी (१७.२८ टक्के)इतका झाला आहे. त्यापैकीउपयुक्त पाणीसाठा १३.०७ टीएमसी (१३.०५ टक्के)इतका आहे. धरणाचीपाणीपातळी २०५१.०१ फूट (६२५.१७० मीटर)इतकी नोंदविण्यात आली आहे. सध्या धरणात२५,००८ क्युसेक वेगाने पाण्याची आवकसुरू आहे. मात्र, अद्यापवीजनिर्मिती केंद्रातून किंवा नदीपात्रात कोणताही विसर्ग करण्यात आलेला नाही, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली.दरम्यान, धरणाच्या पाणलोट क्षेत्रात पावसाचा जोर कायम आहे. गेल्या २४ तासांतकोयना येथे १८९ मिमी, नवजा येथे २१० मिमी आणि महाबळेश्र्वर येथे २३३ मिमीपावसाची नोंद झाली. तर१ जूनपासून आतापर्यंत कोयना येथे ६२२ मिमी, नवजा येथे ८७३ मिमी आणि महाबळेश्र्वर येथे ८७२ मिमीपावसाची नोंद झाली आहे.पाणलोट क्षेत्रात पुढील काही दिवसही जोरदार पावसाचा अंदाज असल्याने धरणातील पाणीसाठा आणखी वेगाने वाढण्याची शक्यता आहे. त्यामुळेकोयना नदीकाठच्या गावांतील नागरिकांनी प्रशासनाच्या सूचनांकडे लक्ष ठेवावे, असे आवाहन करण्यात येत आहे. तसेच धरणातील पाणीसाठा आणि हवामानाची स्थिती लक्षात घेऊन आवश्यकतेनुसार विसर्गाबाबत निर्णय घेतला जाईल, असे जलसंपदा विभागाने स्पष्ट केले आहे.

# यंदाची वारी ठरणार वेगळी! जाणून घ्या पोलिसांनी केलेली खास तयारी

तभा वृत्तसेवा

पुणे : आषाढी एकादशी निमित्त संत तुकाराम महाराज आणि संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या पालखी सोहळ्यासाठी पुणे ग्रामीण पोलीस प्रशासनाने व्यापक तयारी पूर्ण केली आहे. संत तुकाराम महाराजांची पालखी ७ जुलै रोजी देहू येथून, तर संत ज्ञानेश्वर महाराजांची पालखी ८ जुलै रोजी आळंदी येथून पंढरपूरकडे प्रस्थान करणार आहे.



पुणे जिल्हा पोलीस अधीक्षक संदीप सिंह गिल यांनी पत्रकार परिषदेत वारीदरम्यान वारकऱ्यांच्या सुरक्षिततेसाठी आणि सुविधांसाठी करण्यात आलेल्या उपाययोजनांची माहिती दिली.

यंदा सुमारे १६० किलोमीटरचा पालखी मार्ग पुणे जिल्ह्यातून जाणार असल्याने संपूर्ण मार्गावर कडक पोलीस बंदोबस्त ठेवण्यात येणार आहे.

इंदापूर, काटेवाडी आणि बेलवडी येथे होणाऱ्या रिंगण सोहळ्यांसाठी विशेष सुरक्षा व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच पालखी मार्गावर विनापरवानगी ड्रोन उडविण्यास बंदी घालण्यात आली असून, आवश्यकतेनुसार काही ठिकाणी वाहतूक वळविण्यात येणार आहे.

## दंडाच्या रकमेत वाढ

मुंबई : रेल्वेने प्रवास करणाऱ्या लाखो प्रवाशांसाठी महत्त्वाची बातमी आहे. २० जून २०२६ पासून रेल्वेतील विविध नियमांचे उल्लंघन करणाऱ्या प्रवाशांवर आकारल्या जाणाऱ्या दंडाच्या रकमेत वाढ करण्यात आली आहे. रेल्वे प्रशासनाने शिस्त, सुरक्षितता आणि प्रवाशांचा त्रास कमी करण्यासाठी हा निर्णय घेतला आहे.

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## २७ वर्षीय आरोपीवर हद्दपारीची कारवाई

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. ४ जुलै : लातूर जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांच्या निर्देशान्वे सराईत गुन्हेगारांच्या गैरकृत्यांवर प्रभावी प्रतिबंध घालण्यासाठी अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण यांच्या मार्गदर्शनात लातूर जिल्हा पोलीस दलामार्फत सातत्याने प्रतिबंधात्मक कारवाया राबविण्यात येत आहेत. त्याच अनुषंगाने पोलीस स्टेशन शिवाजीनगर, लातूर हद्दीतील गंभीर स्वरूपाचे गुन्हे करणारा सराईत गुन्हेगार अभिषेक अशोक जावके (वय २७ वर्षे, रा. गायत्रीनगर, लातूर) याच्याविरुद्ध हद्दपारीची कारवाई करण्यात आली आहे.

या आरोपीचा हद्दपारीची प्रस्ताव तयार करून तो उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी, लातूर यांच्याकडे सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावाची छाननी करून उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी, लातूर यांनी संबंधित इसमास लातूर जिल्हा तसेच लातूर तालुक्यास लागून असलेल्या धाराशिव जिल्ह्यातील धाराशिव व कळंब तालुक्यांच्या हद्दीतून हद्दपार करण्याचा आदेश पारित केला.ही कारवाई पोलीस अधीक्षक अमोल तांबे, अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण, उपविभागीय पोलीस अधिकारी समीरसिंह साळवे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक संतोष पाटील यांच्या नेतृत्वात सफौ. संजय फुलारी, पोलीस अमलदार राहुल सोनकांबळे, बालाजी कोतवाड, प्रशांत ओगले, अंकुलगे, माने, शिंदे यांनी पार पाडली.



### विविध वृत्त...

## ग्रामपंचायत अधिकाऱ्यांना वरिष्ठ पदाची वेतन श्रेणी लागू



तभा वृत्तसेवा

लातूर दि. ४ जुलै : लातूर जिल्ह्यातील ग्रामपंचायत अधिकारी यांना शासन निर्णय दि. २ मार्च २०१९ अन्वये सुधारित सेवांतर्गत आश्र्वासित प्रगती योजनेचा १०, २०, ३० वर्षाच्या सेवेनंतर अनुक्रमे पहिला, दुसरा आणि तिसरा लाभ देण्यात येतो. तसेच शासन निर्णय दि. २४ सप्टेंबर २०२४ अन्वये ग्रामसेवक आणि ग्रामविकास अधिकारी ही दोन्ही पदे एकत्रित करुन त्यांना ग्रामपंचायत अधिकारी असे नामाभिदान करण्यात आले असुन पहिला लाभ एस-१४ विस्तार अधिकारी, दुसरा लाभ सहाय्यक गटविकास अधिकारी एस-१५, तिसरा लाभ गटविकास अधिकारी एस-२० असे करण्यात आले आहे. त्याचबरोबर शासन निर्णय दि. २ जुन २०२५ आणि दि. १३ ऑक्टोबर २०२५ अन्वये काल्पनिक रित्या वरीष्ठ पदाची सुधारीत वेतनश्रेणी लागु करण्यात आली आहे.

त्यानुसार लातुर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल कुमार मिना, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी अस्लम तडवी, मुख्य लेखा व वित्त अधिकारी राजेंद्र नागणे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी शाम वाखर्डे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी बाळासाहेब वाघ, सर्व कक्षअधिकारी यांच्या सर्वांच्या अभ्यास पूर्ण मार्गदर्शनाने ग्रामपंचायत अधिकारी यांना मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल कुमार मिना यांच्या स्वाक्षरीने सुधारीत वेतनस्तर लागु करण्याचे आदेश दि. २५ जुन रोजी

निर्गमित करण्यात आले आहेत. त्यानुसार लातुर जिल्हा परिषदेअंतर्गत सर्व ग्रामपंचायत अधिकारी यांना यांचा लाभ होणार आहे. त्याबद्दल महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत युनियन डी.एन. ई.१३६ जिल्हा शाखा लातूरच्या वतीने सर्व अधिकारी यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी ग्रामपंचायत अधिकारी, पदाधिकारी उपस्थित होते.

## दयानंद वाणिज्य महाविद्यालयाच्या सी. ए. फाऊंडेशन विद्यार्थ्यांचे यश

तभा वृत्तसेवा

लातूर दि.४ जुलै : दयानंद वाणिज्य कनिष्ठ अंतर्गत महाविद्यालय, लातूर राबविण्यात येणाऱ्या सी.ए. व्यवसायिक अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्ष विद्यार्थ्यांनी मे २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या सी.ए. फाउंडेशन परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करत महाविद्यालयाच्या गुणवत्तापूर्ण परंपरेला पुन्हा एकदा उजाळा दिला आहे. आज जाहीर झालेल्या निकालात महाविद्यालयाचा विद्यार्थी प्रथमेश मोगल याने ४०० पैकी ३४६ गुण मिळवत देशात १६ वा क्रमांक पटकावला. या उल्लेखनीय यशामुळे महाविद्यालयाच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.

याशिवाय अर्पिता भराडिया २७२, अपूर्वा तुरे २७१, तनीश अग्रवाल २६३, अश्र्विन बजाज २५१, मृगनयनी औरादे २४७, मयुरी सोनवणे २३६, सावंत रोहित २२१, बिरादार श्रेया २१०, महेश हरडे २०४ आणि प्रीती राठी २०१ यांनीही उत्तम गुणांसह परीक्षा उत्तीर्ण होत महाविद्यालयाच्या यशस्वी परंपरेत भर घातली.

या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी, उपाध्यक्ष रमेशकुमार राठी, सचिव रमेश बियाणी, कोषाध्यक्ष संजय बोरा, विशाल लाहोटी, प्रशासकीय अधिकारी प्रा. ऋतुजा देशमुख, डॉ. सुभाष मोरे, प्राचार्य डॉ. मान्नीकर यांनी गुणवंत विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

# मनपा आयुक्त पोहोचले कचरा डेपोवर

तभा वृत्तसेवा

लातूर दि. ४ जुलै : लातूर शहर महानगरपालिकेचे नूतन आयुक्त राहुल कुलकर्णी यांनी शुक्रवार दि. ३ जुलै रोजी वरवंटी येथील घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पास भेट देऊन पाहणी केली. मनपा शाळेलाही त्यांनी भेट दिली.

आयुक्त राहुल कुलकर्णी यांनी गुरुवारी लातूर शहर महानगरपालिकेचे आयुक्त म्हणून पदभार स्वीकारला आहे. दुसऱ्याच दिवशी त्यांनी घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पास भेट देऊन माहिती घेतली. ओल्या कचऱ्यावर प्रक्रिया करून तयार केलेले कंपोस्ट खत तसेच सुका कचरा प्रकल्प, बायोगॅस प्रकल्प व जुन्या साठलेल्या कचऱ्यावर प्रक्रिया करणाऱ्या प्रकल्पांचीही त्यांनी माहिती घेतली. यावेळी कचरा व्यवस्थापन व प्रक्रिया करण्यासाठी

पूर्णपणे विलगीकृत कचरा येणे गरजेचे असल्याचे ते म्हणाले. या प्रक्रियेत काम करत असताना कर्मचाऱ्यांनी पूर्णपणे किटचा वापर



करावा, असा आदेशही त्यांनी दिला. याप्रसंगी मनपा उपायुक्त वसुधा फड, कनिष्ठ अभियंता गणेश देवणीकर, घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प प्रमुख धोंडीबा सोनवणे यांच्यासह अधिकारी व कर्मचाऱ्यांची उपस्थिती होती.

आयुक्तांनी शहरात मनपाच्या वतीने चालविल्या जाणाऱ्या सावित्रीबाई फुले मनपा शाळा क्र. ९ ला भेटी दिली. तेथील शिक्षक व विद्यार्थ्यांशी संवाद साधला. मनपा शाळांची गुणवत्ता वाढविण्यासाठी आवश्यक उपाययोजना संदर्भात त्यांनी चर्चा केली. आयुक्तांनी पदभार स्वीकारल्यानंतर लागलीच विविध ठिकाणी भेटी देऊन कामकाजाची माहिती घेत आहेत.

## अंधाराचा फायदा घेत चालक फरार
## सव्वा लाखाचा प्रतिबंधित गुटखा जप्त

तभा वृत्तसेवा

लातूर दि. ४ जुलै : राज्यात प्रतिबंधित गुटख्याची अवैध वाहतूक व विक्री रोखण्यासाठी लातूर जिल्हा पोलीस दलाने सुरू केलेल्या विशेष मोहिमेंतर्गत स्थानिक गुन्हे शाखेने कारवाई करत १ लाख २० हजार ३२० रुपयांचा प्रतिबंधित गुटखा, वाहतुकीसाठी वापरण्यात आलेली कार असा ४ लाख ७० हजार ३२० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. पोलिसांची चाहूल लागताच वाहनचालकाने कार रस्त्याच्या कडेला सोडून अंधाराचा फायदा घेत घटनास्थळावरून पळ काढला. त्याचा शोध सुरू असून गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांच्या आदेशानुसार तसेच अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर यांच्या नेतृत्वाखाली अवैध धंद्यांविरुद्ध विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमेदरम्यान दि. २ जुलै २०२६ रोजी रात्री स्थानिक गुन्हे शाखेचे पथक देवणी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील वलांडी येथे गस्त घालत असताना गुप्त माहितीदारामार्फत महाराष्ट्रात प्रतिबंधित असलेला गुटखा मारुती सुझुकी सेलेरिओ (एमएच ०४ केएल १३७२) या कारमधून विक्रीसाठी आणला जात असल्याची खात्रीशीर माहिती मिळाली. मिळालेल्या माहितीच्या आधारे पथकाने वलांडीझदवणहिप्परगा मार्गावरील सापळा रचला. रात्री सुमारे १०.१० वाजण्याच्या सुमारास संशयित वाहन दिसताच पोलिसांनी ते थांबविण्याचा प्रयत्न केला. मात्र पोलिसांची उपस्थिती लक्षात येताच चालकाने कार रस्त्याच्या कडेला उभी करून अंधाराचा फायदा घेत शेतामध्ये पळ काढला.

पोलिसांनी वाहनाची झडती घेतली असता वाहनात महाराष्ट्रात विक्रीस बंदी असलेला मोठ्या गुटखा साठा आढळून आला.

## फत्तेपूर येथे सहकारी संस्थेच्या नव्या कार्यालयाचे उद्घाटन

तभा वृत्तसेवा

औसा दि.४ जुलै : जागतिक सहकार दिनानिमित्त औसा तालुक्यातील फत्तेपूर येथील विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थाच्या नव्या कार्यालयाचे उद्घाटन आ. अभिमन्यू पवार यांच्या हस्ते शनिवार दि.४ रोजी करण्यात आले.

आ. अभिमन्यू पवार म्हणाले,ग्रामस्थांची स्वतंत्र सहकारी सोसायटी असावी, ही अनेक वर्षांपासूनची प्रामाणिक मागणी आज पूर्ण झाली आहे. यापूर्वी गाव दुसऱ्या गावातील सहकारी संस्थेशी संलग्न असल्यामुळे नागरिकांना विविध अडचणींचा सामना करावा लागत होता. आता स्वतंत्र सहकारी संस्था सुरू झाल्यामुळे गावाच्या विकासाला चालना मिळण्याबरोबरच शेतकरी आणि सभासदांची कामे अधिक सुलभ होणार असल्याचा विश्र्वास व्यक्त करण्यात आला.ग्रामीण अर्थव्यवस्था सक्षम करण्यासाठी तसेच शेतकरी, कष्टकरी आणि सर्वसामान्यांच्या प्रगतीसाठी सहकार चळवळीची भूमिका अत्यंत महत्त्वाची असल्याचे नमूद करत, नव्या कार्यालयाच्या माध्यमातून फत्तेपूर व परिसराच्या विकासाला नवे बळ मिळेल, असा आशावाद आ. पवार यांनी व्यक्त केला.

अध्यक्ष व्यंकटराव पाटील, प्रविण फडणीस, औसा सहनिबंधक रमेश सगर, सहकार अधिकारी व्ही. एम. बोरफळकर, मारुती महाराज का. संचालक शामराव पाटील, सुभाषराव जाधव, औसा पंचायत समिती सदस्या सुकेशना श्रीधर पाटील, फत्तेपूरच्या सरपंच अनिता बलभीम माळी, सोसायटीचे चेअरमन ज्योतिराम साळुंखे, उपाध्यक्ष अनंत पवार, सचिव बलभीम एकंडे, माजी उपाध्यक्ष श्रीराम पाटील, नागरसोगाचे चेअरमन यशवंत शिंदे, शिरोडकर जाधव, सदाशिव जोगदंड, विश्र्वंभर धानूरे, चतुर्भुज जाधव यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यानंतर फत्तेपूर येथील श्री नरसिंह मंदिरास भेट देऊन दर्शन घेत मंदिर परिसरातील सुरू असलेल्या विकासकामांची पाहणी करण्यात आली. ग्रामस्थांच्या मागणीनुसार मंदिर परिसरात सभागृह उभारण्यासाठी मूलभूत सुविधा (२५/१५) योजना निधीतून सुमारे ३० लाख रुपयांच्या कामास दोन टप्प्यांत मंजुरी देण्यात आली असून हे काम सध्या प्रगतीपथावर आहे. पाहणीदरम्यान संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक त्या सूचना देण्यात आल्या.

## महावितरणचे नागरिकांना आवाहन । खबरदारी हीच सुरक्षा
# पावसाळ्यात विद्युत अपघात टाळण्यासाठी सतर्क रहा!

तभा वृत्तसेवा

लातूर दि. ४ जुलै :पावसाळ्यात पाऊस व वादळी वाऱ्यामुळे महावितरणच्या वीजयंत्रणेला मोठा फटका बसत असतो. विजेच्या तारा तुटने, विजेचे खांब कोसळणे, रोहित्र कोसळणे त्याचबरोबर करंट उतरणे अशा घटना घडत असतात. अशावेळी काही प्रसंगी दुर्घटनाही घडतात. त्यामुळे पावसाळ्यात होणारे संभाव्य विद्युत अपघात टाळण्यासाठी सुरक्षिततेचे सर्व नियम पाळण्याचे व खबरदारी घेण्याचे आवाहन महावितरणने नागरिकांना केले आहे.



मुसळधार पाऊस व जोरदार वाऱ्यामुळे तुटलेल्या फांद्या वीज वाहीनीच्या तारांवर अडकून पडल्या असल्यास त्या स्वतः काढण्याचा प्रयत्न करू नये. तसेच झाडे पडल्याने वीजखांब वाकला वा मोडला जातो. परिणामी वीजतारा तुटण्याचे प्रकार घडतात.

त्यात वीजप्रवाह असण्याची शक्यता असल्याने अशा तुटलेल्या, लोंबकळणाऱ्या वीजतारांपासून सावध राहावे. या तारांना हात लावण्याचा किंवा हटवण्याचा प्रयत्न करू नये आणि त्वरित महावितरणशी संपर्क साधावा. घरात बसवलेल्या मीटरवर पाणी पडत असल्यास किंवा मीटर असलेली भिंत ओली असल्यास त्वरित महावितरणशी संपर्क साधावा. विजेच्या पोलला हात लावू नये. खांबाच्या स्टेवायरला गुरे-ढोरे बांधू नयेत तसेच कपडे वाळत घालण्यासाठी स्टेवायरचा वापर करू नये. घरामध्ये असलेली विद्युत यंत्रणा व घराजवळ असलेली अर्थिंग मान्यताप्राप्त कंत्राटदाराकडून तपासून घ्यावी. अपार्टमेंटच्या मीटर बॉक्सची स्वच्छता राखावी भिंतीमध्ये पाणी मुरणार नाही याची काळजी घ्यावी.

स्वीच बोर्डापासून मोटारीपर्यंत जाणाऱ्या वायरला जोड देऊ नये. घरात शॉर्टसर्किट झाल्यास मेन स्वीच तत्काळ बंद करावा. घरावरील दूरचित्रवाणीची डिश किंवा अँटेना वीज तारांपासून दूर ठेवावा. ओल्या कपड्यांवर विजेची इस्त्री फिरवू नये. विजेचे स्वीच बोर्ड किंवा कोणत्याही उपकरणाला पाणी लागणार नाही याची दक्षता घ्यावी. विशेषतः टिन पत्र्याच्या घरात राहणाऱ्या नागरिकांनी

पावसाळ्यात अतिदक्ष राहून विजेपासून सुरक्षित राहण्यासाठी उपाययोजना कराव्यात. अशा प्रसंगी खबरदारीचा उपाय म्हणून रोहित्र आणि फिडर बंद करण्यात येतो. त्यामुळे वीजपुरवठा काही कालावधीसाठी बंद होतो. अशा स्थितीत संभाव्य धोका टाळण्यासाठी नागरिकांनी महावितरणला सहकार्य करावे.

शहरी व ग्रामीण भागातील वीजग्राहकांना खंडित वीजपुरवठ्याची माहिती देण्यासाठी वा तक्रारीसाठी २४ तास सुरू असणाऱ्या कॉल सेंटरवर संपर्क करता येईल. टोलफ्री क्रमांकाद्वारे केलेल्या सर्व तक्रारी सीआरएम सॉफ्टवेअरमध्ये नोंदविल्या जातात आणि निपटारा करण्यासाठी एसएमएस पाठवून संबंधित क्षेत्रीय अधिकाऱ्याला देण्यात येतात. यासाठी ग्राहकांनी १९१२,१८००२१२३४३५, किवा १८००२३३३४३५ या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधावा, तसेच लातूर जिल्हयाच्या ७८७५७६२०२१ या सनियंत्रण कक्षाच्या मोबाईल क्रमांकावरती संपर्क साधावा सदरील क्रमांकावरती व्हॉटसॲप सेवाही कार्यरत असल्याने टेक्स्ट मेसेजसह तक्रारींशी निगडीत फोटोही वीजग्राहकांना शेअर करता येणार आहेत.

# रजिस्ट्री कार्यालय परिसरातील अतिक्रमण काढले

तभा वृत्तसेवा

लातूर दि. ४ जुलै : लातूर शहर महानगरपालिका अतिक्रमणविरोधी पथक, महसूल विभाग आणि पोलिसांनी संयुक्तपणे कारवाई करीत शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकातील जुने जिल्हाधिकारी कार्यालयाच्या पाठीमागील रजिस्ट्री कार्यालयाच्या परिसरातील अतिक्रमण दि. ३ जुलै रोजी पुन्हा एकदा काढण्यात आले. यामुळे रजिस्ट्री कार्यालय परिसरात एकच खळबळ उडाली होती.



सरकारला मोठा महसूल मिळवून देणाऱ्या या परिसरात दोन रजिस्ट्री (नोंदणी) कार्यालये आहेत. या कार्यालयांच्या परिसरात मोठ्याप्रमाणात मुद्रांक विक्रेते, बॉण्ड रायटर यांनी टपऱ्या टाकुन,

टेबल मांडून अतिक्रमण केले होते. काहींनी तर वाहनाच्या पार्कींग शेडमध्येही अतिक्रमण केले होते. याच परिसरातील मोकळ्या जागेत चहा, नाष्टा इतकेच नव्हे तर शासनाने प्रतिबंध केलेला गुटखासुद्धा विकला जात होता. सुमारे ३-४ महिन्यांपुर्वी महानगरपालिकेने हेच अतिक्रमण काढले होते. परंतु, थोडा कालावधी जाताच पुन्हा पुर्वीप्रमाणेच अतिक्रमण झाले.

अतिक्रमण पुन्हा वाढल्याचे येताच लातूर शहर महानगरपालिका अतिक्रमणविरोधी लक्षात पथक, तहसील कार्यालय लातूर व पोलिस विभागाने संयुक्त कारवाई करीत हे अतिक्रमण काढले. या परिसरात अक्षरशः मुद्रांक विक्रेत्यांनी अनधिकृतपणे पत्र्यांचे शेड मारले होते. जेसीबीच्या सहाय्याने पत्र्याचे सुमारे २० शेड उध्वस्त करण्यात आले. गेल्या काही दिवसांत मुद्रांक विक्रेत्यांच्या दुकानांवर अशी कारवाई करण्यात आलेली आहे. वारंवार होत असलेल्या अशा कारवायांमुळे मुद्रांक व्यवसायिक संभ्रमात आहेत. प्रशासकीय इमारतीच्या परिसरात छोटे-छोटे हॉटेल्स मोठ्या प्रमाणात

रजिस्ट्री कार्यालयाच्या परिसरातील अतिक्रमण दोनवेळा काढण्यात आले आहे. मुद्रांक विक्रेत्यांनी त्यांना दिलेल्या जागेवरच आपला व्यवसाय करावा. या पुढे या जागेवर अतिक्रमण होऊ देणार नाही. झाले तर संबंधितांवर गुन्हे दाखल करण्यात येतील, असा इशारा तहसीलदार सौदागर तांदळे यांनी दिला आहे.

आहेत. चहा, नाष्टा, पान, तंबाखू, गुटखा, सिगारे सर्वच या ठिकाणी मिळते. शासनाच्या जागेवरच शासनाने प्रतिबंध केला गुटखा विकला जातो आहे. त्याचा त्रास शासकीय कार्यालयात कामासाठी आलेल्या नागरिकांना होतो आहे.

## लायन्स क्लब ऑफ लातूर सिटीचा पदग्रहण सोहळा दिमाखात




तभा वृत्तसेवा

लातूर दि. ४ जुलै : लायन्स क्लब ऑफ लातूर सिटीच्या नूतन कार्यकारिणीचा पदग्रहण सोहळा रविवारी एमआयडीसी येथील हॉटेल आरोमा येथे अत्यंत उत्साहपूर्ण व दिमाखदार वातावरणात पार पडला. लायन्स क्लबच्या ध्वजवंदनाने आणि दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली.

यावेळी इन्स्टॉलेशन ऑफिसर पीडीजी लायन दिलीप मोदी नांदेड यांनी नूतन पदाधिकाऱ्यांना पद व गोपनीयतेची शपथ देण्यात आली. प्रमुख पाहुणे प्राचार्य डॉ. माधवराव गव्हाणे उपस्थित होते. नवनिर्वाचित अध्यक्ष अनिलकुमार झंवर, सचिव ईश्र्वरप्रसाद व्ही. चांडक आणि कोषाध्यक्ष संजय एन. राजुळे यांनी आगामी कार्यकाळात शिक्षण, आरोग्य, पर्यावरण संवर्धन, रक्तदान, नेत्रतपासणी, युवा विकास तसेच विविध समाजोपयोगी उपक्रम प्रभावीपणे राबविण्याचा संकल्प व्यक्त केला.

कार्यक्रमास पी. विवेकानंद, डॉ. अजय नारायणकर, शरद मोरे, नागनाथ गित्ते, कृषि उत्पन्न बाजार समिती उदगीरचे सभापती शिवाजी हुडे, सत्यनारायण सोनी, ओमजी लोया, गिरीश गर्थे, भालचंद्र रामदास, राजकुमार मुंडडा, जयप्रकाश खटोड, धीरज पलोड, सुरज मुंडडा, राम कांबळे, आनंदशेठ बहेती, महेंद्र दुर्गकर, बंकट भांगडिया, श्रीनिवास जाजू, बाबा भांगडिया, अरविंद लखोटिया, सुनील बेडमुथा, सिद्रामप्पा चाकोते, हरिभाऊ साबदे, सुनील झंवर आदी उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## संक्षिप्त वृत्त...

### धन्वंतरी ज्ञानाई डॉक्टरांच्या वारकरी दिंडी'अंतर्गत फिरत्या हॉस्पिटलचे सेलूतून प्रस्थान

**परभणी,/प्रतिनिधी :** धन्वंतरी ज्ञानाई डॉक्टरांच्या वारकरी दिंडी (वर्ष दुसरे) अंतर्गत आयोजित फिरत्या हॉस्पिटलचे प्रस्थान शुक्रवारी (दि. ३ जुलै) सेलू येथील साई नाट्यमंदिर, महेशनगर येथून विविध मान्यवरांच्या उपस्थितीत उत्साहात करण्यात आले. ग्रामीण व दुर्गम भागातील नागरिकांना आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात येत आहे.

कार्यक्रमास खासदार संजय जाधव, माजी आमदार हरिभाऊ काका लहाने, माजी खासदार सुरेश जाधव, शिवसेना जिल्हाप्रमुख आनंद भरोसे, लोकसभा संपर्कप्रमुख राजू कापसे, माजी जिल्हाप्रमुख भास्कर लंगोटे, विनायक खंडागळे, महिला आघाडीच्या जिल्हाप्रमुख सखुबाई लटपटे, मंगल कथले, पंडितराव आरगुले, रणजित गजमल, उपजिल्हाप्रमुख बाबा काटकर, नगर परिषद गटनेते संदीप लहाने, नगरसेवक डॉ. अनिकेत जोगदंड, नगरसेविका अनुपमा देवधर, सपना काळे यांच्यासह शिवसेनेचे पदाधिकारी, नगरसेवक व शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी सेलू डॉक्टर असोसिएशनचे पदाधिकारी व सदस्यांनीही सहभाग नोंदविला. डॉ. सुबोध माकोडे, डॉ. शेषनारायण केवारे, डॉ. बाळासाहेब जाधव, डॉ. सोमेश्वर गजमल, डॉ. आशिष मेहता, डॉ. परेश विनायके, डॉ. सचिन काळे, डॉ. पुरी, डॉ. सासवडे, डॉ. मोरे, डॉ. अनुराग जोगदंड, प्रदीप पवार, संतोष पडोळे, अर्जुन डख, अभिजीत दळवे, अभय वाकणकर, अमोल डासाळकर, जिजा डख, विलास काळे, नागेश कदम आदी उपस्थित होते. कार्यक्रमास नगरसेवक तथा शिवसेना डॉक्टर सेलचे प्रदेश उपप्रमुख डॉ. अनिकेत जोगदंड, शिवसेना डॉक्टर सेलचे जिल्हाप्रमुख डॉ. विश्वंभर देशमुख तसेच होमिओपॅथिक विंग प्रमुख डॉ. प्रभाकर आवचार आणि परभणी जिल्हा डॉक्टर सेलचे पदाधिकारी उपस्थित होते.

या उपक्रमाच्या माध्यमातून आरोग्यविषयक जनजागृती, मोफत वैद्यकीय तपासणी आणि गरजू रुग्णांना उपचार सेवा उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न करण्यात येणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले. फिरते हॉस्पिटल ग्रामीण भागातील नागरिकांसाठी आरोग्यसेवेचे प्रभावी माध्यम ठरणार असल्याचा विश्वास उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केला.

### मानवत येथे ट्रॉमा केअर सेंटर मंजूर करावे : आमदार राजेश विटेकर यांची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

**परभणी,/प्रतिनिधी:** मानवत येथे ट्रॉमा केअर सेंटर मंजूर करण्यात यावे, अशी मागणी आमदार राजेश विटेकर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली.

आमदार राजेश विटेकर व आमदार डॉ. रत्नाकर गुट्टे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची सदिच्छा भेट घेतली. यावेळी पाथरी विधानसभा मतदारसंघातील विविध विकासकामांबाबतही सविस्तर चर्चा करण्यात आली. तसेच आमदार विटेकर यांनी आपल्या मागणी संदर्भातील एक निवेदन मुख्यमंत्र्यांना सादर केले. त्याद्वारे, मानवत शहर राष्ट्रीय महामार्गालगत असल्याने येथे अपघातांचे प्रमाण अधिक आहे. अपघातग्रस्तांना तातडीने वैद्यकीय उपचार मिळावेत व जीवितहानी टाळता यावी, यासाठी मानवत येथे ट्रॉमा केअर सेंटरची आवश्यकता असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले.

दरम्यान, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या मागणीची गंभीर दखल घेत संबंधित विभागाला आवश्यक कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्याची माहिती आमदार विटेकर यांनी दिली.

### आरटीओ कार्यालयातील दोन लिपिकांना लाच घेताना रंगेहाथ पकडले

#### मोटारसायकल नावावर करण्यासाठी १,३०० रुपयांची लाच स्वीकारल्याचा आरोप; लाचलुचपत प्रतिबंधक विभागाची कारवाई

**परभणी,/प्रतिनिधी:** येथील उपप्रादेशिक परिवहन कार्यालयात मोटारसायकल हस्तांतरणाची प्रक्रिया पूर्ण करून देण्यासाठी लाचेची मागणी करणाऱ्या कनिष्ठ लिपिक टंकलेखक मीरा नारायणराव लोकरे (वय ३७) व लिपिक टंकलेखक सय्यद जफर सय्यद अकबर (वय ५३) या दोन लिपिकांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने शुक्रवारी (दि. ३) रंगेहाथ पकडले.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे प्राप्त तक्रारीनुसार, तक्रारदाराने नोव्हेंबर २०२५ मध्ये खरेदी केलेली मोटारसायकल स्वतःच्या नावावर करण्यासाठी आवश्यक ऑनलाईन शुल्क भरले होते. त्यानंतर ३० जून २०२६ रोजी ते आरटीओ कार्यालयात गेले असता, संबंधित काम पूर्ण करण्यासाठी मीरा लोकरे यांनी एक हजार रुपयांची लाच मागितल्याची तक्रार करण्यात आली होती. तक्रारीची पडताळणी १ जुलै रोजी पंचांसमक्ष करण्यात आली. त्यावेळी मीरा लोकरे यांनी सुरुवातीला १ हजार रुपयांची मागणी करून तडजोडीअंती ८०० रुपये स्वीकारण्याचे मान्य केल्याचे निष्पन्न झाले. तसेच सय्यद जफर यांनी मोटारसायकलच्या कागदपत्रांवर आवश्यक पडताळणी करून 'नो वॉंटेड'चा शिक्का मारण्याच्या कामासाठी ५०० रुपयांची लाच मागितल्याचेही स्पष्ट झाले. यानंतर ३ जुलै रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने सापळा रचला. कारवाईदरम्यान मीरा लोकरे यांनी तक्रारदाराकडून ८०० रुपये, तर सय्यद जफर यांनी ५०० रुपये अशी एकूण १,३०० रुपयांची लाच पंचांसमक्ष स्वीकारल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर दोघांनाही ताब्यात घेण्यात आले.

या प्रकरणी ताडकळस पोलीस ठाण्यात भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, १९८८ च्या कलम ७ अन्वये गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असून पुढील तपास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे पोलीस उपअधीक्षक महेश पाटणकर करीत आहेत.

ही कारवाई पोलीस निरीक्षक अल्ताफ मुलाणी यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली. तर पोलीस उपअधीक्षक महेश पाटणकर यांनी कारवाईचे पर्यवेक्षण केले. आरोपींच्या घरझडतीची प्रक्रिया सुरू असून आवश्यकतेनुसार मोबाईल व इतर साहित्य जप्त करण्यात येणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली.

### पाथरीत ६ जुलै रोजी 'पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा'

**परभणी,/प्रतिनिधी :** जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, परभणी, डीजेपी एज्युकेशनल कॅम्पस, पोहेटाकळी तसेच अखिल भारतीय श्री स्वामी समर्थ गुरुपीठ, त्र्यंबकेश्वर (दिंडोरी प्रणित) शाखा शिवाजीनगर, पाथरी यांच्या संयुक्त विद्यमाने सोमवार, दि. ६ जुलै रोजी सकाळी ८.३० वाजता पाथरी तालुक्यातील डीजेपी एज्युकेशनल कॅम्पस, पोहेटाकळी येथे 'पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा' आयोजित करण्यात आला आहे.

# परभणी जिल्ह्यात गजानन महाराजांच्या पालखीचे आगमन

## झिरो पाटा येथे दर्शनासाठी भाविकांची गर्दीच गर्दी

## परभणी शहरातील नवा मोंढयात आज पालखी राहणार मुक्कामी

**मोहन धारासूरकर**
**परभणी ,/प्रतिनिधी:-** आषाढी वारी पालखी सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर परभणी जिल्हा प्रशासनाने वारकऱ्यांच्या सुरक्षित, सुखकर आणि सुविधायुक्त प्रवासासाठी व्यापक नियोजन केले आहे. जिल्हाधिकारी नतिशा माथुर यांच्या मार्गदर्शनाखाली निवासी उपजिल्हाधिकारी अनुराधा ढालकरी यांनी विविध विभागांना समन्वयाने काम करून वारकऱ्यांना आवश्यक सर्व मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्याचे निर्देश दिले असून यावेळी परभणी जिल्हयात शेगाव ची गजानन महाराजांची पालखी शनिवार दि.०४ जुलै रोजी सायंकाळी आगमन झाले असून शहरतील भारती कॅम्प येथे दर्शनास गावकऱ्यांनी गर्दी केली होती.



यावर्षी जिल्ह्यातून तसेच जिल्ह्याबाहेरून पंढरपूरकडे जाणाऱ्या सुमारे ४३ दिंड्या परभणी जिल्ह्यातून मार्गक्रमण करणार आहेत. शनिवारपासून प्रमुख दिंड्यांचे जिल्ह्यात आगमन सुरू होणार असून १७ जुलैपर्यंत विविध दिंड्यांचा प्रवास सुरू राहणार आहे. श्रीक्षेत्र त्रिधारा, रोकडा हनुमान मंदिर (नवा मोंढा, परभणी), दैठणा आणि गंगाखेड येथे वारकऱ्यांच्या मुक्कामाची व्यवस्था करण्यात आली आहे.

श्री संत गजानन महाराज (शेगाव), श्री संत गुलाबराव महाराज (चांदूर बाजार) तसेच श्री विठ्ठल-रुक्मिणी संस्थान (कौंडिण्यपूर-तिवसा) यांच्या पालख्या परभणी जिल्ह्यातून मार्गक्रमण करणार असून त्यांच्या स्वागतासाठी प्रशासनाने विशेष नियोजन केले आहे.

## मतदारयादी विशेष पुनरिक्षणासाठी नागरिकांनी सक्रिय सहभाग घ्यावा : लाहोटी

**परभणी ,/प्रतिनिधी:-** भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार सुरू असलेल्या मतदारयादी विशेष सखोल पुनरिक्षण (एसआयआर) कार्यक्रमांतर्गत जिंतूर तालुक्यातील सोस येथे जनजागृती सभा व प्रगणना फॉर्म वाटप कार्यक्रम शुक्रवारी ३ जूलै दुपारी उत्साहात पार पडला. यावेळी नागरिकांनी मतदारयादी अचूक, अद्ययावत आणि त्रुटीमुक्त करण्यासाठी सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन उपविभागीय अधिकारी शैलेश लाहोटी यांनी केले.

अखिल भारतीय तालुका मराठी पत्रकार संघाचे जिंतूर तालुका अध्यक्ष बालाजी शिंदे सोसकर यांच्या पुढाकारातून या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच माणिक शिंदे होते. यावेळी उपविभागीय अधिकारी शैलेश लाहोटी (सेलू), नायब तहसीलदार नागेश देशमुख (सेलू), नायब तहसीलदार प्रशांत राखे (जिंतूर), तलाठी भीमराव वाकळे, ग्रामपंचायत अधिकारी संतोष कापुरे, बीएलओ पर्यवेक्षक गणहिरे पुरभाजी, केंद्रप्रमुख मयूर जोशी (जोगवाडा), बीएलओ रमेश तरटे, प्रवीण भिसे, शंकर पांचाळ, कोडबळे, तुळशीराम मुळे यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमात मार्गदर्शन करताना लाहोटी म्हणाले की, विशेष सखोल पुनरिक्षण मोहिमेदरम्यान मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) प्रत्येक मतदाराच्या घरी जाऊन प्रगणना फॉर्मचे वितरण करणार आहेत. नागरिकांनी हा फॉर्म काळजीपूर्वक भरून त्यातील माहितीची खात्री करावी. तसेच आवश्यक कागदपत्रे वेळेत सादर करून बीएलओंना सहकार्य करावे. मतदारयादीतील माहिती अचूक असणे ही सशक्त लोकशाहीची मूलभूत गरज असल्याचे त्यांनी नमूद केले. यावेळी त्यांनी नागरिकांना केवळ स्वतःपुरते मर्यादित न राहता कुटुंबीय, नातेवाईक, मित्रपरिवार आणि शेजाऱ्यांनाही या अभियानाबाबत जागरूक करण्याचे आवाहन केले. मतदारयादी विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी लोकप्रतिनिधी, पत्रकार, राजकीय पक्षांचे मतदान केंद्रस्तरीय प्रतिनिधी (बीएलए), शासकीय अधिकारी, तलाठी, ग्रामपंचायत अधिकारी, पोलीस पाटील, मुख्याध्यापक, शिक्षक तसेच गावपातळीवरील सर्व यंत्रणांनी पुढाकार घेण्याची आवश्यकता असल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमादरम्यान उपस्थितांना एसआयआर अभियानाचे महत्त्व, प्रगणना फॉर्म भरण्याची प्रक्रिया तसेच आवश्यक कागदपत्रांबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

## प्रिन्स इंग्लिश स्कूलची राज्यात दैदिप्यमान कामगिरी

### शिष्यवृत्ती परीक्षेत प्रथम, द्वितीय, तृतीयसह सहावा क्रमांक : २४ विद्यार्थी शिष्यवृत्तीस पात्र

**सेलू,/प्रतिनिधी-:** महाराष्ट्र राज्य शिष्यवृत्ती परीक्षेच्या नुकत्याच जाहीर झालेल्या निकालात एल.के.आर. रोडगे प्रिन्स इंग्लिश स्कूल ॲन्ड ज्युनिअर कॉलेज, सेलूने राज्यस्तरावर अभूतपूर्व यश संपादन करत शैक्षणिक क्षेत्रात नवा इतिहास रचला आहे. राज्यातील सीबीएसई व सीआयएससीई/आयएससी संलग्न शाळांमधून प्रिन्स इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थ्यांनी राज्य गुणवत्ता यादीत प्रथम, द्वितीय, तृतीय तसेच सहावा क्रमांक पटकावत उल्लेखनीय कामगिरी केली आहे.

राज्य गुणवत्ता यादीत समर्थ अनंत तेलभरे यांनी राज्यात प्रथम क्रमांक मिळवून शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला. तेजश्री महेशकुमार चौधरी यांनी राज्य द्वितीय, सृष्टी गोविंद कदम यांनी राज्य तृतीय, तर समर्थ श्याम मचाले यांनी राज्य सहावा क्रमांक पटकावला. तसेच इयत्ता पाचवी गटात चंद्रशेखर गायकवाड यांनी राज्य दहावा आणि समर्थ सुरवसे यांनी राज्य पंधरावा क्रमांक मिळवून शाळेच्या यशात मोलाची भर घातली. विशेष म्हणजे, या परीक्षेत शाळेचे तब्बल २४ विद्यार्थी शिष्यवृत्तीस पात्र ठरले आहेत. ही कामगिरी शाळेतील गुणवत्तापूर्ण शिक्षणपद्धती, विद्यार्थीकेंद्रित अध्यापन, सातत्यपूर्ण शैक्षणिक नियोजन आणि स्पर्धा परीक्षांच्या प्रभावी तयारीचे द्योतक मानली जात आहे.

या यशामागे विद्यार्थ्यांची मेहनत, पालकांचे मोलाचे सहकार्य आणि शिक्षकांचे समर्पित मार्गदर्शन यांचा मोठा वाटा असल्याचे शाळा प्रशासनाने सांगितले. विद्यार्थ्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल सर्व स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. या यशाबद्दल श्रीराम प्रतिष्ठान, सेलूचे संस्थापक अध्यक्ष डॉ. संजय रोडगे, सचिव डॉ. सविता रोडगे, सदस्य डॉ. आदित्य रोडगे, मुख्याध्यापिका मीरा मिरिंडा तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. या यशामुळे प्रिन्स इंग्लिश स्कूलने राज्याच्या शैक्षणिक नकाशावर आपली वेगळी छाप उमटवली असून सेलू शहराच्या शैक्षणिक गौरवात भर घातली आहे.

हे यश सर्वांच्या एकत्रित प्रयत्नांचे फलित...

संस्थेचे अध्यक्ष डॉ. संजय रोडगे म्हणाले, हे यश केवळ विद्यार्थ्यांचे नसून पालकांचा विश्वास, शिक्षकांचे समर्पण आणि संस्थेच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणाच्या ध्येयाचा विजय आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आधुनिक शिक्षण, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन आणि मूल्याधिष्ठित शिक्षण यांचा समन्वय साधण्याचा आमचा सातत्यपूर्ण प्रयत्न आहे. भविष्यातही राज्य व राष्ट्रीय स्तरावर अधिकाधिक गुणवंत विद्यार्थी घडवून समाजाला सक्षम नेतृत्व देण्याचा आमचा संकल्प आहे, असेही ते म्हणाले.

### भाजप जिल्हाध्यक्ष भरोसे यांच्या हस्ते उद्घाटन

## असोला गाव आता पांदणमुक्त; १२ किलोमीटर पांदण रस्त्यांचे लोकार्पण

**परभणी,/प्रतिनिधी-:** असोला गाव पांदणमुक्त होण्याच्या ऐतिहासिक टप्प्याचे औचित्य साधत असोला ते परभणी पांदण रस्त्याचे लोकार्पण भारतीय जनता पक्षाचे परभणी महानगर जिल्हाध्यक्ष शिवाजी भरोसे यांच्या हस्ते उत्साहात संपन्न झाले. या विकासकामामुळे गावातील शेतकऱ्यांच्या अनेक वर्षांपासूनच्या पांदण रस्त्यांच्या समस्येला कायमस्वरूपी दिलासा मिळाला आहे.

या विकासकामांतर्गत असोला-परभणी, असोला-मुरुंबा, असोला-कारेगाव, मुरुंबा रोड ते गट क्रमांक २२७ तसेच तट्टूजवळील पांदण ते नागोराव भरोसे यांच्या शेतापर्यंतच्या मार्गांसह गावातील विविध पांदण रस्त्यांची कामे पूर्ण करण्यात आली. त्यामुळे असोला गाव अधिकृतपणे पांदणमुक्त झाल्याची घोषणा करण्यात आली. कार्यक्रमास सरपंच उमाकांत भरोसे, तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष दशरथ जावळे, माजी उपसरपंच व्यंकटी जावळे, पोलीस पाटील पंढरी रिक्षे, ग्रामपंचायत सदस्य पांडुरंग जावळे, बाळासाहेब जावळे यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

असोला गावातील सुमारे १२ किलोमीटर लांबीच्या पांदण रस्त्यांची कामे पूर्ण झाल्यामुळे सुमारे ७५० शेतकरी बांधवांना थेट लाभ मिळणार आहे. शेतापर्यंत जाण्यासाठी सुरक्षित, कायमस्वरूपी आणि सुलभ मार्ग उपलब्ध झाल्याने शेतीमालाची वाहतूक अधिक सोयीची होणार असून शेती व्यवसायालाही चालना मिळणार आहे.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी हे काम ग्रामविकासाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचे सांगितले. तसेच या विकासकामासाठी सहकार्य केल्याबद्दल राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे तसेच जिल्ह्याच्या पालकमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांचे आभार व्यक्त करण्यात आले. कार्यक्रमात ग्रामस्थांनी समाधान व्यक्त करत शेतकरी हिताला प्राधान्य देणाऱ्या या उपक्रमामुळे असोला गावाच्या विकासाला नवी दिशा मिळाल्याची भावना व्यक्त केली.



# विहीर अपघात रोखण्यासाठी राज्यव्यापी उपाययोजनांची मागणी

## मुख्यमंत्री फडणवीस यांना सुरेश भुमरे यांचे निवेदन, सोलर ब्लिंकर आणि लोखंडी जाळ्या बसविण्याची मागणी

**परभणी,/प्रतिनिधी-:** राज्यात गेल्या काही दिवसांपासून विहिरी व तलावांमध्ये पडून होणाऱ्या अपघातांमध्ये वाढ होत असल्याच्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पार्टीचे परभणी जिल्हाध्यक्ष सुरेश भुमरे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन सादर करून राज्यव्यापी प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविण्याची मागणी केली आहे.

मुख्यमंत्र्यांना दिलेल्या निवेदनात भुमरे यांनी नमूद केले आहे की, अलीकडच्या काळात विहिरी व तलावांमध्ये पडून होणाऱ्या अपघाती मृत्यूंचे प्रमाण चिंताजनकरीत्या वाढले आहे. पंढरपूर येथे विहिरीत वाहन कोसळून झालेली जीवितहानी तसेच परभणी जिल्ह्यातील जिंतूर येथे तीन मायलेकींचा झालेला दुर्दैवी मृत्यू या घटनांनी संपूर्ण राज्य हादरले आहे. विशेषतः ग्रामीण भागात मुले, महिला आणि शेतकरी कुटुंबे अशा दुर्घटनांचे बळी ठरत असल्याचे त्यांनी नमूद केले.

या पार्श्वभूमीवर रस्ता रुंदीकरण अथवा महामार्गालगत असलेल्या सर्व विहिरींना किमान साडेचार ते पाच फूट उंचीची भक्कम काँक्रीट संरक्षक भिंत (कठडा) बांधणे अनिवार्य करण्यात यावे, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच रस्त्यालगत असलेल्या धोकादायक विहिरींपूर्वी सुमारे ५० मीटर अंतरावर मोठे इशारा फलक लावून वाहनचालकांना सतर्क करावे आणि आवश्यक त्या ठिकाणी गतिरोधक बसवावेत, असेही निवेदनात म्हटले आहे. रात्रीच्या वेळी विहिरी सहज दिसाव्यात यासाठी संरक्षक भिंतींवर रेडियम पट्टे अथवा सोलर ब्लिंकर बसविण्यात यावेत. तसेच वाहने किंवा नागरिक थेट विहिरीत कोसळू नयेत यासाठी विहिरींवर मजबूत लोखंडी जाळ्या बसविणे हा कायमस्वरूपी उपाय असल्याचे भुमरे यांनी नमूद केले आहे. रस्त्यालगत होणारे विहीर अपघात रोखण्यासाठी या उपाययोजना तातडीने राबविणे आवश्यक असून संबंधित विभागांना याबाबत स्पष्ट सूचना व आदेश देण्यात यावेत, अशी मागणी सुरेश भुमरे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे.

### 'मिसिंग लिंक' प्रकल्पाला वीर शिंग्रोबा धनगर यांचे नाव देण्याची मागणी..

**मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावरील महत्त्वाकांक्षी 'मिसिंग लिंक' प्रकल्पाला वीर शिंग्रोबा धनगर यांचे नाव देण्यात यावे, अशी मागणी भारतीय जनता पार्टीचे परभणी जिल्हाध्यक्ष सुरेश भुमरे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे. यासंदर्भातील निवेदन त्यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांना सादर केले.**



## अग्रलेख

# वसाहतवादी वर्तनाचे ओझे...

पोलिसांचे काम समाजात शांतता-सुव्यवस्था राखण्यासाठी गुन्हेगारी रोखणे आणि गुन्हेगारांना दंडित करण्यासाठी व्यवस्थेला मदत करणे हे आहे. कायदा आणि सुव्यवस्था हा तसा राज्य सरकारच्या अखत्यारीतील विषय आहे. त्यामुळे पोलिस खाते संबंधित राज्य सरकारच्या अधिकारात काम करते. पोलिस महासंचालक, आयुक्त, अधीक्षक किंवा अन्य पदावरील आयपीएस अधिकारी पोलिस खात्यातले 'साहेब' असले, तरी हे खाते गृहमंत्री आणि मुख्यमंत्री यांच्या थेट नियंत्रणात असते. त्यामुळे पोलिसांच्या हातून घडलेल्या कोणत्याही त्रुटीसाठी, चुकीसाठी गृहमंत्री किंवा मुख्यमंत्र्यांना जबाबदार धरले जाते. त्यांची जबाबदारी थेट नसते; तरीही ते जबाबदार असतात. कारण अंतिम अधिकार त्यांचा असतो. प्रत्यक्ष काम करणारी यंत्रणा खाकी वर्दीवाल्यांची. त्यांची जबाबदारी कायद्याचे राज्य प्रस्थापित करण्याची. कायदा हातात घेण्याचा अधिकार त्यांना नाही. मात्र, बऱ्याच घटनांत पोलिस कायदा हातात घेतात. एखाद्या गुन्ह्याच्या घटनेचा रीतसर तपास करून न्यायालयात आरोपपत्र सादर करण्याची जबाबदारी पोलिसांची असते. त्यापूर्वी कायद्यानुसार एखाद्या व्यक्तीविरुद्ध गुन्हा (एफआयआर) पोलिसांना दाखल करता येतो. आरोपीला अटक करता येते. आणखीही काही अधिकार पोलिसांना आहेत, पण कायदा हातात घेण्याचा किंवा कायद्याच्या बाहेर वागण्याचा अजीबात नाही. अटक केल्यानंतर आरोपीला न्यायालयात उभे केले पाहिजे, हा नियम. न्यायालय अधिक तपास करण्यासाठी आरोपीला पोलिस कोठडी सुनावते आणि तपास पूर्ण झाला असेल तर न्यायालयीन कोठडीत म्हणजे तुरुंगात पाठवते. पोलिस कोठडीत अनेकदा कबुलीजबाब घेण्यासाठी आरोपींचा अमानुष छळ केला जातो, हे उघड गुपित आहे. पोलिस वारंवार थर्ड डिग्रीचा वापर करतात आणि त्यात आरोपीचा मृत्यू होतो, अशाही घटना घडल्या आहेत. वाशीम जिल्ह्यातील रिसोड येथे अशाच एका प्रकरणात आरोपीकडून गुन्ह्याची कबुली मिळविण्यासाठी पोलिसांनी त्याला बेदम मारहाण केली आणि त्यात आरोपीचा मृत्यू झाला. या प्रकरणात न्यायालयाने रिसोडच्या तत्कालीन ठाणेदारांसह ९ पोलिसांना जन्मठेपेची शिक्षा ठोठावली. मूळ घटना १५ वर्षांपूर्वीची आहे. एका चोरी प्रकरणात पोलिसांनी पारधी वस्तीवर धाड टाकली आणि एका आरोपीला उचलून कोठडीत डांबले. तेथे त्याला अमानुष मारहाण करण्यात आली. या मारहाणीत आरोपीचा मृत्यू झाला. या प्रकरणाचा तपास सीआयडीकडे सोपविण्यात आला आणि त्या यंत्रणेने या प्रकरणाचा तपास अतिशय प्रामाणिकपणे केला, हे न्यायालयाने दोषींना सुनावलेल्या शिक्षेवरून दिसून येते. खरे तर सीआयडीचा असा लौकिक नाही. मात्र, या प्रकरणात तसे घडले. पुढचा प्रश्न उरतोच आणि तो असा की, सीआयडीने अल्प काळात तपास पूर्ण करून आरोपपत्र दाखल केले असताना आरोपींना शिक्षा होण्यास दीड दशक कां जावे लागले?

कोठडीतील आरोपीच्या मृत्यूची ही महाराष्ट्रातील आणि देशातीलही पहिली घटना नाही. पोलिसांनी पारधी व्यक्तीला अटक केली होती. पारधी समाजावर ब्रिटिशांच्या काळापासून गुन्हेगार समाज म्हणून शिक्का लागला आहे. देशाला स्वातंत्र्य मिळून आठ दशके व्हायला आलीत. पारधी समाजावरचा हा कलंक अजूनही मिटलेला नाही. ते व्हावे यासाठी अनेक प्रयत्न झाले. अजूनही एखादा गुन्हा घडला की, अनेक ठिकाणचे पोलिस सर्वांत आधी पारधी समाजाच्या वस्तीवर धाड घालतात आणि काही पुरुषांना उचलून आणतात. गुन्हा कबूल करवून घेण्यासाठी त्यांना अमानुष मारहाण करतात. अनेक वेळा जीव वाचवण्यासाठी खोटी कबुली दिली जाते. आपल्या देशातील पोलिस खाते अजूनही इंग्रजी सत्तेच्या मानसिकतेतून बाहेर आलेले नाही. ब्रिटिशांच्या काळात पोलिस खाते भारतीय जनतेला गुलाम आणि गुन्हेगार समजत होते. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर पोलिसांचे मालक बदलले. भारतीय लोक सत्तेत आले. पण पोलिसांची एकाधिकारशाही, हुकूमशाही बऱ्यापैकी अजूनही इंग्रजकालीन पद्धतीची आहे. 'सद्रक्षणाय खलनिग्रहणाय' हे पोलिसांचे ब्रीदवाक्य. पण, आपल्या ब्रीदाला जागले पाहिजे, असे त्यांना नेहमी वाटत नाही, ही खरी समस्या. क्वचित ते वागतातही. पण, बहुतेकदा इंग्रजांच्या अधिकाऱ्यांसारखी त्यांची वर्तणूक असते. या खात्यात काही चांगले अधिकारी आणि कर्मचारी आहेत. त्यांची संख्या वाढण्याची आवश्यकता आहे. अनेक ठिकाणी पोलिसांवर खोट्या एन्काऊंटरचे आरोप होतात. नुकतीच बिहारमध्ये एन्काऊंटरची घटना घडली. या घटनेनंतर मोठा जनक्षोभ उसळल्यामुळे बिहार सरकारला त्याची दखल घ्यावी लागली. दोषी पोलिसावर आपण कारवाई केली, असे दाखवावे लागले. मात्र, सरकार कुणाचेही असले तरी ते पोलिसांच्या हातून घडलेल्या गुन्ह्याकडे गांभीर्याने पाहत नाही, हे सर्वत्र दिसते. सरकार सहसा पोलिसांच्या बाजूने असते. आता रिसोडचे प्रकरण बघा ना. खुनाचा आरोप लागलेल्या पोलिसांना निलंबित करण्यात आले होते. नंतर निलंबनाचा कालावधी संपल्यावर या सर्वांना कामावर रुजू करून घेण्यात आले. यातील चार आरोपी अजूनही पोलिस खात्याच्या सेवेत आहेत. कोणत्याही सरकारी वा निमसरकारी खात्यात नोकरी देण्यापूर्वी पोलिस पडताळणी केली जाते. एखाद्यावर पोलिसात गुन्हा दाखल असेल तर त्याला नोकरीसाठी अपात्र ठरवले जाते. मग खुनाचा आरोप असलेल्या पोलिसांना निलंबन कालावधी संपल्यावर पुन्हा सरकारी सेवेत रुजू कसे करून घेतले, असा प्रश्न येथे विचारला पाहिजे. त्यासोबतच वरिष्ठ अधिकाऱ्यांची जबाबदारीही ठरवली पाहिजे. एखाद्या गंभीर प्रकरणाच्या तपासात वरिष्ठ पोलिस अधिकारी पत्रपरिषद घेऊन माहिती देतात आणि त्याचे श्रेय घेत असतात. मग अशा घटनांतही त्यांना अपश्रेय दिले गेले पाहिजे. आपल्या कनिष्ठांवर नियंत्रण ठेवले नाही, कायद्यानुसार तपास करण्यास बाध्य केले नाही, असा ठपका वरिष्ठ अधिकाऱ्यांवर नक्कीच ठेवता येतो.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राजधानी दिल्लीतील तसेच इतरत्र वसाहतवादी मानसिकतेत बदल घडवून आणण्याचा प्रयत्न केला. अनेक रस्त्यांची ब्रिटिशकालीन नावे बदलली, राजपथचे कर्तव्यपथ केले, पंतप्रधान निवासस्थान असलेल्या ७-रेसकोर्सचे ७-लोककल्याण मार्ग केले. केंद्र सरकारने आता पोलिस दलाची वसाहतवादी मानसिकता बदलण्यासाठी पुढाकार घेतला पाहिजे. पोलिसांना मित्र माना वगैरे, सांगण्यासाठी ठिकाय. पण, वास्तवात त्यांच्या वाट्याला सज्जन माणूस जात नाही. आजही पोलिस ठाण्याची पायरी चढताना सर्वसामान्यांना, निरपराधांना भीती वाटते. ही भीती दूर करण्याची गरज आहे. स्वातंत्र्य फक्त राजकीय नसते. ते मानसिक देखील असते. आपल्या व्यवस्थेत आपले ऐकले जाईल, आपल्यावर कुणीही अन्याय-अत्याचार करू शकणार नाही आणि केलाच तर त्याला पोलिस पाहून घेतील, असा विश्वास सामान्यातल्या सामान्य माणसाला वाटला पाहिजे. सध्या होते असे की, आपल्याला कितीही त्रास होत असेल तरी लोक सहसा पोलिसांकडे जात नाहीत. अनेकदा तर अशीही भीती वाटत असते की, आपण ज्याच्याविरुद्ध तक्रार करण्यासाठी जात आहोत, त्यालाच पोलिस साथ देतील तर आपले काय होईल? कारण तसे घडले आणि घडते आहे. पारधी समाजासारख्या उपेक्षित समुदायातील व्यक्तींचे या व्यवस्थेत काय होत असेल, याची कल्पनाही करवीत नाही. खाकी वर्दीतला माणूस मित्र वाटावा, हा आदर्शवाद झाला. तो तसा वाटत नाही, हे वास्तव आहे. ते बदलण्यासाठी नुसते प्रयत्न आता पुरेसे नाहीत. विकसित राष्ट्राचे स्वप्न दोन दशकांवर येऊन ठेपलेले असताना पोलिसांच्या वसाहतवादी वर्तनाचे ओझे भारतीय लोकशाहीला परवडणारे नाही. ■

## यंगिस्तान

**जयेश शत्रुघ्न मेस्त्री**

# हिंदुस्थान आणि पाकिस्तानमधील अंतर

पाकिस्तानला पाण्याची समस्या सतावू लागली असल्याने अचानक त्यांना त्यांच्या मूळ सिंधू संस्कृतीची आठवण झाली आहे. त्याआधी ते स्वतःला अरबांचे वारस मानत होते. मात्र, अरब देशात या नकली वारसांना काडीचीही किंमत नाही. मुळात पाकिस्तानची निर्मिती ही कोणत्याही मानवी मूल्यावर झाली नव्हती, ती दानवी महत्त्वाकांक्षेवर झाली होती. एखाद्या मुलाने वडिलांकडे हव्यासाने मालमत्तेतला हिस्सा मागावा, त्यासाठी आसुरी वृत्तीने रक्ताचे पाट वाहावे आणि हिस्सा बळकावल्यानंतर आपल्या रानटी स्वभावानुसार ती मालमत्ता त्या मुलाने रक्ताच्या पाटाप्रमाणे वाहून द्यावी. त्याचप्रमाणे पाकिस्तान मागणाऱ्यांनी आज पाकिस्तानचे आतंकीस्तान करून टाकले आहे. वाचकहो, तुम्हाला जॉन अब्राहमची प्रमुख भूमिका असलेला 'द डिप्लोमॅट' हा चित्रपट माहीत असेलच. उझमा अहमद नावाच्या एका भारतीय मुलीची सत्यकथा पडद्यावर मांडण्यात आली आहे. उझमा ही पाकिस्तानमध्ये अडकते आणि तिला जबरदस्तीने एका पाकिस्तानी व्यक्तीशी लग्न करण्यास भाग पाडले जाते. तिच्यावर भयंकर अत्याचार केले जातात. मग पुढे पाकिस्तानमध्ये अडकलेल्या उझमाची सुटका करण्यासाठी भारतीय दूतावासाने केलेले प्रयत्न, जॉन अब्राहमने साकारलेला 'डिप्लोमॅट' आणि त्यामागे असलेले भारताचे अखंड पाठबळ, हे सर्व काही आपल्याला या चित्रपटात पाहायला मिळते. भारत आपल्या लेकींना कधीही एकटे सोडत नाही. ही कथा पाकिस्तानमधील महिलांच्या स्थितीवर आणि त्यांना भोगाव्या लागणाऱ्या अत्याचारांवरही प्रकाश टाकते.

आता वळूया सीमा हैदरकडे. पाकिस्तानमधून भारतात आलेल्या सीमा हैदरने आपल्या चार मुलांसह सचिन मीना नावाच्या भारतीय तरुणाशी लग्न केले. पबजी गेम खेळताना सुरू झालेल्या या प्रेमकथेने दोन्ही देशांमध्ये मोठी खळबळ उडवून दिली. सीमा हैदरची भारतात येण्याची पद्धत कायदेशीर नसली, तरी तिने प्रेमासाठी घेतलेला हा धोका आणि त्यानंतर तिला भारतात मिळालेला स्वीकार, हे भारतीय समाजाच्या उदारमतवादी आणि प्रेमाला महत्त्व देणाऱ्या स्वभावाचे प्रतीक आहे. आज सीमा हैदर भारतात आनंदात राहत आहे, तिला भारतीय संस्कृतीने आणि समाजाने स्वीकारले आहे. काही लोकांचे म्हणणे आहे की, सीमा ही पाकी गुप्तहेर आहे. मात्र त्यावर लक्ष ठेवायला सरकारमधील संबंधित मंत्रालय आणि अधिकारी समर्थ आहेत. मी इथे प्रेम, विश्वास, आपुलकी, संस्कृती या मुद्यावर जोर देऊ पाहत आहे. एक भयंकर बातमी टीव्हीवर झळकतेय. ही बातमी आहे सेल्वी यास्मिना नावाच्या या फ्रेंच महिलेची. सेल्वी यास्मिना ही अतिशय सुंदर आणि सुशिक्षित तरुणी होती. २००३ मध्ये तिने ऑस्ट्रेलियात एका पाकिस्तानी माणसाशी लग्न केलं. तिला त्या पाकी माणसामध्ये आपलं प्रेम दिसलं, त्या माणसानेही तिला विश्वासात घेतलं. मुळात जिहादी संस्कृतीतले लोक समोरच्याला भुलवण्यामध्ये अत्यंत तरबेज असतात. तर झालं असं, या प्रेमात पडलेल्या महिलेने ऑस्ट्रेलियात काही वर्षे सुखाचा संसार केला. आतापर्यंत त्यांना दोन गोंडस मुलं झाली होती. सेल्वी यास्मिनाने २०१४ मध्ये आपल्या पतीसोबत पाकिस्तानात जाण्याचा निर्णय घेतला. पण या एका निर्णयाने तिचे सबंध आयुष्य डळमळीत झालं. हा निर्णय म्हणजे तिची सर्वात मोठी चूक... पाकिस्तानात पोहोचल्यावर तिला आणि तिच्या मुलांना तिच्या पतीने १२ वर्षे कैद करून ठेवले. तिला मारहाण केली, अत्याचार केले आणि तिच्या स्वातंत्र्यावर गदा आणली. तिला ज्या खोलीत ठेवले गेले ती खोली खूप लहान आणि गलिच्छ होती. विचार करा हा पाकी जिहादी तरुण इतकी वर्षे ऑस्ट्रेलियात राहिला तरी त्याची मूळ विकृत विचारसरणी गेली नाही. ती विचारसरणी त्याच्या मनातच होती, पण तो सभ्य असल्याचा अभिनय करीत राहिला. त्याच्या पापभूमीत पोहोचल्यावर त्याचा सभ्यपणा गायब झाला. तिच्या एका मुलाने धाडस केल्याने या महिलेची आता १२ वर्षांनंतर सुटका झाली आहे. यास्मिनाने तपास अधिकाऱ्यांना सांगितले की, पाकिस्तानात आल्यापासून ती मुक्तपणे जगू शकत नव्हती आणि तिचा बाह्य जगाशी संपर्क पूर्णपणे तुटला होता. पोलिसांच्या माहितीनुसार, तिला इतर लोकांना भेटण्याची परवानगी नव्हती तसेच कुटुंबातील दोन मोठ्या मुलांचे शिक्षणाची अनेक वर्षे वाया गेली. पाकिस्तानात जन्मलेल्या तीन लहान मुलांना तर कधीच शाळेत दाखल करण्यात आले नव्हते. स्थानिक प्रसारमाध्यमांनी प्रसिद्ध केलेल्या निवेदनात यास्मिना म्हणाली, 'मला वाटले की माझे भविष्य आधीच उद्ध्वस्त झाले आहे आणि मुलांचे भविष्यही उद्ध्वस्त होईल.' सुरक्षेच्या कारणास्तव यास्मिना आणि तिच्या मुलांना पेशावरमधील महिला निवारा केंद्रात हलवण्यात आले आहे. तिने फ्रान्सला परतण्याची इच्छा व्यक्त केली असून पाकिस्तानी अधिकारी तिच्या मायदेशी परतण्याबाबत संबंधित अधिकारी आणि फ्रेंच दूतावासाशी समन्वय साधत असल्याचे सांगत आहेत.

आता या दोन कथांची तुलना करा. एकीकडे सीमा हैदर, जी प्रेमासाठी विश्वासाने भारतात येते. भारतीय समाज तिचा स्वीकार करतो. तिच्या प्रेमाचा आदर केला गेला. तिच्यावर कोणतीही जबरदस्ती झाली नाही, तिला कैद केले गेले नाही की तिच्या स्वातंत्र्यावर गदा आणली नाही. उलट, तिला इथे एक नवीन आयुष्य, एक नवीन ओळख मिळाली. भारतीय संस्कृतीने तिला आपलेसे केले. कारण भारतीय समाज हा प्रेमाला आणि मानवी संबंधांना सर्वोच्च मानतो. इथे व्यक्तीच्या भावनांना, तिच्या निवडीला महत्त्व दिले जाते. दुसरीकडे, सेल्वी यास्मिना. प्रेमाच्या आशेने, विश्वासाने एका पाकिस्तानी व्यक्तीशी लग्न करून पाकिस्तानात जाते; पण तिथे तिला काय मिळते? १२ वर्षांची कैद, मारहाण, अत्याचार आणि स्वातंत्र्याचा पूर्ण अभाव. ज्या व्यक्तीवर तिने विश्वास ठेवला, ज्याच्यासोबत संसार थाटला, त्याच व्यक्तीने तिला आणि तिच्या मुलांना नरकयातना दिल्या. हा काही एका व्यक्तीचा क्रूरपणा नाही, हा क्रूरपणा व्यक्तिसापेक्ष नाही, तर ही एका विशिष्ट मानसिकतेची, एका विचारसरणीची स्वाभाविक वृत्ती आहे. या संस्कृतीत महिलांना केवळ वस्तू मानले जाते, त्यांच्यावर वर्चस्व गाजवले जाते आणि त्यांच्या भावनांना कवडीचीही किंमत दिली जात नाही.

भारताची 'रामायण संस्कृती' ही प्रेम, त्याग, सहिष्णुता, आदर आणि मानवी मूल्यांवर आधारित आहे. इथे स्त्रीला आदराने पाहिले जाते, तिला शक्तीचे रूप मानले जाते. भारतीय संस्कृती ही 'वसुधैव कुटुंबकम्' या तत्त्वावर चालते, जिथे संपूर्ण जगाला एक कुटुंब मानले जाते. इथे प्रेम हे पवित्र मानले जाते आणि ते कोणत्याही बंधनांच्या पलीकडचे असते. आपल्या संस्कृतीत 'अतिथी देवो भव' हे मूल्य जपले जाते. इथे आलेल्या पाहुण्याला देवाप्रमाणे मानले जाते. कारण भारताच्या अणू-रेणूत राम आहे. इथली गुन्हेगारी मानसिकता ही व्यक्तिसापेक्ष आहे, ती संस्कृतीचा भाग नाही. याउलट, सेल्वी यास्मिनाच्या कहाणीतून दिसणारी 'जिहादी मानसिकता' ही कट्टरता, द्वेष, फसवणूक आणि महिलांवरील अत्याचारावर आधारित आहे. ही मानसिकता केवळ वाळवंटातील रुक्ष संस्कृतीचे प्रतीक आहे. ही मानसिकता पराकोटीच्या प्रतिगामी विचारांमधूनही येते, जिथे महिलांना दुय्यम स्थान दिले जाते, त्यांच्या स्वातंत्र्यावर गदा आणली जाते आणि त्यांना केवळ उपभोगाची वस्तू मानले जाते. हिंदुस्थान आणि पाकिस्तानमधील हे अंतर केवळ भौगोलिक नाही तर ते वैचारिक आणि सांस्कृतिक आहे. एकीकडे प्रेमाला आणि मानवी मूल्यांना जपणारी 'रामायण संस्कृती' आहे, तर दुसरीकडे कट्टरता, द्वेष आणि अत्याचाराला खतपाणी घालणारी 'रुक्ष वाळवंती मानसिकता' आहे. ■

writerjayeshmestry@gmail.com

## वेध

**अनिल उमाकांत फेकरीकर**

# एनसीसीत सहभागी व्हा अन् रोजगार मिळवा !

पदवीचे ओझे खांद्यावर घेऊन फिरतोय, रोजगाराच्या शोधात स्वतःलाच विसरतोय. अशाच स्वरूपाचे निराशाजनक भयावह चित्र आपल्याला सभोवताल दिसते. याकरिता कुठल्याही सुक्ष्मदर्शक यंत्राची गरज भासत नाही. पण मग आपण ही समस्या सतत चघळत ठेवत युवकांची माथी खराब करायची की यातून मार्ग शोधून यश मिळवायचे, हा निर्णय सर्वस्वी आपल्याच हाती आहे. असाच विचार एनसीसी महाराष्ट्र संचालनालयाचे अतिरिक्त महासंचालक मेजर जनरल विवेक त्यागी यांनी केला. त्यांना अशा भयावह स्थितीतही एक राजमार्ग सापडला अन् त्यांनी तो अनुसरून एनसीसीचा कोर्स पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी रोजगारासाठी आवश्यक कौशल्य मिळविण्याची संधीच भारत सरकारने सुरू केलेल्या पंतप्रधान इंटर्नशिप योजनेमार्फत उपलब्ध करून दिली आहे. त्यागी यांनी काही कंपन्यांशी बोलून राष्ट्रीय छात्र सेनेचा कोर्स पूर्ण करणाऱ्या शिस्तबद्ध विद्यार्थ्यांना पीएमआयएस योजनेत संधी मिळावी याकरिता प्रयत्न केले. हा पुढाकार म्हणजे रोजगार निर्मितीचा फफार मोठा फॉर्म्यूला मानायला हवा. पहिल्यांदाच अशा स्वरूपात मुला-मुलींसाठी एनसीसीने विचार करावा, ही नक्कीच अभिनंदनीय बाब म्हणावी लागेल.

'ध्येय असावे उंच, नजर असावी तीक्ष्ण, परिश्रम असावेत प्रामाणिक, यश मिळेल निश्चित' हा मंत्र ज्यांना उमगला त्यांना आयुष्यात यशोशिखर गाठण्यासाठी कुणीही रोखू शकत नाही. याकरिता एकता आणि शिस्त अनुसरावी लागते. जेव्हा ते गुण जो आत्मसात करतो तो नक्कीच रोजगार मिळवितो; नव्हे समजा हा फॉर्म्यूला सर्वांनी स्वीकारला तर नक्कीच देशातील बेरोजगारी चमत्कारिक पद्धतीने संपुष्टात येऊ शकते. अशा स्वरूपाची किमया प्रत्यक्षात व्हावी म्हणूनच एनसीसीने घेतलेला पुढाकार इतर संस्थांसाठी प्रेरणादायी ठरू शकतो. एनसीसी म्हणजे नॅशनल कॅडेट कॉर्प्स होय. तिला राष्ट्रीय छात्र सेना किंवा राष्ट्रीय विद्यार्थी सैनिक दल असेही संबोधले जाते. १५ जुलै १९४८ रोजी एनसीसी स्थापन झाली. ही भारतीय सशस्त्र दलाची एक युवा शाखा आहे. शाळा आणि महाविद्यालयातील विद्यार्थ्यांमध्ये देशभक्ती, शिस्त, नेतृत्वगुण आणि सेवेची भावना निर्माण करणे हे एनसीसीचे मुख्य ध्येय आहे. आता त्यात रोजगार निर्मिती हेही ध्येय समाविष्ट झाले आहे. लष्कर, नौदल आणि हवाई दल नेमके कसे कार्य करतात, याचा प्राथमिक अभ्यास यात मुला-मुलींना शिकविला जातो. एनसीसी आठव्या वर्गापासून सुरू होते तर पदवीपर्यंत त्यामार्फत विविध स्वरूपाचे प्रशिक्षण दिले जाते. यापोटी संबंधितांना ए, बी आणि सी प्रमाणपत्र मिळते. त्याचा नंतरच्या लष्करी करीअरमध्ये फार मोठा लाभ मिळत असतो. या एनसीसीचा लाभ शहरापासून गावखेड्यातील मुलांनाही झाला पाहिजे म्हणून भारतातील ७०० जिल्ह्यांमध्ये तिचा कार्यविस्तार करण्यात आला आहे. दरवर्षी सुमारे २० लाख कॅडेट्स एनसीसीत सहभागी होतात. त्यातील सुमारे ५ लाखांपेक्षा जास्त एनसीसी कॅडेट्स उत्तम दर्जाचे विविध स्वरूपातील प्रशिक्षण पूर्ण करून देशसेवेसाठी सज्ज होतात. एवढा हा विस्तार कुठल्याही इतर संघटनेचा नाही. दरम्यान, भारत सरकारची पंतप्रधान इंटर्नशिप योजना सुरू झाली आहे. त्यामार्फत सुमारे ५०० कंपन्यांमध्ये कामाचा प्रत्यक्ष अनुभव घेण्याची संधीही एनसीसीने आपल्या विद्यार्थ्यांसाठी अक्षरशः खेचून आणली आहे. याद्वारे तरुणांना कौशल्य विकासासोबत दरमहा ९ हजार विद्यावेतन मिळणार आहे. म्हणजे सर्वोत्तम कौशल्य आत्मसात करा; सोबत दररोज होणारा खर्चही भारत सरकारच्या योजनेतून मिळवा, अशी दुहेरी लाभ देणारी योजना नक्कीच चमत्कारिक आहे. पण माझ्याजवळ काम नाही असे म्हणत बोटं मोडणाऱ्या युवक-युवतींनी ही योजना समजून घ्यायला हवी. इच्छा असेल तर मार्ग मिळतो. मग एनसीसीने आपल्या शिस्तबद्ध विद्यार्थ्यांसाठी असा राजमार्ग मिळवून दिला तर नक्कीच त्याचा लाभ प्रत्येकाने मनापासून घ्यायलाच हवा. विशेष म्हणजे एनसीसीचे प्रमाणपत्र ज्यांना मिळते, त्यांच्याकरिता लष्करी सेवा, बीएसएफ, पोलिस दलात जाण्याचाही मार्ग मोकळा असतो. म्हणूनच आता विचार करा पक्का आणि एनसीसीचे प्रशिक्षण पूर्ण करून जीवनात चमत्कार घडवा..! असे सांगायची वेळ आलेली आहे. आज एनसीसीचे प्रशिक्षण ऐच्छिक आहे. पण जागतिक पातळीवर सुरू असलेल्या घडामोडी पाहता एनसीसी प्रशिक्षण कदाचित सरसकट सर्वांना लागू करावे लागेल. शेवटी, यश मिळविण्यासाठी कुठलीही लिफ्ट नसते. याकरिता कष्टाचा जिनाच चढावा लागतो, हे सदैव स्मरणात ठेवा. ■

९८८१७१७८५९

## मुंबई वार्तापत्र

**नागेश दाचेवार**

# नियतीचा फेरा !

काळ मोठा बलवान असतो, असे म्हणतात ते उगीच नाही. सत्तेचा अमरपट्टा घेऊन आल्याच्या थाटात वावरणाऱ्यांना काळ आणि नियती कशी जमिनीवर आणते, याचे मूर्तिमंत आणि जिवंत उदाहरण म्हणजे सध्याचे 'जनाब' उद्धव ठाकरे. शुक्रवारी त्यांनी एक पत्रकार परिषद घेतली. या पत्रकार परिषदेत उद्धव ठाकरेंनी एक घोषणा केली आणि संपूर्ण महाराष्ट्राला हसावे की संताप व्यक्त करावा, हेच कळेनासे झाले आहे. अयोध्येतील राम मंदिराच्या संदर्भात कथित गळती आणि चोरीच्या प्रकरणाचे भांडवल करत, आम्ही अयोध्येत जाऊन रामरक्षा आणि हनुमान चालीसा म्हणू, अशी वल्गना ठाकरेंनी केली. ही घोषणा ऐकताना महाराष्ट्रातील प्रत्येक नागरिकाच्या मनात एकच विचार आला असेल? हा तोच नेता आहे ना, ज्याने मुख्यमंत्री असताना याच हनुमान चालीसाला कडाडून विरोध केला होता... ज्याच्या काळात हनुमान चालीसा म्हणणे हा राजद्रोहाचा गुन्हा होता... हनुमान चालीसा म्हणणाऱ्यांवर गुन्हा दाखल करून ११ दिवस तुरुंगात डांबले होते.

राजकारणात सोयीनुसार भूमिका बदलणे नवीन नाही, पण उद्धव ठाकरेंनी मात्र यातही संधिसाधूपणाचा नीचांक गाठला आहे. अडीच वर्षे राज्याचे मुख्यमंत्री असताना याच उद्धव ठाकरेंनी सत्तेच्या हव्यासापोटी हिंदुत्वाला तिलांजली दिली होती. अजान स्पर्धा भरवली होती. ज्या काँग्रेस आणि राष्ट्रवादीला हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरेंनी जन्मभर विरोध केला, ज्यांच्या विचारांशी कधीही तडजोड केली नाही, त्याच काँग्रेसच्या मांडीला मांडी लावून बसताना उद्धव ठाकरेंना कधीही संकोच वाटला नाही. किंबहुना, 'सेक्युलर' बनण्याच्या आणि सोनिया गांधींना खूश करण्याच्या नादात, केवळ आपल्या वैयक्तिक, राजकीय स्वार्थासाठी, सत्तालालसेपोटी वारंवार हिंदुत्वाशी गद्दारी करणारे जनाब उद्धवांनी स्वतःच्याच पक्षाची आणि हिंदुत्वाची मूळ ओळख पुसून टाकली आहे; आणि आता रामरक्षा आणि हनुमान चालीसा म्हणण्याच्या वल्गना करीत आहेत.

आज अयोध्येत जाऊन हनुमान चालीसा म्हणण्याची भाषा करणाऱ्या ठाकरेंना त्यांचा स्वतःचा भूतकाळ एवढ्या लवकर कसा विसरता येतो? त्यावेळी खासदार असलेले नवनीत राणा आणि आमदार रवी राणा या दाम्पत्याने जेव्हा वांद्रे येथील 'मातोश्री' या उद्धव ठाकरेंच्या घराबाहेर केवळ हनुमान चालीसा म्हणण्याची इच्छा व्यक्त केली होती, तेव्हा याच उद्धव ठाकरे यांच्या अधिपत्याखाली असलेल्या महाविकास आघाडी सरकारने त्यांच्यावर राजद्रोहासारखे अत्यंत गंभीर गुन्हे दाखल केले होते. त्यांना ११ दिवस तुरुंगात डांबले होते. केवळ रामाचे आणि हनुमानाचे नाव घेणे, हे मविआ सरकारच्या काळात इतके मोठे पाप झाले होते की, त्यासाठी संपूर्ण राज्ययंत्रणेचा गैरवापर करण्यात आला. सत्तेचा माज तेव्हा त्यांच्या डोक्यात एवढा भिनला होता की, आमच्या नादाला लागाल तर याद राखा, अशी धमकीच जणू ते महाराष्ट्रातील तमाम हिंदूंना देत होते. त्यावेळी हिंदू सणांवर निर्बंध लादणारे आणि पालघरमध्ये हिंदू साधूंची निर्घृण हत्या झाली तरी मूग गिळून गप्प बसणारे हेच ठाकरे होते, अमरावतीत 'सर तन से जुदा'सारख्या प्रकरणात दरोड्याचं स्वरूप देण्याचं पाप... हे जनता विसरलेली नाही. पण, नियतीचा फेरा बघा कसा असतो... आज सत्तेतून पायउतार व्हावे लागल्यानंतर, पक्ष हातातून गेल्यानंतर आणि स्वतःचे राजकीय अस्तित्व टिकविण्याची वेळ आल्यानंतर त्यांना पुन्हा एकदा रामाची आणि हनुमानाची आठवण येऊ लागली आहे. अयोध्येत भव्य राम मंदिराच्या उभारणीसाठी ज्यांनी आयुष्य वेचले, राम जन्मभूमी आंदोलनात ज्यांनी रक्त सांडले, त्यांच्यावर टीका करताना यांना आता रामरक्षा आठवतेय. अयोध्येतील काही किरकोळ मुद्यांचे आणि कथित चोरीच्या प्रकरणाचे राजकीय भांडवल करण्यासाठी आता यांना त्याच हनुमान चालीसाचा आधार घ्यावा लागतोय, ज्याला त्यांनी मुंबईत बंदी घातली होती. हनुमान चालीसा म्हणू नका यासाठी हजारो कार्यकर्ते रस्त्यावर उतरले होते. याला निव्वळ ढोंगीपणा नाही तर दुसरे काय म्हणायचे?

हा उद्धव ठाकरेंच्या राजकीय अधःपतनाचा आणि वैचारिक दिवाळखोरीचा जिवंत पंचनामा आहे. जेव्हा सत्ता हवी होती, तेव्हा हिंदुत्व अडगळीत टाकले. स्वातंत्र्यवीर सावरकरांचा सातत्याने अपमान करणाऱ्या राहुल गांधींच्या गळ्यात गळे घालताना यांचा स्वाभिमान कधीही दुखावला गेला नाही. आणि आता, जेव्हा निवडणुका तोंडावर आहेत, जनाधार घसरत चालला आहे, तेव्हा पुन्हा एकदा हिंदुत्वाचा बुरखा पांघरण्याची केविलवाणी धडपड सुरू आहे. बाळासाहेबांची शिवसेना अशी दुटप्पी कधीच नव्हती, ती रोखठोक होती. पण उद्धव ठाकरेंची शिवसेना आता केवळ एक तडजोड करणारी खाजगी कंपनी म्हणून उरली आहे. ठाकरे एक विसरत आहेत की, महाराष्ट्रातील जनता दूधखुळी नाही. सत्तेसाठी सोयीचे हिंदुत्व आणि विरोधात असताना ढोंगी हिंदुत्व, हा त्यांचा खेळ आता उघडा पडला आहे. प्रभू श्रीराम आणि संकटमोचक हनुमान हे हिंदूंच्या आस्थेचे, श्रद्धेचे विषय आहेत, ते ठाकरेंच्या राजकीय सोयीचे खेळणे नाहीत. ज्यांनी सत्तेच्या धुंदीत रामभक्तांचा आणि हनुमानभक्तांचा छळ केला, त्यांना आता अयोध्येत जाऊन रामरक्षा म्हणण्याचा कोणताही नैतिक अधिकार उरलेला नाही.

आज उद्धव ठाकरेंची अवस्था 'ना घर का, ना घाट का' अशी झाली आहे. काँग्रेससोबत गेल्याने पारंपरिक आणि कट्टर हिंदू मतदार कायमचा दुरावला आणि आता पुन्हा हिंदुत्वाचा आव आणल्याने नवीन 'सेक्युलर' मित्रपक्षही साशंक आहेत. नियतीचा हाच तो फेरा आहे, जो प्रत्येकाला त्याच्या कर्माची फळे याच जन्मी देतो. राणा दाम्पत्याला तुरुंगात पाठविणारे हात आज त्याच हनुमान चालीसाच्या पानांवरून फिरत आहेत, यातच काळाचा सर्वात मोठा न्याय दडलेला आहे. खऱ्या अर्थाने, हा उद्धव ठाकरेंच्या नकली हिंदुत्वाचा आणि राजकीय दुटप्पीपणाचा झालेला सर्वात मोठा आणि सणसणीत पंचनामा आहे. यावेळी अभिनेत्री आणि आता खासदार असलेल्या कंगना राणावत यांचे 'उद्धव आज मेरा घर तुटा है, कल तेरा घमंड तुटेगा' या वाक्याची आठवण झाल्याशिवाय राहत नाही. यालाच नियतीचा फेरा किंवा थट्टा म्हणतात! ■

९२७०३३३८८६

### आळंदीच्या मंदिराचा कळस आणि वारी

महाराष्ट्राच्या आध्यात्मिक नकाशावर आषाढी वारी ही एक अशी घटना आहे, जिथे लाखोंच्या संख्येने भक्त विठुरायाच्या भेटीसाठी नतमस्तक होतात. या वारीची सुरुवात होते ती आळंदीच्या संजीवन समाधी मंदिरातून. संत ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखीचे प्रस्थान होताना जे वातावरण असते, ते केवळ शब्दबद्ध करण्यापलीकडचे असते. वारकरी परंपरेत अशी श्रद्धा आहे की, जोपर्यंत माउलींच्या मंदिराच्या कळसाचे दर्शन होत नाही, तोपर्यंत वारीची पूर्णतः होत नाही. ही केवळ एक धार्मिक रीत नसून ती माउलींच्या आशीर्वादाची साक्ष मानली जाते. अनेकांच्या मनात प्रश्न येतो की, कळस खरोखरच हलतो का? धार्मिक दृष्टिकोनातून पाहिल्यास, हे एक गूढ आणि श्रद्धेचे प्रतीक आहे. वारकऱ्यांची अशी दृढ भावना आहे की, जेव्हा पालखी सोहळा सुरू होतो, तेव्हा माइलींना निरोप देण्यासाठी आणि आपल्या भक्तजनांना आशीर्वाद देण्यासाठी खुद्द देवच कळसाच्या रूपाने उपस्थित राहतात. टाळ-मृदंगांचा गजर, ज्ञानोबा माउली तुकाराम या जयघोषाने निर्माण होणारी ऊर्जा आणि भक्तांची उत्कटता यामुळे हे दृश्य डोळ्यांसमोर साकारते. परंतु, वारकऱ्यांसाठी हा अनुभव वैज्ञानिक नसून तो 'अनुभूती'चा आहे. त्यांना तो कळस हलताना दिसणे, म्हणजे माउलींनी पुढील प्रवासासाठी दिलेली परवानगी आणि आशीर्वादच वाटतो. वारी म्हणजे केवळ पंढरपूरला जाणे नव्हे, तर 'मी' पणा विसरून 'विठ्ठलमय' होणे होय. जेव्हा आळंदीहून माउलींच्या पादुका पालखीत विराजमान होऊन प्रस्थान ठेवतात, त्या क्षणी मंदिराचा कळस हलतो अशी भाविकांची श्रद्धा आहे. हे दर्शन वारकऱ्यांच्या थकलेल्या पावलांना पुढील अनेक दिवसांचा प्रवास करण्याची अफाट शक्ती देते. आजही जेव्हा पालखी सोहळा सुरू होतो, तेव्हा आळंदीच्या आकाशात घुमणारा 'माउली'चा गजर हेच सांगून जातो की, भक्तीच्या प्रवासात तर्कापेक्षा श्रद्धेची ओढ केव्हाही श्रेष्ठ असते.

**वर्षा आवदे**/नागपूर

■■■


### अचानक वाढीव येतेय् वीज बिल

प्रिय ग्राहकांनो, आपल्या लक्षात आले आहे का? गेल्या दोन महिन्यापासून वीज बिल दुपटीपेक्षा जास्त येत आहे. वीज मंडळ उन्हाळ्याचा फायदा तर घेत नाही ना, अशी शंका येत आहे. एप्रिलपर्यंत दरमहा वीज बिल सरासरी ४००० रुपये येत होते. त्यात अचानक वाढ होऊन गेल्या दोन महिन्यांपासून १४५०० रुपयांपर्यंत आलेले आहे. घर तेच, घरातील विद्युत उपकरणे तीच, मग हे बिल एकदम का वाढले? हा संशोधनाचा विषय आहे. उन्हाळा असल्यामुळे पंखे, कुलर व एसी जास्त प्रमाणात चालू असतील हे जरी खरे असले, तरी पण वीज बिलातील वाढ ही अविश्वसनीय वाटते. सबब, महाराष्ट्र वीज मंडळास विनंती आहे की, त्यांनी याबाबत योग्य तपासणी करून बिलांमध्ये सुधारणा करावी.

**शशिकांत दलाल**/नागपूर. ९८२२३६५१९०

■■■

## वाचक पत्रे



### काळाची पावले आणि बदलणारे राजकीय रंग!

शिवसेना (उबाठा) प्रमुख उद्धव ठाकरे आणि मनसे प्रमुख राज ठाकरे यांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याबद्दल अचानक आलेला कळवळा पाहून मराठीतील 'खाण तशी माती आणि वेळेनुसार नाती' ही म्हण प्रकर्षाने आठवते. कालपर्यंत ज्या देवेंद्र फडणवीस यांच्यावर टोकाची टीका केली जात होती, अगदी वैयक्तिक पातळीवर जाऊन दूषणे दिली जात होती, आज त्याच नेत्याची 'री' ओढताना ही मंडळी दिसत आहेत. ही केवळ राजकीय सोयीपोटी दाखवलेली लवचीकता आहे की या दोन्ही पक्षांना मुंबई महापालिकेच्या निवडणुकीच्या निमित्ताने मुंबईतील आपल्या खया राजकीय ताकदीची जाणीव झाली असावी, हा मोठा प्रश्न आहे. कोणत्याही संघटनेला किंवा पक्षाला उतरती कळा का लागते, याची प्रमुख कारणे पाहिली तर त्यात काळासोबत बदल न स्वीकारणे, भावनिक मुद्यांचा अतिरेक, मूळ विचारसरणीला तिलांजली देणे, नेतृत्वाचे आत्मपरीक्षणाकडे दुर्लक्ष आणि भूराजकीय व देशांतर्गत घडामोडींचे भान नसणे ही प्रामुख्याने समोर येतात.

दुर्दैवाने या दोन्ही पक्षांच्या बदलत्या भूमिकेत हीच कारणे स्पष्टपणे दिसून येत आहेत. शिवसेना (उबाठा) ने प्रथम हे लक्षात घेतले पाहिजे की, केवळ 'बाळासाहेबांची पुण्याई' या भांडवलावर कायमस्वरूपी पक्ष चालवता येत नाही. जोपर्यंत ते हे वास्तव स्वीकारत नाहीत, तोपर्यंत या पक्षाला उज्ज्वल भवितव्य असणे कठीण आहे.

संघटनात्मक रचनेत आणि कार्यपद्धतीत काळाच्या गरजेनुसार आवश्यक ते बदल या पक्षाने केले नाहीत. उलट, सत्तेच्या समीकरणांसाठी आपल्या मूळ प्रखर हिंदुत्वाच्या विचारसरणीला तिलांजली देऊन आणि काँग्रेससोबत युती करून त्यांनी स्वतःचे सर्वात मोठे राजकीय नुकसान करून घेतले आहे. स्थानिक भावनिक मुद्यांचे राजकारण एका मर्यादेपलीकडे चालत नाही; त्यामुळे काळाची पावले ओळखून दिशा बदलणे, हेच या दोन्ही पक्षांच्या अस्तित्वासाठी आणि भविष्यासाठी अनिवार्य ठरणार आहे. ■

**अविनाश देशपांडे**/पुणे

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# पंकजा मुंडे यांनी नवी दिल्लीत घेतली केंद्रीय आरोग्यमंत्री जे पी नड्डा यांची भेट



**नवी दिल्ली :** राज्याच्या पर्यावरण मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी आज नवी दिल्ली येथे केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री जे.पी. नड्डा यांची भेट घेतली. देशातील वाढत्या पर्यावरणीय समस्यांच्या पार्श्वभूमीवर आरोग्य क्षेत्रातून निर्माण होणाऱ्या प्रदूषणावर नियंत्रण आणण्यासाठी "राष्ट्रीय स्वच्छ आरोग्य पायाभूत सुविधा अभियान (NCHIM)" राबविण्याचा प्रस्ताव मांडून त्यांनी याचा सहानुभूतीपूर्वक विचार करण्याबाबत प्रदीर्घ चर्चा केली. या प्रस्तावाचा सकारात्मक विचार करू असं केंद्रीय मंत्री नड्डा यांनी यावेळी आश्वस्त केलं.

सार्वजनिक आरोग्य आणि पर्यावरण यांच्यातील वाढत्या प्रदूषणावरील परिणामांचा विचार करून हा महत्त्वपूर्ण उपक्रम ना. पंकजाताई मुंडे यांनी सुचविला असून तसे पत्र आज नड्डा यांना दिले. सरकारी रुग्णालये आणि वैद्यकीय महाविद्यालये ही आरोग्य सेवा पुरवित असताना मोठ्या प्रमाणावर सांडपाणी, जैववैद्यकीय कचरा, वायू प्रदूषण आणि रासायनिक दूषित पदार्थ निर्माण होतात. अपुऱ्या प्रक्रियेमुळे या सांडपाण्यातील जंतू, अँटिबायोटिक अवशेष आणि घातक रसायने पर्यावरणासाठी तसेच मानवी आरोग्यासाठी धोकादायक ठरत आहेत. विशेषतः अँटिमायक्रोबियल रेसिस्टन्स (AMR) सारख्या गंभीर समस्यांना यामुळे चालना मिळत असल्याचे तज्ज्ञांचे मत असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

अंतर्गत सर्व सरकारी रुग्णालये आणि वैद्यकीय संस्थांमध्ये सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प (STP) उभारणीसाठी विशेष निधी देण्याची तरतूद करण्याचा प्रस्ताव दिला आहे.शासकीय रुग्णालयांमध्ये डिझेल जनरेटरचा वापर कमी करून स्वच्छ ऊर्जा, इलेक्ट्रिक वाहने आणि हरित पायाभूत सुविधा (सौर ऊर्जा, पावसाचे पाणी साठवण, ऊर्जा कार्यक्षम प्रणाली) यांचा अवलंब करण्यावरही भर देण्यात येणार आहे.या मिशनअंतर्गत 'आरोग्य-पर्यावरण सर्वेक्षण प्रणाली' विकसित करून रोगांचे आकडे आणि प्रदूषण निर्देशांक यांचे एकत्रित विश्लेषण करण्यात येणार आहे. यामुळे धोरणनिर्मिती अधिक प्रभावी आणि वैज्ञानिक होण्यास मदत होईल असं त्या म्हणाल्या.

या मोहिमेमुळे पर्यावरण संरक्षण, सार्वजनिक आरोग्य सुधारणा आणि शाश्वत विकास उद्दिष्टे साध्य करण्यास मोठी मदत होईल असंही पंकजाताई मुंडे यांनी म्हटले आहे.

# अंबाजोगाईत एटीएम मशिन फोडली; तोडफोड करूनही चोरांच्या हाती लागली नाही रोकड

**अंबाजोगाई :** शहराच्या मध्यवर्ती भागात असलेल्या बस डेपोजवळील अण्णाभाऊ साठे चौकातील एटीएम केंद्राला मध्यरात्री अज्ञात चोरट्यांनी लक्ष्य केले. मशीनचे लॉक आणि कव्हर तोडून रोकड लुटण्याचा प्रयत्न त्यांनी केला, मात्र तंत्रज्ञानामुळे त्यांचा बेत फसला.

**अलर्टमुळे उघडकीस आला प्रकार :** एटीएम मशीनमध्ये बिघाड किंवा छेडछाड झाल्याचा अलर्ट कंपनीला मिळताच चॅनल एक्झिक्युटिव्ह भिमराव अंबादास बलखंडे घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी पाहणी केली असता, एटीएमचे बाह्य आवरण पूर्णपणे तुटले, लॉक खराब झालेले आणि आतमध्ये तोडफोडीचे अवशेष दिसून आले. मात्र सुदैवाने मशीनमधील संपूर्ण रक्कम सुरक्षित असल्याचे आढळले.

**सीटीव्हीत कैद झाले चेहरे :** एटीएममधील सीसीटीव्ही कॅमेरे सुरू असल्याने संपूर्ण घटना कॅमेऱ्यात रेकॉर्ड झाली आहे. फुटेजमध्ये दोन अज्ञात तरुण हत्यारे घेऊन एटीएम फोडताना स्पष्ट दिसत आहेत. सुमारे 15-20 मिनिटे त्यांनी मशीनशी झुंज दिली, पण आतपर्यंत पोहोचू शकले नाहीत.

**शहर पोलिसांकडून तपास सुरू :** भिमराव बलखंडे यांनी दिलेल्या तक्रारीच्या आधारे अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्यात दोन अज्ञातांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस हवालदार प्रकाश गायकवाड हे सीसीटीव्ही फुटेज आणि तांत्रिक पुराव्यांच्या आधारे आरोपींचा शोध घेत आहेत. वर्दळीच्या ठिकाणी घडलेल्या या धाडसी चोरीच्या प्रयत्नामुळे नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. पोलिसांनी लवकरच आरोपींना अटक करू, असा विश्वास अधिकाऱ्यांनी व्यक्त केला आहे.

# योगेश्वरी कन्या शाळेच्या मुख्याध्यापकपदी स्मिता धावडकर यांची नियुक्ती



**अंबाजोगाई :** येथील योगेश्वरी शिक्षण संस्थेच्या श्रीमती गोदावरी कुंकूलोळ योगेश्वरी कन्या शाळेच्या मुख्याध्यापकपदी स्मिता धावडकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. बुधवारी (दि.१) त्यांनी पदभार घेतला.

त्यांच्या नियुक्तीबद्दल योगेश्वरी शिक्षण संस्थेचे पदाधिकारी, मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, माजी विद्यार्थी, पालक तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

# विजय कोठुळे यांचे निधन



**माजलगाव, ता. ३ (बातमीदार) :** शहराजवळील चिंचगव्हान येथील रहिवाशी विजय सदाशिव कोठुळे (वय, ३९ वर्ष) यांचे गुरुवारी (ता. दोन) सकाळी ५ वाजता हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. रात्री छातीत तीव्र वेदना होत असल्याने ते स्वतः रात्री १ वाजता "संजीवनी हॉस्पिटलमध्ये" भरती झाले होते. त्यांच्यावर प्राथमिक उपचार करून डॉक्टरांनी त्यांना रात्री ३ वाजण्याच्या दरम्यान बीड येथे अन्जिओग्राफी करण्यासाठी रेफर केले; परंतु रस्त्यातच त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांच्या अकस्मात जाण्याने कोठुळे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळा आहे. विजय कोठुळे यांनी अल्पकाळात यशस्वी उद्योजक म्हणून ओळख निर्माण केली होती. दुपारी एक वाजता चिंचगव्हान स्मशानभूमीत त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले यावेळी त्यांनी जोडलेले असंख्य मित्रपरिवार, विविध खात्यातील अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. त्यांच्या पश्चात आई, पत्नी, एक मुलगा, एक मुलगी, भाऊ, भावजय असा परिवार आहे. चिंचगव्हानचे माजी सरपंच वसंत उगले यांचे ते मावसभाऊ होत.

**टी. सी. हरवली**

नामे उद्धव विष्णू राऊत 12 वी ( विज्ञान ) पासचा टी. सी. सुंदरराव सोळंके महाविद्यालय ते शाहूनगर दरम्यान हरवला आहे. कृपया सापडल्यास संपर्क साधावा.
संपर्क : 9423757327

# परळी धर्मापुरी रस्त्यावर सिमेंट फॅक्टरी रेल्वे फाटकावर होणार 57 कोटींचा उड्डाणपूल, धनंजय मुंडेंनी दिलेला शब्द पाळला






**मुंबई (प्रतिनिधी) :** धनंजय मुंडे यांच्या यशस्वी पाठपुराव्यामुळे परळी वैद्यनाथ विधानसभा मतदारसंघातील राष्ट्रीय महामार्ग मधील परळी ते धर्मापुरी रस्त्यावरील सिमेंट फॅक्टरी परिसरातील रेल्वे फाटक LC-T24 येथे रेल्वे उड्डाण पूल बांधण्याच्या 56.28 कोटी रुपयांच्या कामास केंद्र सरकारने प्रशासकीय मान्यता दिली असून तातडीने निविदा प्रक्रिया राबविण्याचे निर्देश केंद्र सरकारने दिले आहेत.

माजी मंत्री आ. धनंजय मुंडे यांनी याबाबत केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांच्या कडे याबाबत यशस्वी पाठपुरावा केला आहे.

सिमेंट फॅक्टरी परिसरातील रेल्वे फाटक स्थळी रेल्वे आल्यानंतर अगदी तासनतास वाहतूक ठप्प असायची, तसेच अनेक लहानमोठे अपघात घडत असत. मात्र आता हा प्रकल्प उभारल्याने संपूर्ण वाहतूक सुरळीत होणार आहे.

धनंजय मुंडे यांनी याबाबत नितीन गडकरी यांच्या कडे लेखी निवेदनाद्वारे विनंती केली होती.

दरम्यान हा प्रकल्प मंजूर केल्यानंतर केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या सह राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे तसेच राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा वहिनी अजितदादा पवार, सार्वजनिक बांधकाम मंत्री श्रीमंत छत्रपती शिवेंदर राजे भोसले, मंत्री पंकजाताई मुंडे यांसह केंद्र व राज्य शासनाचे आभार मानले आहेत.

# एमएस-सीआयटीच्या बळावर महाराष्ट्र होणार 'एआय रेडी'; एमकेसीएलच्या रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्त राज्यव्यापी मोफत एआय जनजागृती अभियान : विठ्ठल पांचाळ



**पुणे :** महाराष्ट्र ज्ञान महामंडळ (एमकेसीएल) आपल्या रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्त "आपण करूया महाराष्ट्र एआय रेडी" हे राज्यव्यापी जनजागृती अभियान राबवत असून, कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) तंत्रज्ञानाची माहिती राज्यातील प्रत्येक विद्यार्थी, युवक आणि जागरूक नागरिकांपर्यंत पोहोचविण्याचा महत्त्वाकांक्षी उपक्रम हाती घेतला आहे. २००१ साली महाराष्ट्र शासन आणि महाराष्ट्रातील विद्यापीठांच्या सहयोगातून स्थापन झालेल्या एमकेसीएलने गेल्या २५ वर्षांत एमएस-सीआयटी अभ्यासक्रमाच्या माध्यमातून दोन कोटींहून अधिक विद्यार्थ्यांना संगणक व डिजिटल साक्षरतेचे प्रशिक्षण देत महाराष्ट्राला डिजिटलदृष्ट्या सक्षम करण्यामध्ये महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. बदलत्या तंत्रज्ञानानुसार एमएस-सीआयटी अभ्यासक्रमात सातत्याने सुधारणा करण्यात आल्या असून, पारंपरिक संगणक शिक्षणाबरोबरच डिजिटल जीवनशैली, सायबर सुरक्षा, क्लाऊड सेवा, ऑनलाईन व्यवहार, ई-गव्हर्नन्स, डिजिटल संवाद, उत्पादकता साधने आणि कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) यांसारख्या आधुनिक विषयांचा प्रभावी समावेश करण्यात आला आहे. अनुभवाधारित शिक्षण, प्रत्यक्ष सराव आणि एआय साधनांचा जबाबदारीने वापर यावर विशेष भर देण्यात आल्यामुळे विद्यार्थी शिक्षण, रोजगार, उद्योग, व्यवसाय आणि उद्योजकतेसाठी अधिक सक्षम होत आहेत.

रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्त राज्यातील विद्यार्थ्यांसाठी ६० मिनिटांचा मोफत एआय मास्टरक्लास उपलब्ध करून देण्यात आला आहे. www.mscit.ai या संकेतस्थळावर नोंदणी केल्यानंतर विद्यार्थ्यांना वैयक्तिक स्वरूपातील ऑनलाइन मास्टरक्लास, एआयची सोपी ओळख, विविध क्षेत्रांतील उपयोग, करिअरच्या नव्या संधी तसेच अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर प्रशस्ती प्रमाणपत्र दिले जाणार आहे. या उपक्रमामुळे महाराष्ट्रातील विद्यार्थी भविष्यातील डिजिटल आणि एआय युगासाठी अधिक आत्मविश्वासाने तयार होतील, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे.

एमएस-सीआयटी हा केवळ संगणक अभ्यासक्रम नसून डिजिटल अर्थव्यवस्था, कौशल्याधारित शिक्षण आणि एआय-आधारित भविष्याचा मजबूत पाया ठरत आहे. त्यामुळे राज्यातील सर्व शाळा, महाविद्यालये, शिक्षक, विद्यार्थी, स्पर्धा परीक्षांची तयारी करणारे युवक-युवती तसेच सर्व स्तरातील जागरूक नागरिकांनी या राज्यव्यापी मोफत एआय जनजागृती अभियानाचा लाभ घ्यावा, असे आवाहन एमकेसीएलचे बीड जिल्हा समन्वयक श्री विठ्ठल पांचाळ यांनी केले आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या नव्या युगात प्रत्येक नागरिक एआय साक्षर होणे ही काळाची गरज असून, या उपक्रमात मोठ्या संख्येने सहभागी होऊन महाराष्ट्राला खऱ्या अर्थाने 'एआय रेडी महाराष्ट्र' बनविण्यास सर्वांनी योगदान द्यावे, असे आव्हान बीड जिल्हा एमकेसीएल समन्वय श्री विठ्ठल पांचाळ सर यांनी केले आहे

# सोमवारी मांस विक्री बंदीच्या अंमलबजावणीसाठी 16 जुलैपूर्वी लेखी आदेशाची मागणी; आंदोलनाचा इशारा



**परळी वैजनाथ | प्रतिनिधी :** परळी नगर परिषदेच्या सर्वसाधारण सभेत दि. 30 एप्रिल 2026 रोजी सर्वानुमते मंजूर झालेल्या "दर सोमवारी मांस विक्री बंदी" ठरावाची आजपर्यंत प्रभावी अंमलबजावणी न झाल्याने सामाजिक कार्यकर्ते शिवकुमार केदारी यांनी नगर परिषद प्रशासनाकडे पुन्हा एकदा निवेदन सादर केले आहे. निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, परळी हे प्रभू श्री वैद्यनाथांचे पंचम ज्योतिर्लिंग क्षेत्र असून धार्मिक भावना लक्षात घेऊन नगर परिषदेने सोमवारी मांस विक्री बंदीचा ठराव मंजूर केला होता. मात्र दोन महिन्यांहून अधिक कालावधी उलटून गेला, अधिक मासातील सोमवारही संपले, तरी शहरात अनेक ठिकाणी सोमवारी मांस विक्री सुरू असल्याचा दावा करण्यात आला आहे. केदारी यांनी यापूर्वी अनेक वेळा नगर परिषदेकडे निवेदने दिली असून दि. 04 जून 2026 रोजी या विषयाची माहिती मागण्यासाठी स्वतंत्र अर्जही सादर केला होता. तसेच विविध वर्तमानपत्रे, वृत्तवाहिन्या आणि सामाजिक माध्यमांतून सातत्याने पाठपुरावा करण्यात आला आहे. श्री वैद्यनाथ भक्ती मंडळाने केलेल्या उपोषणावेळी प्रशासनाकडून अंमलबजावणीचे आश्वासन देण्यात आले होते, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

दि. 15 जुलै 2026 पासून पवित्र आषाढ मास प्रारंभ होत असल्याने दि. 16 जुलै 2026 पूर्वी नगर परिषद प्रशासनाने अधिकृत लेखी आदेश काढून ठरावाची प्रभावी अंमलबजावणी करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. अन्यथा, दि. 16 जुलै 2026 रोजी सकाळी 11 ते सायंकाळी 5 या वेळेत नगर परिषद कार्यालयासमोर शांततापूर्ण, अहिंसक व लोकशाही मार्गाने एकदिवसीय ठिय्या आंदोलन करण्यात येईल, असा इशारा निवेदनाद्वारे देण्यात आला आहे. सदर निवेदनाच्या प्रती मुख्याधिकारी, नगराध्यक्षा, उपजिल्हाधिकारी तथा कार्यकारी दंडाधिकारी, तहसीलदार तसेच परळी शहर व संभाजीनगर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक यांना देण्यात आल्या असल्याचे शिवकुमार केदारी यांनी सांगितले.

# केज तालुक्यात पिकअपच्या धडकेत तरुणाचा मृत्यू

**केज :** केज तालुक्यातील तांबवा येथे महामार्गालगत रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या २६ वर्षीय तरुणाला भरधाव पिकअपने जोरदार धडक दिल्याने उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. वैभव इंद्रमोहन कराड (वय २६, रा. तांबवा) असे मृत तरुणाचे नाव आहे. शुक्रवारी (दि. ३) सायंकाळी सुमारे ६ वाजता ते केज–धारूर महामार्गा लगत त्यांच्या शेताजवळील रस्त्याच्या कडेला उभे होते. त्याचवेळी भरधाव वेगाने आलेल्या पिकअपने (मद्यधुंद अवस्थेतील चालक असल्याची माहिती) त्यांना जोरदार धडक दिली. अपघातानंतर गंभीर जखमी अवस्थेत वैभव कराड यांना तातडीने उपचारासाठी हलविण्यात आले, मात्र उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पिकअप वाहनासह चालकाला ताब्यात घेतले आहे. पुढील तपास सुरू आहे.

# आधार कार्डाअभावी वंचित दिव्यांगाला मिळाला दिलासा; तहसील कार्यालयातील आधार केंद्रात नोंदणी; नायब तहसीलदार बाहेती यांच्या हस्ते पावती प्रदान



**अंबाजोगाई :** आधार कार्ड नसल्यामुळे शासनाच्या विविध योजना व अत्यावश्यक सुविधांपासून वंचित राहिलेल्या १०० टक्के दिव्यांग असलेला माउली फड या व्यक्तीची आज तहसील कार्यालयातील आधार नोंदणी केंद्रात यशस्वीरित्या आधार पुनर्र नोंदणी करण्यात आली. माउली अनेक दिवसापासून या साठी फिरत होता अनेक ठिकाणी नोंदणी केली परंतु टी यशस्वी झाली नाही. आज तहसील कार्यालयात नायब तहसीलदार स्मिता बाहेती मॅडम यांना भेटायला त्याचे पालक गेले असता त्यांनी तात्काळ आधार केंद्रात घेऊन जाऊन माउली ची नोंदणी केली यामुळे संबंधित लाभार्थ्याला शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांचा लाभ घेण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

संबंधित दिव्यांग व्यक्तीला शारीरिक अडचणींचा विचार करून आधार नोंदणीची प्रक्रिया सुलभ व प्राधान्याने पूर्ण करण्यात आली. केंद्र चालक संतोष मोहिते व केंद्रातील कर्मचारी संतोष साखरे यांनी आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करून नोंदणीची प्रक्रिया तत्परतेने पार पाडली.

यावेळी मा. नायब तहसीलदार बाहेती मॅडम यांच्या हस्ते संबंधित लाभार्थ्यास आधार नोंदणीची पावती प्रदान करण्यात आली. याप्रसंगी त्यांनी प्रशासनामार्फत दिव्यांग, ज्येष्ठ नागरिक व गरजू नागरिकांना शासकीय सेवा सुलभपणे उपलब्ध करून देण्यासाठी सातत्याने प्रयत्न करण्यात येत असल्याचे सांगितले. कोणताही पात्र नागरिक केवळ कागदपत्रांच्या अभावामुळे शासनाच्या योजनांपासून वंचित राहू नये, यासाठी प्रशासन कटिबद्ध असल्याचेही त्यांनी नमूद केले.

या उपक्रमामुळे संबंधित दिव्यांग व्यक्तीला आधार कार्ड मिळाल्यानंतर विविध शासकीय योजना, सामाजिक सुरक्षा, बँकिंग, आरोग्य सेवा तसेच इतर शासकीय सुविधांचा लाभ घेणे सुलभ होणार आहे. या संवेदनशील उपक्रमाबद्दल उपस्थितांनी तहसील प्रशासनाच्या कार्याचे कौतुक केले.

हा उपक्रम केवळ आधार नोंदणीपुरता मर्यादित नसून सामाजिक बांधिलकी, मानवता आणि लोकसेवेची भावना जपणारा एक प्रेरणादायी उपक्रम ठरला. शासनाच्या सेवा प्रत्येक पात्र नागरिकापर्यंत पोहोचविण्यासाठी प्रशासन सातत्याने कटिबद्ध असून, कोणताही नागरिक केवळ कागदपत्रांच्या अभावामुळे हक्काच्या सुविधांपासून वंचित राहू नये, हा या उपक्रमामागील मुख्य हेतू आहे.

# श्री गजानन महाराज पालखी मार्गावरील खड्डे तातडीने बुजवा : नितीन बागवाले





**परळी वैजनाथ | प्रतिनिधी :** श्रीक्षेत्र शेगाव येथून पंढरपूरकडे प्रस्थान केलेला संतश्रेष्ठ श्री गजानन महाराजांचा भव्य पायी पालखी सोहळा दि. ८ जुलै २०२६ रोजी तीर्थक्षेत्र परळी वैजनाथ येथे दाखल होणार असून, या पार्श्वभूमीवर पालखी मार्गासह शहरातील प्रमुख रस्त्यांवरील खड्डे तातडीने बुजविण्याची मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार)चे गटनेते नितीन बागवाले यांनी नगर परिषदेचे मुख्याधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनात म्हटले आहे की, पालखी सोहळ्यानिमित्त हजारो वारकरी परळीत येतात. श्री वैद्यनाथ ज्योतिर्लिंगाच्या दर्शनासाठीही मोठ्या संख्येने भाविक शहरात दाखल होतात. मात्र, सध्या सुरू असलेल्या पावसामुळे पालखी मार्गासह शहरातील अनेक प्रमुख रस्ते आणि गल्लीबोळांमध्ये लहान-मोठे खड्डे पडले आहेत. या खड्ड्यांमध्ये पावसाचे पाणी साचत असल्याने वाहनचालक, पादचारी आणि नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत असून अपघाताच्या घटनांमध्येही वाढ होत असल्याचे त्यांनी नमूद केले आहे.

दि. ८ जुलै रोजी पालखी परळीत येण्यापूर्वी वारकऱ्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने पालखी मार्गावरील सर्व खड्डे तातडीने बुजवावेत. तसेच शहरातील प्रमुख रस्ते, वारकरी मार्ग आणि आवश्यक ठिकाणांची दुरुस्ती करून संपूर्ण पालखी मार्ग खड्डेमुक्त करावा, जेणेकरून वारकरी व नागरिकांना कोणत्याही प्रकारचा त्रास होणार नाही, अशी मागणीही नितीन बागवाले निवेदनातून करण्यात आली आहे.

# सोनपेठेत गुन्हा दाखल झाला अन् केजमध्ये काळाचा घाला! अभियंत्याचा ढाब्यासमोर थरारक अंत

**केज:** सोनपेठ नगरपंचायतीमध्ये घरकूल घोटाळ्याचा गुन्हा अद्याप ताजा असतानाच, या प्रकरणातील संशयित अभियंता सागर विजयकुमार देशपांडे (वय ३४) याचा केज तालुक्यातील मस्साजोग शिवारात एका भीषण अपघातात मृत्यू झाला आहे. बीडवरून अंबाजोगाईकडे जाणाऱ्या दुधाच्या पिकअप वाहनाने धडक दिल्याने हा अपघात घडला. सागर देशपांडे हा सोनपेठ नगरपंचायतीमध्ये पंतप्रधान आवास योजनेत (घरकूल योजना) अभियंता म्हणून कार्यरत होता. गुरुवारी (२ जुलै) दुपारी सोनपेठ नगरपंचायतीतील पंतप्रधान आवास योजनेत मोठा अपहार झाल्याप्रकरणी सोनपेठ पोलीस ठाण्यात सागर देशपांडे याच्यासह इतरांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्हा नोंद होताच अटकेच्या भीतीने किंवा कायदेशीर सल्लामसलतीसाठी तो केज नगरपंचायतीमध्ये कार्यरत असलेले आपला मित्र अभियंता ज्योतिबा घाडगे यांच्याकडे आला होता. गुरुवारी रात्री उशिरा केज येथील हॉटेलमध्ये जेवण्याऐवजी ते दोघे मित्र सागर देशपांडे यांच्या कारने मस्साजोग येथील एका ढाब्यावर जेवण्यासाठी गेले होते. जेवण आटोपल्यानंतर सागर देशपांडे हा लघुशंकेसाठी ढाब्यासमोरील रस्त्याच्या बाजूला गेला. याच वेळी बीडकडून अंबाजोगाईच्या दिशेने भरधाव जाणाऱ्या दुधाच्या पिकअप वाहनाने (एमएच ४४ यू ०९००) देशपांडे यास जोराची धडक दिली. या भीषण धडकेत तो गंभीर जखमी झाला.

# तृप्ती स्वीटचे मालक हरीशभाई खिलोशिया यांना यंदाचा आंतरभारतीचा स्नेहसंवर्धन पुरस्कार जाहीर; 15 ऑगस्ट रोजी होणार पुरस्कार वितरण सोहळा



**अंबाजोगाई :** आंतरभारती शाखा, अंबाजोगाई यांच्या वतीने दरवर्षी प्रदान करण्यात येणारा प्रतिष्ठेचा 'स्नेहसंवर्धन पुरस्कार' यावर्षी अंबाजोगाई शहरातील प्रसिद्ध तृप्ती स्वीट होमचे संचालक हरीश चुनीलाल खिलोशिया यांना जाहीर करण्यात आला आहे. येत्या १५ ऑगस्ट २०२६ रोजी स्वातंत्र्यदिनानिमित्त आयोजित विशेष कार्यक्रमात हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.

पुरस्काराचे हे 13 वे वर्ष आहे. 2014 साली पहिला पुरस्कार प्रचार्य डॉ बी आय खडकभावी यांना देण्यात आला होता. सन २०२५ चे स्नेहसंवर्धन पुरस्कार विजेते डॉ राजमान्य सर यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान केला जाणार असून, कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून आंतरभारतीचे राष्ट्रीय विश्वस्त अमर हबीब व आंतरभारती, पुणेच्या कार्याध्यक्ष सविता कुरुंदवाडे उपस्थित राहणार आहेत अशी माहिती आंतरभारती अंबाजोगाईच्या अध्यक्ष प्रा.डॉ. शैलजा बरुरे यांनी दिली.

**स्नेहसंवर्धन पुरस्काराची संकल्पना**

अन्य राज्यांतून येऊन आंबाजोगाईत स्थायिक झालेल्या व अंबाजोगाईच्या वैभवात भर घालणाऱ्या व्यक्तीला स्नेहसंवर्धन पुरस्कार दिला जातो. आंतरभारती शाखा, अंबाजोगाई यांच्या वतीने दरवर्षी 15 ऑगस्ट रोजी हां पुरस्कार' प्रदान केला जातो.

**तृप्ती स्वीटचे मालक**

यावर्षीचे पुरस्कारार्थी हरीश चुनीलाल खिलोशिया यांनी गुजरात राज्यातील राजकोट येथून अंबाजोगाईमध्ये येऊन शहराच्या मध्यवर्ती भागात तृप्ती स्वीट होमची स्थापना केली. आपल्या गुणवत्तापूर्ण सेवेमुळे आणि ग्राहकांच्या विश्वासाच्या बळावर त्यांनी अल्पावधीतच स्वतःचे वेगळे स्थान निर्माण केले असून, अंबाजोगाईच्या व्यापारी व सामाजिक वैभवात उल्लेखनीय योगदान दिले आहे. त्यामुळे त्यांची या पुरस्कारासाठी निवड करण्यात आल्याचे आंतरभारतीच्या वतीने डॉ शैलजा बरुरे यांनी स्पष्ट केले.

**आर्थिक सहकार्याचे आवाहन**

हा पुरस्कार केवळ आंतरभारती संस्थेचा नसून, संपूर्ण अंबाजोगाईकरांच्या स्नेह, एकात्मता आणि कृतज्ञतेचे प्रतीक असल्याची भावना आयोजकांनी व्यक्त केली आहे. त्यामुळे या पुरस्कार सोहळ्याच्या यशस्वी आयोजनासाठी शहरातील सुजाण नागरिकांनी स्वेच्छेने फक्त १०० रुपयांचे आर्थिक सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

इच्छुक नागरिकांनी स्नेहसंवर्धन पुरस्कार कार्यक्रमाचे संयोजक व्यंकटेश जोशी यांच्या 8600497650 या मोबाईल क्रमांकावर सहकार्याची रक्कम पाठवून कार्यक्रमात आपला सहभाग नोंदवावा, असे आवाहन आंतरभारती शाखा अंबाजोगाईच्या वतीने करण्यात आले आहे.

# अवैध मुरूम उत्खनन प्रकरण गाजले; समृद्धी महामार्गाच्या कंत्राटदार कंपनीविरुद्ध गुन्हा, उच्चस्तरीय चौकशीची तयारी

## आमदार बबनराव लोणीकर यांच्या पाठपुराव्याला यश; महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या दालनात उच्चस्तरीय बैठकीचे आयोजन



**तभा वृत्तसेवा**
**जालना । प्रतिनिधी**

जालना-नांदेड समृद्धी महामार्गाच्या बांधकामादरम्यान झालेल्या कथित अवैध मुरूम उत्खनन, तांत्रिक अनियमितता आणि शासनाच्या महसूलाच्या नुकसानीच्या प्रकरणाला मोठे वळण मिळाले आहे. माजी मंत्री तथा परतूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार बबनराव लोणीकर यांनी हा मुद्दा महाराष्ट्र विधानसभेत उपस्थित करून महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे उच्चस्तरीय चौकशीची मागणी केली होती. त्यानंतर आता –झउज खपषीरींशलह झ्रीीं. डींव. या कंत्राटदार कंपनीविरुद्ध परतूर पोलीस ठाण्यात सार्वजनिक संपत्ती नुकसान प्रतिबंधक अधिनियमाच्या कलम ३ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

लघु पाटबंधारे विभागाचे स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक योगेश राजू वैद्य यांनी दिलेल्या फिर्यादीवरून एफआयआर क्रमांक ०३२४/२०२६ नोंदविण्यात आला असून पुढील तपास परतूर पोलीस करत आहेत. फिर्यादीनुसार, नागथास बृहत लघु पाटबंधारे प्रकल्प परिसरात मुरूम उत्खननासाठी परवानगी असताना मंजूर रॉयल्टीचे प्रमाण संपल्यानंतरही तलावाच्या भिंतीलगत सुमारे १५ ते २० फूट खोल खड्डे खोदून मोठ्या प्रमाणात मुरूमाचे उत्खनन करण्यात आले. या उत्खननामुळे तलावाच्या संरक्षणभिंतीला गंभीर धोका निर्माण झाला असून भविष्यात तलाव फुटण्याची शक्यता निर्माण झाल्याचे नमूद करण्यात आले आहे. अशी घटना घडल्यास शेकडो हेक्टर शेतीचे नुकसान होऊन मोठी आर्थिक व जीवितहानी होऊ शकते, असा इशाराही फिर्यादीत देण्यात आला आहे. दरम्यान, आमदार बबनराव लोणीकर यांनी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांना दिलेल्या निवेदनात समृद्धी महामार्गाच्या कामाच्या गुणवत्तेवरही गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत. मंजूर भराव साहित्याऐवजी काळ्या मातीचा वापर करण्यात आल्याचा आरोप त्यांनी केला असून या मातीमध्ये दगड-गोटे मिसळून भराव टाकण्यात आल्याचे नमूद केले आहे. नियमानुसार दोन ते तीन फुटांचे थर देणे, रोलरद्वारे दाबणी करणे, घनता चाचण्या घेणे आणि गुणवत्ता नियंत्रणाची प्रक्रिया राबविणे आवश्यक असताना त्याकडे दुर्लक्ष झाल्याचा आरोप करण्यात आला आहे. आमदार लोणीकर यांनी एमएसआरडीसीच्या अधीक्षक अभियंता, कार्यकारी अभियंता आणि उपअभियंता यांच्यावरही गंभीर आरोप केले आहेत.

गुणवत्ता नियंत्रण, मुरूम उत्खननाची तपासणी, जीपीएस पडताळणी, प्रयोगशाळा चाचण्या आणि साइट निरीक्षण यामध्ये निष्काळजीपणा झाल्याचा दावा त्यांनी केला आहे. वेळेत कारवाई झाली असती तर कथित अवैध उत्खनन रोखता आले असते, असेही त्यांनी म्हटले आहे. उपलब्ध नोंदीनुसार मंठा तालुक्यातील १६ अल्पमुदत परवान्यांमधून ८१ हजार ८७५ ब्रास मुरूम उत्खननास परवानगी देण्यात आली होती. त्यापैकी नऊ प्रकरणांच्या ईटीएस मोजणीत परवानगीपेक्षा अधिक उत्खनन झाल्याचा दावा करण्यात आला आहे. तसेच दहिफळ भोंगाणे येथील नागथास प्रकल्पातून विनापरवाना उत्खनन झाल्याचाही आरोप करण्यात आला असून दोन्ही मिळून ८२ हजार ५८९.४७ ब्रास अतिरिक्त उत्खनन झाल्याचे नमूद करण्यात आले आहे. परतूर तालुक्यातील २५ अल्पमुदत परवान्यांद्वारे २ लाख १७ हजार ४८० ब्रास मुरूम उत्खननास मंजुरी देण्यात आली होती. त्यापैकी २२ प्रकरणांच्या ईटीएस मोजणीत अतिरिक्त उत्खनन झाल्याचा दावा करण्यात आला असून हेलसवाडी येथील पाझर तलाव क्रमांक १ मधून परवानगीशिवाय उत्खनन झाल्याचाही आरोप आहे. या दोन्ही बाबी मिळून २ लाख ६ हजार ८३२ ब्रास अतिरिक्त उत्खनन झाल्याचा दावा करण्यात आला आहे. विधानसभेत बोलताना आमदार बबनराव लोणीकर यांनी सुमारे ७६ हजार ब्रास मुरूमाची रॉयल्टी भरल्यानंतरही जवळपास १० लाख ब्रास अवैध मुरूम उत्खनन झाल्याचा गंभीर आरोप केला. या प्रकारामुळे शासनाच्या महसुलाचे कोट्यवधी रुपयांचे नुकसान झाल्याचा दावा करत त्यांनी संपूर्ण प्रकरणाची स्वतंत्र आणि उच्चस्तरीय चौकशी करण्याची मागणी केली. या पार्श्वभूमीवर महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आपल्या दालनात उच्चस्तरीय बैठकीचे आयोजन केले आहे. या बैठकीस जालना जिल्हाधिकारी, अप्पर जिल्हाधिकारी, विभागाचे मुख्य अभियंता, अधीक्षक अभियंता आणि संबंधित वरिष्ठ अधिकारी उपस्थित राहणार असून संपूर्ण प्रकरणाचा सविस्तर आढावा घेतला जाणार आहे. दरम्यान, या प्रकरणाची स्वतंत्र तांत्रिक, प्रशासकीय आणि आर्थिक चौकशी करून मंजूर परिमाणापेक्षा अधिक उत्खनन, शासनाच्या महसुलाची हानी किंवा संबंधित अधिकारी आणि कंत्राटदारांची जबाबदारी निश्चित झाल्यास त्यांच्यावर कठोर प्रशासकीय, आर्थिक आणि फौजदारी कारवाई करण्यात यावी, अशी मागणी आमदार बबनराव लोणीकर यांनी केली आहे. हजारो कोटी रुपयांच्या सार्वजनिक निधीतून उभारल्या जात असलेल्या समृद्धी महामार्गाच्या गुणवत्तेशी कोणतीही तडजोड होऊ नये आणि शासनाच्या महसुलाचे संरक्षण व्हावे, यासाठी या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी होऊन सत्य जनतेसमोर यावे, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे.

## संक्षिप्त

### स्वातंत्र्य सैनिकाच्या निवृत्ती वेतनात केंद्र व राज्य असा भेदभाव न करता समान निवृत्ती वेतन मंजूर करा– बाबासाहेब कोलते



**तभा वृत्तसेवा**
**जालना । प्रतिनिधी**

स्वातंत्र्य सैनिकाच्या निवृत्ती वेतनात केंद्र व राज्य असा भेदभाव न करता महाराष्ट्रातील राज्य शासनाच्या स्वातंत्र्य सैनिकांना समान निवृत्ती वेतन मंजूर करण्यासाठी केंद्र सरकारकडे शिफारस करण्याची मागणी स्वातंत्र्य सैनिक पाल्य युवक समितीचे प्रदेश अध्यक्ष बाबासाहेब पाटील कोलते यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे एका निवेदनाद्वारे केली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पाठविलेल्या निवेदनात कोलते यांनी म्हंटले आहे की, राज्य शासनाच्या स्वातंत्र्य सैनिकांना व केंद्र सरकारच्या स्वातंत्र्य सैनिकांना निवृत्ती वेतन देतांना केंद्र व राज्य सरकारकडून दुजाभाव होत असून राज्य शासनाच्या स्वातंत्र्य सैनिक व वारस पत्नी वर यामुळे केंद्र सरकारकडून अन्याय होत आहे. केंद्र व राज्य सरकारने स्वातंत्र्य सैनिकांमध्ये दुजाभाव चालविला आहे. राज्य शासनाच्या स्वातंत्र्य सैनिकांना २० हजार रुपये प्रती महा तर केंद्र व राज्य सरकारच्या स्वातंत्र्य सैनिकांना ५० हजार रुपये प्रतिमाह शासनाकडून मिळत आहे ज्या प्रमाणे केंद्रसरकारच्या स्वातंत्र्य सैनिकांना व वारस पत्नी यांना राज्य शासनाची सुद्धा निवृत्ती वेतन मिळते व आज रोजी महाराष्ट्रामध्ये प्रत्येक केंद्र सरकारच्या स्वातंत्र्य सैनिक व वारस पत्नी यांना राज्य सरकारची म्हणजे महाराष्ट्र शासनाची निवृत्ती वेतन सुरु आहे.

परंतु राज्यशासनाच्या स्वातंत्र्य सैनिकांना केंद्र सरकारचे निवृत्ती वेतन मिळत नाही त्यामुळे केंद्र सरकारकडून महाराष्ट्रातील स्वातंत्र्य सैनिक व स्वातंत्र्य सैनिक वारस पत्नीवर अन्याय होत आहे. व केंद्र शासनाच्या स्वातंत्र्य सैनिकांनी ज्या प्रमाणे देश हितासाठी काम केले आहे तसे राज्य शासनाच्या स्वातंत्र्य सैनिकांनी सुद्धा देश हितासाठी व मराठवाडा मुक्ती संग्रामासाठी काम केलेले आहे. त्यामुळे राज्य शासन व केंद्र शासन असा दुजाभाव न करता राज्य शासनाच्या स्वातंत्र्य सैनिकांना केंद्र शासनाची निवृत्ती वेतन मंजूर करण्यासाठी केंद्र सरकारकडे राज्य शासनाने शिफारस करून राज्य शासनाच्या महाराष्ट्रातील सर्व स्वातंत्र्य सैनिकांना केंद्र सरकारचे निवृत्ती वेतन मंजूर करून न्याय मिळवून द्यावा अशी मागणी बाबासाहेब कोलते यांनी केली आहे.

### पर्यावरण संवर्धनासाठी प्रत्येकाने वृक्षारोपण करावे –विष्णूभाऊ पाचफुले



**तभा वृत्तसेवा**
**जालना । प्रतिनिधी**

जुना जालना परिसरातील पाचफुले फार्म हाऊस येथे पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत वृक्षारोपण करण्यात आले. या उपक्रमाचे नेतृत्व शिवसेनेचे शहरप्रमुख तथा माजी विरोधी पक्षनेते विष्णूभाऊ पाचफुले यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी उपस्थितांशी संवाद साधताना विष्णूभाऊ पाचफुले म्हणाले, पर्यावरणाचे संतुलन राखण्यासाठी प्रत्येक नागरिकाने किमान एक तरी झाड लावून त्याचे संगोपन करण्याची जबाबदारी स्वीकारली पाहिजे. केवळ वृक्षारोपण करून थांबून चालणार नाही, तर झाड जगविणे आणि त्याचे संवर्धन करणे हीदेखील आपली सामूहिक जबाबदारी आहे. हरित जालना घडविण्यासाठी प्रत्येकाने पुढाकार घेतला, तर येणाऱ्या पिढ्यांना स्वच्छ आणि निरोगी पर्यावरणाचा लाभ मिळेल. या उपक्रमातून पर्यावरण संरक्षणाचा महत्त्वपूर्ण संदेश देण्यात आला. उपस्थितांनीही वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनासाठी सक्रिय सहभाग नोंदविण्याचा संकल्प व्यक्त केला. यावेळी उद्धव भुतेकर गणेश भुतेकर आयुष राठोड पांडूशेठ खैरे साळवे मामा आदींची उपस्थिती होती.

## सार्वजनिक वितरण व्यवस्थेतील २५२.१६ क्विंटल धान्य जप्त; संयुक्त छापेमारीत काळाबाजाराचा पर्दाफाश

**तभा वृत्तसेवा**
**भोकरदन । प्रतिनिधी**

सार्वजनिक वितरण व्यवस्थेतील (झउड) धान्याचा काळाबाजार रोखण्यासाठी जालना जिल्हा प्रशासनाने मोठी आणि धडक कारवाई करत भोकरदन तालुक्यात विविध ठिकाणी छापेमारी केली. या संयुक्त मोहिमेत २५२.१६ क्विंटल गहू, तांदूळ, हरभरा, मका, ज्वारी, तूर व सोयाबीनचा विनापरवाना साठा जप्त करण्यात आला असून संबंधितांविरुद्ध आवश्यक वस्तू अधिनियमासह विविध कायद्यांनुसार कठोर कारवाईची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.



जिल्हाधिकारी श्रीमती आशिमा मित्तल यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच जिल्हा पोलीस अधीक्षक श्री तेगबीर सिंह संधू आणि जिल्हा पुरवठा अधिकारी श्रीमती सुकेशिनी पगारे यांच्या निर्देशानुसार सार्वजनिक वितरण व्यवस्थेतील धान्याच्या काळाबाजाराविरोधात विशेष संयुक्त तपासणी मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेत सहायक जिल्हा पुरवठा अधिकारी ज्ञानेश्वर दिवटे, पुरवठा निरीक्षण अधिकारी सदानंद नाईक (भोकरदन), एन. व्ही. क्षीरसागर, आर. आर. पल्हाटे तसेच पारध पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक संतोष माने यांच्या नेतृत्वाखालील संयुक्त पथकाने गोपनीय माहितीच्या आधारे भोकरदन तालुक्यातील विविध ठिकाणी अचानक छापेमारी केली. तपासणीदरम्यान सार्वजनिक वितरण व्यवस्थेतील धान्याचा मोठ्या प्रमाणात विनापरवाना साठा आढळून आला. अनेक ठिकाणी धान्याची साठवणूक, खरेदी-विक्री आणि वाहतुकीसंदर्भातील आवश्यक परवाने, साठा नोंदवही, विक्री नोंदी तसेच इतर आवश्यक अभिलेख उपलब्ध नसल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे संपूर्ण धान्यसाठा ताब्यात घेऊन पंचनामे करण्यात आले. प्रशासनाने जप्त केलेल्या धान्याबाबत पुढील तपास सुरू असून संबंधितांविरुद्ध आवश्यक वस्तू अधिनियम, सार्वजनिक वितरण व्यवस्था (नियंत्रण) आदेश तसेच इतर लागू कायद्यांनुसार कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येत आहे. दरम्यान, जिल्हा प्रशासनाने नागरिकांना आवाहन केले आहे की, रेशनच्या धान्याचा अवैध साठा, काळाबाजार किंवा इतर गैरप्रकारांची माहिती मिळाल्यास ती तात्काळ पुरवठा विभाग किंवा पोलीस प्रशासनाला द्यावी. माहिती देणाऱ्याची ओळख गोपनीय ठेवली जाईल. सार्वजनिक वितरण व्यवस्थेतील भ्रष्टाचार आणि काळाबाजार पूर्णपणे हाणून पाडण्यासाठी अशा धडक कारवाया यापुढेही सातत्याने सुरू राहणार असल्याचा इशाराही प्रशासनाने दिला आहे.

## भोकरदन येथे मी रमाईया एकपात्री नाट्यप्रयोगाचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**भोकरदन । प्रतिनिधी**

प्रसिद्ध सिने अभिनेत्री प्रियंका उबाळे यांच्या मुख्य भूमिकेतील मी रमाईया एकपात्री नाट्यप्रयोगाचे आयोज भोकरदन येथे २९ जुलै रोजी करण्यात आले असून त्याची पूर्व तयारी करण्यासाठी भोकरदन येथील भोगवर्धन बुद्ध विहारात अभिनेत्री प्रियंका उबाळे व जिल्हा परिषदचे माजी सभापती सुदामराव सदाशिवे यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाली. यावेळी सिने अभिनेत्री प्रियंका उबाळे यांनी आजपर्यंत माता रमाई यांना फाटक्या लुगड्यात तसेच नेहमीच रडक्या व परिस्थितीशी झगडणारी रमाई दाखविण्यात आली परंतु आम्ही धाडसी रमाईदाखविणार असून रमाईचा धाडसी इतिहास सर्व समाज घटका पर्यंत पोहचवण्याचा प्रयत्न असल्याचे सांगीतले. यावेळी सुदामराव सदाशिवे व इतरांनीही सदरील एकपात्री नाट्यप्रयोगासाठी करण्यात येणाऱ्या तयारीचा आढावा घेऊन कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्वांनीच प्रयत्न करण्याचे आवाहन केले. यावेळी नाटकाचे निर्माते प्रकाश वाघ,शामराव दांडगे, माजी नगरसेवक दीपक बोर्डे, गंगाधर कांबळे, प्रदीप जोगदंडे, सचिन पारखे, रतन दाभाडे, मंगेश पगारे यांच्यासह शहरासह तालुक्यातील समाज बांधवांची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होती.

## जालना विधानसभा मतदारसंघात संत मुक्ताई दिंडीचे आ.खोतकर यांनी केले स्वागत


**तभा वृत्तसेवा**
**जालना । प्रतिनिधी**



संत परंपरेचा वारसा जपत भक्तिभावाने मार्गक्रमण करणाऱ्या मुक्ताबाई दिंडीचे जालना विधानसभा मतदारसंघात आगमन झाले असता आमदार अर्जुनराव खोतकर यांनी गोंदेगाव येथे दिंडीतील वारकरी व भाविकांचे मोठ्या उत्साहपूर्ण स्वागत केले.यावेळी आमदार खोतकर यांनी दिंडीतील वारकऱ्यांना शुभेच्छा देत संतांच्या विचारांचा प्रसार समाजात होत राहणे ही काळाची गरज असल्याचे सांगितले. दिंडीचे स्वागत पुष्पवृष्टी, हार अर्पण आणि वारकऱ्यांचा सत्कार करून करण्यात आले. परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते. दिंडीसोबत आलेल्या वारकरी बांधवांनी नामस्मरण, भजन व कीर्तनाच्या माध्यमातून संत मुक्ताबाईंच्या शिकवणीचा संदेश जनसामान्यांपर्यंत पोहोचविला. यावेळी शिवसेना संपर्क प्रमुख भास्करराव अंबेकर, पंडितराव भुतेकर, भाऊसाहेब घुगे यांच्यासह स्थानिक पदाधिकारी, कार्यकर्ते, वारकरी संप्रदायातील मान्यवर आणि मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.मुक्ताबाई दिंडीच्या स्वागत सोहळ्यामुळे जालना विधानसभा मतदारसंघात भक्ती, श्रद्धा आणि संत परंपरेचा सुंदर संगम अनुभवायला मिळाला.

## एसआयआर मोहिमेला नागरिकांनी सहकार्य करावे –नगराध्यक्षा सौ.वंदनाताई बोराडे

**तभा वृत्तसेवा**
**मंठा । प्रतिनिधी**



भारत निवडणूक आयोगामार्फत राज्यभर राबविण्यात येत असलेल्या विशेष सखोल मतदार यादी पुनरीक्षण (ड्खठ) मोहिमेत प्रत्येक नागरिकाने सक्रिय सहभाग नोंदवून प्रशासन आणि बूथ लेव्हल ऑफिसर (बीएलओ) यांना पूर्ण सहकार्य करावे, असे आवाहन मंठा नगरपंचायतीच्या नगराध्यक्ष वंदनाताई वैजनाथनाना बोराडे व मुख्याधिकारी अमित दिनकर मांडवकर यांनी केले आहे.

त्या म्हणाल्या की, अचूक, अद्यावत आणि सर्वसमावेशक मतदार यादी ही सशक्त लोकशाहीचा पाया आहे. त्यामुळे घरी येणाऱ्या बीएलओंना आवश्यक माहिती आणि कागदपत्रे वेळेत उपलब्ध करून देणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे. ही मोहीम केवळ मतदार यादी अद्ययावत करण्यापुरती मर्यादित नसून लोकशाही अधिक सक्षम आणि पारदर्शक करण्यासाठी महत्त्वपूर्ण आहे. राज्यात दिनांक ३० जून ते २९ जुलै २०२६ या कालावधीत बीएलओ घराघरात जाऊन मतदारांची माहिती आणि कागदपत्रांची पडताळणी करत आहेत. या प्रक्रियेदरम्यान नागरिकांनी आपला अचूक पत्ता, आवश्यक माहिती, आधार कार्ड, मतदार ओळखपत्र, पासपोर्ट आकाराचा फोटो आणि मोबाईल क्रमांक तयार ठेवावा, असेही त्यांनी सांगितले. नगरपंचायत मंठा, नगराध्यक्ष बोराडे यांनी सांगितले की, या मोहिमेचा उद्देश मतदार यादीतील दुबार, मृत व स्थलांतरित मतदारांची नावे वगळणे तसेच नव्याने पात्र ठरलेल्या मतदारांची नोंदणी करणे हा आहे. त्यामुळे प्रत्येकाने ही प्रक्रिया गांभीर्याने घेत प्रशासनाला सहकार्य करावे. तसेच, नागरिकांनी छत्तड्ढ किंवा एश्रशलींळेप उेाळीीळेप`ष खप-वळरच्या अधिकृत पोर्टलवर आपले नाव मतदार यादीत आहे की नाही, याची खात्री करून घ्यावी, असेही त्यांनी आवाहन केले. अचूक मतदार यादी ही मजबूत लोकशाहीची ओळख आहे. चला, आपण सर्व मिळून ही विशेष सखोल पुनरीक्षण मोहीम यशस्वी करूया, असे आवाहन नगरपंचायत मंठा, नगराध्यक्ष वंदनाताई वैजनाथनाना बोराडे व मुख्याधिकारी अमित दिनकर मांडवकर यांनी केले.

# विविध प्रश्नांवर विधानसभेत आक्रमक भूमिका

## खरपुडी नवनगर सिडको प्रकल्पासह महत्त्वाचे प्रश्न लावून धरल्याबद्दल आ.अर्जुनराव खोतकर यांचा नागरिकांकडून सत्कार



**तभा वृत्तसेवा**
**जालना । प्रतिनिधी**

जालना विधानसभा मतदारसंघाचे आमदार तथा शिवसेना उपनेते आमदार अर्जुनराव खोतकर यांनी सुरू असलेल्या राज्य विधिमंडळाच्या अधिवेशनात जालनाशहरासह जिल्ह्याशी निगडित विविध महत्त्वाचे प्रश्न प्रभावीपणे मांडून शासनाचे लक्ष वेधले. विशेषतः खरपुडी नवनगर सिडको प्रकल्प, शेतकऱ्यांचे प्रश्न, वीजपुरवठा, भटक्या कुत्र्यांचा वाढता उपद्रव, ठेवीदारांची फसवणूक, बाल गुन्हेगारी यांसारखे जनतेच्या दैनंदिन जीवनाशी संबंधित विषय सभागृहात ठामपणे मांडल्याबद्दल जालना शहरातील विविध सामाजिक संघटना, शेतकरी, पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी दर्शना बंगल्यावर आमदार खोतकर यांची भेट घेऊन शाल, पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सत्कार केला.

यावेळी आमदार अर्जुनराव खोतकर यांनी सांगितले की, जालन्याचा अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेला खरपुडी नवनगर सिडको प्रकल्प तातडीने मार्गी लागावा, यासाठी त्यांनी विधानसभेत शासनाकडे जोरदार मागणी केली. या प्रकल्पासाठी संपादित झालेल्या शेतकऱ्यांना प्रलंबित मोबदला तात्काळ देण्यात यावा, उर्वरित जमिनीचे भूसंपादन तातडीने पूर्ण करून प्रकल्प प्रत्यक्षात सुरू करण्यात यावा, अशी आग्रही भूमिका त्यांनी सभागृहात मांडली. शासनानेही या संदर्भात संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक कार्यवाही करण्याचे निर्देश दिल्याचे त्यांनी सांगितले. अधिवेशन संपल्यानंतर या प्रकल्पातील बाधित शेतकऱ्यांसह मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांची प्रत्यक्ष भेट घेऊन प्रकल्पाच्या अंमलबजावणीबाबत सविस्तर चर्चा करण्यात येणार असून, हा प्रकल्प लवकरात लवकर पूर्णत्वास नेण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जातील, अशी ग्वाही आमदार खोतकर यांनी दिली. याशिवाय, जालना जिल्ह्यातील शेतकऱ्यांवर ओढवलेल्या दुबार पेरणीच्या संकटाची गंभीर दखल घेत त्यांनी विशेष आर्थिक मदत पॅकेज जाहीर करण्याची मागणी केली. तसेच क्रिप्टो करन्सी, जेडीसीसी कॉईन आणि विविध नागरी सहकारी बँकांमधील आर्थिक गैरव्यवहारामुळे फसवणूक झालेल्या ठेवीदारांना न्याय मिळावा, यासाठी शासनाने कठोर पावले उचलावीत, अशी मागणीही त्यांनी विधानसभेत केली. जालना शहरातील भटक्या कुत्र्यांच्या वाढत्या उपद्रवामुळे नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न गंभीर बनला असून, यावर तातडीने कायमस्वरूपी उपाययोजना करण्याची गरज त्यांनी शासनासमोर मांडली. वाढती बाल गुन्हेगारी रोखण्यासाठी कठोर कायद्यांची प्रभावी अंमलबजावणी व्हावी, अशी मागणीही त्यांनी केली. तसेच जालना शहरासह परिसरात वारंवार खंडित होणाऱ्या वीजपुरवठ्याचा प्रश्नही त्यांनी अधिवेशनात जोरकसपणे उपस्थित करून नागरिकांना अखंडित व दर्जेदार वीजपुरवठा मिळावा, यासाठी महावितरणला आवश्यक निर्देश देण्याची मागणी शासनाकडे केली. आमदार खोतकर यांनी जालना जिल्ह्याच्या विकासाशी संबंधित प्रत्येक प्रश्न शासन दरबारी सातत्याने मांडत राहणार असून, जनतेच्या न्याय्य हक्कांसाठी आपला संघर्ष कायम राहील, असा विश्वास यावेळी व्यक्त केला.यावेळी शिवसेना उपजिल्हाप्रमुख पंडितराव भुतेकर, जालना शहरप्रमुख विष्णू भाऊ पाचफुले, वसंत राजे जाधव,भरत दादा शेजुळ प्रमेश्वर तात्या शिंदे,,आण्णा गायकवाड, रोहित शेजुळ, ,जालु भाऊ वायळ ,अप्पासाहेब भोसले, भगवान भोसले, समाधान शेजुळ, किशोर शिंदे ,सतीश शेजुळ,कांता टोपे,संतोष हरकत,यांच्यासह शिवसेनेचे पदाधिकारी, विविध संघटनांचे प्रतिनिधी, शेतकरी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# नांदेड जिल्हा रेशीम हब बनविणार : जिल्हाधिकारी राहुल कर्डिले

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ४ जुलै -**

जिल्ह्यात रेशीम शेतीला मोठी चालना देण्यासाठी प्रशासन सर्वतोपरी सहकार्य करणार असून, येत्या काळात नांदेड जिल्ह्याला 'रेशीम हब' म्हणून विकसित करण्याचे उद्दिष्ट असल्याचे प्रतिपादन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केले.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियोजन भवन येथे आयोजित रेशीम शेतकरी मेळावा व पुरस्कार वितरण कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी उपविभागीय अधिकारी डॉ. सचिन खल्लाळ, जिल्हा रेशीम अधिकारी अशोक वडवळे, नायब तहसीलदार सुनंदा कराळे, कपिल सोनटक्के, आरसेटीचे आशिष राऊत, बीआरएलएफचे दिनेश खडसे, ग्राम महसूल अधिकारी बालाजी केंद्रे, मनीषा टुले, सहाय्यक कृषी अधिकारी मनोहर वडवळे, सहायक कृषी अधिकारी अमोल आजने, राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त शेतकरी रत्नकर ढगे, तसेच जिल्ह्यातील प्रगतशील रेशीम शेतकरी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी राहुल कर्डिले म्हणाले की, जिल्ह्यात अनेक प्रगतशील शेतकरी प्रेरणादायी पद्धतीने रेशीम शेती करत असून, एक हजारांहून अधिक शेतकऱ्यांनी नव्याने रेशीम शेतीसाठी नोंदणी केली आहे. जिल्ह्याला रेशीम हब



बनविण्याच्या दिशेने हा मेळावा म्हणजे सुरुवात ठरणार आहे.

पारंपरिक पिकांच्या तुलनेत रेशीम शेती अधिक फायदेशीर व खात्रीशीर उत्पन्न देणारी असल्याचे सांगत त्यांनी शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करून अभ्यासपूर्ण रेशीम शेती करण्याचे आवाहन केले. रेशीम शेतीतील अडचणी सोडविण्यासाठी जिल्हा रेशीम कार्यालय आणि जिल्हा प्रशासन कायम तत्पर राहील, अशी ग्वाही त्यांनी दिली. या डेमो प्रकल्प उभारणे, चॉकी व नर्सरी विकासाला चालना देणे, शेतकऱ्यांना प्रोत्साहन देणे आणि गावभेटीदरम्यान रेशीम उत्पादक शेतकऱ्यांशी प्रत्यक्ष संवाद साधणे आणि रेशीम शेतीला प्रोत्साहन देण्यासाठी पुढील काळात माझा म ुक्काम रेशीम शेतकरी यांच्या घरी करणे अशा विविध उपक्रमांवर भर दिला जाणार असल्याचे त्यांनी सांगितले. सध्या पेरणीचे दिवस असून पाऊस सुरू असून सुद्धा जिल्ह्यातील ४०० ते ४५० शेतकरी उपस्थित असल्या बद्दल जिल्हाधिकारी यांनी सर्वांचे आभार मानले.

पूर्वी रेशीम उत्पादकांसाठी बाजारपेठेची मर्यादा होती; मात्र आता बीड आणि जालना येथे बाजारपेठ उपलब्ध झाल्यामुळे शेतकऱ्यांनी आर्थिक उन्नतीसाठी रेशीम शेतीकडे वळावे, असे आवाहनही त्यांनी केले. या कार्यक्रमात किनवट येथील १० शेतकऱ्यांना त्यांच्या हस्ते प्रातिनिधिक स्वरूपात पूर्वसंमती प्रमाणपत्र देण्यात आले.

कार्यक्रमात प्रगतशील रेशीम शेतकऱ्यांनी आपले अनुभव मांडले. या कार्यक्रमात जिल्ह्यात प्रथम पुरस्कार दाजीराव शिंदे जोमेगाव तालुका लोहा यांना देण्यात आला असून त्यांनी एका वर्षात ७लाख रुपये पेक्षा जास्त उत्पन्न घेतले आहे त्या सोबत जिल्ह्यातील उत्कृष्ट अशा २४ शेतकऱ्यांचा पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हा रेशीम अधिकारी अशोक वडवळे यांनी केले असून पुढील काळात रेशीम विभाग गावागावात जाऊन रेशीम शेतकरी वाढविण्यावर भर देणार असल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे सूत्र संचालन गोडबोले सर यांनी केले तर आभार प्रदर्शन नरोजी कोरके यांनी केले.

## कृत्रिम अवयवांनी दिली नवजीवनाची उमेद; ८० लाभार्थ्यांना मदतीचा हात


**नायगाव** -दिव्यांग व्यक्तींना स्वावलंबी जीवन जगण्यासाठी आवश्यक असलेले कृत्रिम अवयव सहज उपलब्ध व्हावेत, या उद्देशाने नरसी येथे आयोजित करण्यात आलेल्या विशेष शिबिरात ८० पात्र लाभार्थ्यांना कृत्रिम हात, कृत्रिम पाय व कॅलिपर्सचे ऑन-द-स्पॉट



वितरण करण्यात आले. या उपक्रमामुळे अनेक दिव्यांगांच्या जीवनात नव्या आशा आणि आत्मविश्वासाचा संचार झाला. महाराष्ट्र शासनाच्या दिव्यांग कल्याण विभाग, जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण कार्यालय, जिल्हा परिषद नांदेड, एस. आर. ट्रस्ट (मध्य प्रदेश) आणि ऑलिम्को, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम राबविण्यात आला. निवासी मूकबधिर विद्यालय नरसी, झोलेबाबा निवासी अस्थिव्यंग विद्यालय नायगाव, अपंग निवासी विद्यालय नरसी तसेच पंचायत समिती नायगाव यांच्या सहकार्याने जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा, नरसी येथे शिबिराचे आयोजन करण्यात आले. शिबिराचे उद्घाटन गटविकास अधिकारी प्रवीणकुमार वानखेडे यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. यावेळी एस. आर. ट्रस्टचे संचालक डॉ. रुपेश जाधव, ऑलिम्को मुंबईचे डॉ. आकाश यादव, प्रहार दिव्यांग क्रांती संघटनेचे जिल्हाध्यक्ष गोपीनाथ सांगवीकर मुंडे, जिल्हा सचिव मारुती मंगरुळे, जिल्हा संपर्कप्रमुख राजेश बेळगे, तालुकाध्यक्ष साईनाथ बोईनवाड तसेच विविध दिव्यांग संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते. या शिबिरात एकूण १२० दिव्यांगांची वैद्यकीय तपासणी व मोजमाप करण्यात आले. त्यापैकी ८० पात्र लाभार्थ्यांना कृत्रिम हात, कृत्रिम पाय आणि कॅलिपर्सचे तात्काळ वितरण करण्यात आले. लाभार्थ्यांच्या चेहऱ्यावर उमटलेला आनंद आणि समाधान या उपक्रमाच्या यशाची साक्ष देत होता. शिबिराला नायगाव तालुक्यासह परिसरातील दिव्यांग बांधवांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी निवासी मूकबधिर विद्यालय नरसी, झोलेबाबा निवासी अस्थिव्यंग विद्यालय नायगाव आणि अपंग निवासी विद्यालय नरसी येथील सर्व शिक्षक, कर्मचारी व स्वयंसेवकांनी परिश्रम घेतले. दिव्यांग व्यक्तींना सक्षम, स्वावलंबी आणि सन्मानाने जगण्याची संधी उपलब्ध करून देणारे असे उपक्रम समाजासाठी प्रेरणादायी ठरत असून, शासन, स्वयंसेवी संस्था आणि सामाजिक संघटनांच्या समन्वयातून अशा सेवाभावी उपक्रमांची व्याप्ती अधिक वाढावी, अशी अपेक्षा यावेळी व्यक्त करण्यात आली.

## कै. सौ. कुसुमताई चव्हाण स्मृती पुरस्कार जाहीर

**नांदेड** -मराठवाड्यासह संपूर्ण महाराष्ट्रात एक प्रतिष्ठित पुरस्कार म्हणून नावारूपास आलेले दैनिक सत्यप्रभाचे यंदाचे कै. सौ. कुसुमताई चव्हाण स्मृती पुरस्कार जाहीर झाले आहेत. यावर्षी प्रथमच डॉ. शंकरराव चव्हाण जीवनगौरव पुरस्काराचा समावेश करण्यात आला असून, लोकमत समूहाचे एडिटर-इन-चिफ तथा माजी मंत्री राजेंद्र दर्डा त्याचे पहिले मानकरी ठरले आहेत. त्याचप्रमाणे महिला आयोगाच्या अध्यक्ष विजयाताई रहाटकर, छत्रपती संभाजीनगर येथील स्नेहसावलीचे



संस्थापक डॉ. बालाजी आसेगावकर, विमान क्षेत्रात गगनभरारी घेणारे मॅब एव्हिएशनचे संस्थापक मंदार भारदे व महिला बुद्धिबळ विश्वविजेती दिव्या देशमुख यांना कै. सौ. कुसुमताई चव्हाण स्मृती पुरस्कार जाहीर झाले आहेत. दैनिक सत्यप्रभाचे कार्यकारी संपादक संतोष पांडागळे यांनी आज या पुरस्कारांची घोषणा केली. यंदाच्या पुरस्काराचे मानकरी निश्चित करण्यासाठी दैनिक सत्यप्रभाचे मार्गदर्शक माजी मुख्यमंत्री खा. अशोकराव चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली निवड समिती गठीत करण्यात आली होती. या समितीत नांदेडच्या स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापिठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चास्कर, प्रख्यात वैद्यकतज्ज्ञ डॉ. नंदकुमार मुलमुले, वरिष्ठ पत्रकार संजीव कुलकर्णी व राजेश निस्ताने आणि उद्योजक सुमित मोरगे यांचाही समावेश होता. माजी केंद्रीय गृहमंत्री तथा माजी मुख्यमंत्री डॉ. शंकरराव चव्हाण यांच्या जयंतीनिमित्त महाराष्ट्राच्या विविध क्षेत्रात उठावदार कामगिरी करणाऱ्या कर्तृत्ववान व्यक्तींना मागील २२ वर्षांपासून या पुरस्कारांनी सन्मानित करण्यात येते. कै. सौ. कुसुमताई चव्हाण स्मृती पुरस्कारांच्या यापूर्वी मानकऱ्यांमध्ये अभिनेते जॅकी श्रॉफ, साहित्यिक फ. मु. शिंदे, रामायणाचार्य हभप रामराव महाराज ढोक, डॉ. तात्यासाहेब लहाने, श्रीमती कुसुमताई रसाळ, नागनाथ फटाले, शैलाताई लोहिया, क्रिकेटपटू संजय बांगर, अभिनेता मकरंद अनासपुरे, ज्येष्ठ संपादक महावीर जोंधळे, नाट्य दिग्दर्शक चंद्रकांत कुलकर्णी, डॉ. विठ्ठल लहाने ,सकाळ समूहाचे संपादक डॉ निलेश खरे,नाट्य व चित्रपट दिग्दर्शक वामन केंद्रे,अभिनेत्री प्रतीक्षा लोणकर,सनदी अधिकारी राध्येश्याम मोपलवार,डॉ.विपिन इटणकर आदींचा समावेश आहे. पुरस्कार वितरण सोहळा जुलै महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये संपन्न होणार आहे.

## राष्ट्रीय जलदिना' च्या मागणीसाठी केंद्रीय मंत्री पासवान यांची भेट

**नांदेड** -२० मार्च १९२७ महाडच्या चवदार तळ्याचा सत्याग्रह हा 'राष्ट्रीय जल दिन' म्हणून घोषित करण्यात यावा या मागणीसाठी या आंदोलनाचे प्रणेते महेंद्र पिंपळगावकर यांनी केंद्रीय मंत्री तथा लोक जनशक्ती पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष चिराग पासवान यांची भेट घेऊन आपले निवेदन सादर केले. यानंतर ना. पासवान यांनी या आंदोलनाविषयी अधिकपणे जाणुन घेत दिल्लीला गेल्यावर आापण योग्य ती भूमिका घेऊ असे आश्वासन दिले.केंद्रीय मंत्री चिराग पासवान यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी महाड चवदार तळे पाण्याचा सत्याग्रह हा भारतीय सामाजिक समता, म ानवी हक्क आणि जल समस्येच्या लढ्याचा ऐतिहासिक टप्पा आहे. पाण्यावर सर्वांचा मुलभूत मानवी हक्क, अधिकार आहे. या लढ्याने देशाला अधोरेखित केले आहे म्हणून २० मार्च दिन महाड चवदार तळे सत्याग्रह दिन हा राष्ट्रीय जल दिन म्हणून घोषित करावा ही मागणी आहे.

# लोकशाहीच्या बळकटीसाठी मतदार यादी तपासा; श्रावण भिलवंडे यांचे आवाहन

**तभा वृतसेवा**
**नायगाव, दि. ४ जुलै -**

लोकशाहीची खरी ताकद ही अचूक आणि सर्व समावेशक मतदार यादीत दडलेली असते. प्रत्येक पात्र नागरिकाला मतदानाचा घटनात्मक अधिकार अबाधित पणे बजावता यावा, यासाठी भारत निवडणूक आयोगा च्या निर्देशानुसार विशेष संक्षिप्त मतदार यादी पुनरीक्षण (डखठ)-२०२६ मोहिमेला सुरुवात झाली आहे.या पार्श्व भूमीवर प्रत्येक नागरिकाने आपल्या नावाची खात्री करून आवश्यक त्या दुरुस्त्या वेळेत पूर्ण कराव्यात,असे आवाहन भाजप नेते श्रावण पाटील भिलवंडे यांनी केले आहे.

भिलवंडे म्हणाले की, अचूक म तदार यादी ही सशक्त लोकशाहीचा पाया आहे. एकही पात्र नागरिक मतदाना च्या अधिकारापासून वंचित राहू नये, यासाठी निवडणूक आयोगाने व्यापक पुनरीक्षण मोहीम हाती घेतली आहे. या मोहिमेत नागरिकांचा सक्रिय सहभाग अत्यंत म हत्त्वाचा असून, प्रत्येकाने ही जबाबदारी गांभीर्याने पार पाडणे आवश्यक आहे.

या विशेष मोहिमेअंतर्गत ३० जून ते २९ जुलै २०२६ या कालावधीत बूथ लेव्हल अधिकारी (इछज) घरभेटी देऊन प्रगणन फॉर्मचे वितरण, माहिती संकलन तसेच आवश्यक कागदपत्रांची पडताळणी करणार आहेत. प्रत्येक कुटुंबाला तीन वेळा भेट देण्यात येणार असल्याने नागरिकांनी संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक माहिती व कागदपत्रे उपलब्ध करून सहकार्य करावे, असेही त्यांनी सांगितले.



यापुढील प्रक्रियेनुसार ५ ऑगस्ट २०२६ रोजी प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध केली जाणार आहे. त्यानंतर प्रत्येक नागरिकाने स्वतःचे तसेच कुटुंबातील सर्व सदस्यांचे नाव काळजीपूर्वक तपासावे. नाव समाविष्ट करणे, वगळणे किंवा दुरुस्ती करण्यासाठी ५ ऑगस्ट ते ८ सप्टेंबर २०२६ या कालावधीत दावे व हरकती दाखल करता येतील. प्राप्त अर्जांवर सुनावणी घेऊन ३ ऑक्टोबर २०२६ पर्यंत निर्णय करण्यात येणार असून, ७ ऑक्टोबर २०२६ रोजी अंतिम मतदार यादी प्रकाशित केली जाईल.मतदानाचा अधिकार हा प्रत्येक नागरिका च्या लोकशाही सहभागाचा सर्वात प्रभावी दुवा आहे. त्यामुळे आपल्या नावाची खात्री करून आवश्यक ती कार्यवाही वेळेत करावी. तसेच ही माहिती आपल्या कुटुंबीय, नातेवाईक आणि परिसरातील नागरिकांपर्यंत पोहोचवून एकही पात्र म तदार मतदार यादीपासून वंचित राहणार नाही, यासाठी प्रत्येकाने जनजागृतीचे काम करावे, असे आवाहन श्रावण पाटील भिलवंडे यांनी केले.

# लेंडी प्रकल्पातील घळभरणीच्या निकृष्ट कामाविरोधात शिवसेना ठाकरे गटाचे 'हलगी बजाओ' आंदोलन

**तभा वृतसेवा**
**देगलूर, दि. ४ जुलै -**

मुखेड तालुक्यातील महाराष्ट्र-तेलंगणा सीमेवरील महत्त्वाकांक्षी लेंडी प्रकल्पाच्या घळभरणीच्या कामाम ध्ये निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरून काम करण्यात येत असल्याचा आरोप करत शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने देगलूर येथील भक्तापूर रोडवरील लेंडी प्रकल्पाच्या कार्यकारी अभियंता कार्यालयासमोर 'हलगी बजाओ' आंदोलन करण्यात आले. या वेळी कामाची सखोल चौकशी करून संबंधित अधिकारी तसेच सुजाता कन्स्ट्रक्शन कंपनीवर कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली.

शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, महाराष्ट्र व तेलंगणा राज्यातील शेतकऱ्यांसाठी महत्त्वपूर्ण ठरणाऱ्या लेंडी प्रकल्पाच्या घळभरणीच्या कामात माती, मुरूम, रेती आदी साहित्य निकृष्ट दर्जाचे वापरले जात असल्याचा



आरोप करण्यात आला. तसेच धरणाच्या पाणलोट क्षेत्रातून खोदकाम करून साहित्य आणले जात असल्यामुळे कामाच्या गुणवत्तेबाबत गंभीर प्रश्न निम ाण झाल्याचे आंदोलनकर्त्यांनी सांगितले.


या पार्श्वभूमीवर कार्यकारी अभियंता प्रणव म ुदगल यांच्या कार्यालयाच्या प्रवेशद्वारासमोर निदर्शने करून 'हलगी बजाओ' आंदोलन करण्यात आले. आंदोलनाद्वारे संबंधित कामाची निष्पक्ष चौकशी करून दोषींवर तातडीने कारवाई करण्याची मागणी करण्यात आली.

आंदोलनात शिवसेना उपजिल्हाप्रमुख महेश पाटील, देगलूर-बिलोली विधानसभा मतदारसंघ प्रमुख पांडुरंग पाटील थडके (देगावकर), देगलूर शहरप्रमुख भगवान जाधव, युवा सेना तालुकाप्रमुख तथा शिवसेना सोशल नेटवर्कर प्रमुख भागवत पाटील सोमुरकर, युवा सेना शहरप्रमुख विनोद सोनकांबळे, युवा सेना शहर समन्वयक संतोष कांबळे, शिवसेना शहर संघटक मण्णाजी पैलावार, उपविभाग प्रमुख हाणमंत राजुरे (लख्खेकर), शिवसेना तालुका सचिव शिवाजी सोनकांबळे (मुजळगेकर) यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

दरम्यान, आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर पोलीस सहाय्यक निरीक्षक पवार, पोलीस उपनिरीक्षक मोरे, पोलीस उपनिरीक्षक आडेकर, जमादार सगरोळीकर तसेच तामलवाडी, बेग, ठाकूर, बोलमवाड आदी पोलिसांचा मोठा बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.

## पांडुरंग चौदंते यांचे निधन

**तभा वृतसेवा**
**मुदखेड, दि. ४ जुलै -**



मशहरातील भिमनगर येथील रहिवासी जेष्ठ नागरिक 'सेवानिवृत्त लाईनमेन पांडुरंग माणिकराव चौदंते यांचे दि. ०३ जुलै २०२६ रोजी सायंकाळी ७:०० वाजताच्या दरम्यान अल्पशा आजाराने वयाच्या ७४ व्या वर्षी निधन झाले.

ते अत्यंत मनमिळावू आणि प्रतिष्ठित व्यक्तिमत्त्व म्हणून परिसरात परिचित होते. त्यांच्या निधनाने चौदंते कुटुंबासह भीमनगर परिसरात मोठी शोककळा पसरली आहे. त्यांच्या पार्थिवावर दि.४ जुलै २०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता बौद्ध स्मशानभूमी, भीमनगर मुदखेड येथे अंत्यविधी करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी,चार मुलं, दोन मुली, नातवंड असा मोठा परिवार आहे. समता सैनिक दलाचे सैनिक बाळकृष्ण चौदंते, वंचित बहुजन आघाडी माजी तालुका अध्यक्ष राहुल आप्पा चौदंते यांचे ते वडील होत.

# सिडको मातृसेवा आरोग्य केंद्र अंतर्गत शंभर टक्के पल्स पोलिओ मोहीम यशस्वी

**तभा वृतसेवा**
**नवीन नांदेड, दि. ४ जुलै -**

सिडको येथील मनपाच्या मातृसेवा आरोग्य केंद्र अंतर्गत दिनांक २८ जून २०२६ रोजी केंद्र शसनाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहीम दिनांक ४ जुलै रोजी डॉ. संतोष शिंदे व डॉ. मनीषा मदने यांच्या मार्गदर्शनाखाली शंभर टक्के यशस्वीरित्या पार पडली.

केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार राज्यात दिनांक २८ जून रोजी सर्व मनापासून कार्यक्षेत्रात राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण म ोहिमेस सुरुवात करण्यात आली होती ती दिनांक ४ जुलै रोजी शंभर टक्के यशस्वीरित्या पार पडली या मोहिमेस सुरुवात करण्यात आली होती . सदरील मोहिमे मनपाचे स्थानिक लोकप्रतिनिधी,, प्रतिष्ठित नागरिक ,संबंधित आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी यांच्या उपस्थितीत या लसीकरण मोहिमेस सुरुवात करण्यात आली यावेळी सिडको मातृसेवा आरोग्य केंद्र अंतर्गत



२० बूथ वरून शून्य ते पाच वयोगटातील ७२३२ बालकांना पल्स पोलिओचा डोस पाजवण्यात आला. यावेळी सिडको आरोग्य केंद्राचे डॉ. संतोष शिंदे व डॉ. मनीषा मदने यांच्या म ार्गदर्शनाखाली मनपाचे नगरसेवक सुवर्णा बसवदे यांच्या उपस्थितीत आरोग्य कर्मचारी व आशा वर्कर यांनी पल्स पोलिओ लसीकरणास सुरुवात केली. सदरील मोहीम यशस्वी करण्यासाठी आरोग्य केंद्राचे कर्मचारी तथा सुपरवायझर सुरेश आरगुलवा ,व्हि.एम. गलपवाड, ओम सूर्यवंशी, प्रियंका रचेवार, विरांगणा वाघमारे, मीनाक्षी शिंदे, जयश्री दरेगावे, माधवी पेंढारकर यांनी परिश्रम घेतले.

# हिमायतनगर तालुक्यात खरीप पेरण्यांना वेग

**तभा वृतसेवा**
**हिमायतनगर, दि. ४ जुलै -**

पावसाअभावी लांबलेल्या खरीप हंगामातील पेरण्यांना हिम ायतनगर तालुक्यात आता वेग आला आहे. तालुक्यात आतापर्यंत ६८.९२ टक्के क्षेत्रावर पेरणी पूर्ण झाली असून उर्वरित क्षेत्रातही शेतकरी पेरणीच्या कामात व्यस्त आहेत. मृग नक्षत्र कोरडे गेल्यानंतर आर्द्रा नक्षत्रात झालेल्या पावसाम ुळे शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला असला तरी दमदार पावसाची प्रतीक्षा अद्याप कायम आहे.

तालुक्यातील वाड्या-तांड्यांसह एकूण ७४ गावांपैकी ५१ गावांचे पेरणी अहवाल कृषी विभागाकडे प्राप्त झाले असून २३ गावांचे अहवाल अद्याप येणे बाकी असल्याची माहिती तालुका कृषी कार्यालयाने दिली. आर्द्रा नक्षत्रात सुरू झालेल्या अधूनमधून पावसामुळे पेरण्यांना गती मिळाली असून दुबार पेरणीची वेळ सध्या तरी टळल्याचे चित्र आहे.

पैनगंगा नदीकाठच्या भागात सोयाबीन पिकाला प्राधान्य दिले जात आहे, तर डोंगराळ भागात कपाशीची लागवड अधिक प्रमाणात केली जाते. यंदाही सोयाबीनची लागवड सर्वाधिक राहण्याची शक्यता शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे. हवामान विभागाने यंदा सरासरीपेक्षा कमी पावसाचा अंदाज व्यक्त केल्याने कमी पाण्यावर येणाऱ्या पिकांचा सल्ला तज्ज्ञांकडून दिला जात आहे.

गेल्या वर्षी हळद पिकाला चांगले उत्पादन आणि समाधानकारक बाजारभाव मिळाल्यामुळे यंदा सिंचनाची सुविधा असलेल्या शेतकऱ्यांनी हळद लागवडीला प्राधान्य दिले आहे. विहीर किंवा बोअरवेलची सुविधा असलेल्या शेतामध्ये हळदीचे क्षेत्र वाढल्याचे दिसून येत आहे.

गेल्या आठवडाभरापासून तालुक्यात अधूनमधून हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडत असल्याने खरीप पिकांना आधार मिळत आहे. मात्र, अद्याप ओढे-नाले दुथडी भरून वाहिलेले नाहीत. पावसाचे प्रमाण मर्यादित असले तरी रानात हिरवळ पसरल्याने जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न काही प्रमाणात सुटला आहे.

# सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याचा प्रस्ताव धुळखात

**तभा वृतसेवा**
**अर्धापूर, दि. ४ जुलै -**

अर्धापूर ता शहरातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी व गुन्हेगारी प्रवृत्तीला आळा घालण्यासाठी पोलिसांनी नगरपंचायतीला शहरातील प्रमुख ठिकाण सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याचे प्रस्ताव चार वर्षांपूर्वी पाठविला होता .हा प्रस्ताव धुळखात पडुन असुन शहराची सुरक्षा व्यवस्था वाऱ्यावर सोडून दिली आहे. शहराच्या सुरक्षा व्यवस्था म जबूत करण्यासाठी सीसीटीव्ही कॅमेरे तातडीने बसविण्यात यावेत अशी मागणी नागरिकातुन केली जात आहे . शहरातील वर्दळीच्या ठिकाणी वाहतूक नियंत्रित करण्यासाठी ट्रॅफिक सिग्नल यंत्रणा लावणीची गरज आहे.या म हत्त्वाच्या प्रश्नाकडे स्थानिक लोकप्रतिनिधींनी लक्ष देण्याची गरज आहे.



अर्धापूर शहर हे तालुक्याचे ठिकाण आहे.या शहराचा विस्तार झपाट्याने होत आहे. जसा विस्तार होत आहे तशा नागरी सुविधांची गैरसोय होत आहे.हे शहर पोलीस अभिलेखत एक संवेदनशील शहर म्हणून ओळखले जाते. देशातील घटनांचे पडसाद उमटत असतात.तसेच अलीकडच्या काळात चोरीच्या घटनांत वाढ झाली आहे.आशा आप्रिय घटनांवर आळा बसावा व संशयितांना ताब्यात घेण्यासाठी मदत व्हावी यासाठी पोलिस प्रशासनाने २०२२ मध्ये शहरातील संवेदनशील भागात व सार्वजनिक ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याचा एक प्रस्ताव नगरपंचायतीला पाठविला होता.या प्रस्तावाची अंमलबजावणी करण्यात आली नाही.

शहरातील चक्रवर्ती सम्राट अशोक चौक, पांगरी रस्त्यावरील सावतामाळी चौक, बसस्थानक परिसरातील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर चौक, बसवेश्वर चौक, तहसील कार्यालय परिसर, वसमत फाटा, शहरातील मारुती मंदिर परिसर, छोटी दर्गा आदि ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याचा प्रस्ताव आहे.

शहरातील वाहतूक व्यवस्था सुरळीत ठेवण्यासाठी तहसील कार्यालय परिसर, म हात्मा बसवेश्वर चौक, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर चौक, यांसह सार्वजनिक ठिकाणी ट्राफिक सिग्नल यंत्रणा लावणीची गरज आहे.या ठिकाणी वाहतूकीची कोंडी होत असते . तसेच अनियंत्रित वाहतूकीमुळे अपघातांच्या घटना झाल्या आहेत.

अर्धापूर पोलिस ठाण्याने शहरातील विविध भागात सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याचा प्रस्ताव चार वर्षांपूर्वी पाठविला आहे.या प्रस्तावाची अंमलबजावणी करून कॅमेरा बसविण्याची गरज आहे अशी माहिती जमादार भिमराव राठोड यांनी दिली.

शहरातील विविध भागात सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याचा प्रस्ताव पोलिस ठाण्याकडुन प्राप्त झाला आहे.हा प्रस्ताव वरिष्ठ कार्यालयाकडे पाठविण्यात आला आहे.या कामासाठी निधी उपलब्ध झाल्यावर सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात येणार आहेत अशी माहिती मुख्याधिकारी जगदीश दळवी यांनी दिली.

# 'प्रेस'चा फलक लावून गुटखा वाहतूक करणारा आरोपी जेरबंद

**तभा वृतसेवा**
**बिलोली, दि. ४ जुलै -**

बिलोली पोलीस ठाण्याच्या पथकाने खतगाव - मिनकी रोडवर गस्ती दरम्यान संशयित एमएच - २६ - सीजे -६५५३ क्रमांकाच्या मोटारसायकलीची तपासणी केली. तपासणीदरम्यान वाहनातून सागर पान मसाला, सुगंधित गुटखा व तंबाखू असा प्रतिबंधित माल आढळून आला. पोलिसांनी तात्काळ कारवाई करत संपूर्ण मालासह मोटारसायकल जप्त केली. या कारवाईत एकूण ५१ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

तपासादरम्यान संबंधित मोटारसायकलवर 'झठएडड' असा फलक लावून पोलिसांची दिशाभूल करण्याचा प्रयत्न करण्यात आल्याचे उघड झाले. याप्रकरणी शिवदर्शन नंदयाप्पा स्वामी (वय ४४) याला ताब्यात घेऊन त्याच्याविरुद्ध बीएनएस कलम १२३, २२३, २७४, २७५ तसेच इतर संबंधित कायद्यांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही कारवाई बिलोली पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक बाळासाहेब रोकडे यांच्या मार्गदर्शनाखाली एपीआय जाधव, पोलीस उपनिरीक्षक एस. व्ही. देगलूरकर आणि पोलीस कॉन्स्टेबल निरंजन अंबुरे यांनी केली. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक एस. व्ही. देगलूरकर करीत आहेत.

## फ्लिपकार्ट गोट सेलसाठी आकर्षक ऑफर्स जाहीर

**मुंबई :** एआई प्लस स्मार्टफोनने फ्लिपकार्टच्या बहुप्रतीक्षित गोट सेलसाठी आपल्या स्मार्टफोन आणि एआईओटी उत्पादनांच्या संपूर्ण पोर्टफोलिओवर आकर्षक किमती जाहीर केल्या आहेत. फ्लिपकार्ट प्लस सदस्यांना 3 जुलैपासून सेलमध्ये लवकर प्रवेश मिळेल, तर 4 जुलैपासून गोट सेल सर्व ग्राहकांसाठी खुला होईल. या वर्षीच्या गोटसेलमधील प्रमुख आकर्षण म्हणजे एआई प्लस प्लस 2, जो आतापर्यंतच्या सर्वात कमी ₹8,999 या विशेष किमतीत उपलब्ध असेल. याशिवाय ग्राहकांना नोवा सीरीज़, वेअरेबल्स, ऑडिओ उत्पादने आणि टॅबलेट्सवरही आकर्षक ऑफर्सचा लाभ घेता येईल.

## हेयर इंडियाने पी7 प्रो सीरिज लाँच केली

**मुंबई :** सलग १७ वर्षे जगातील नंबर १ ग्लोबल मेजर अ‍ॅप्लायन्सेस ब्रँड म्हणून मान्यताप्राप्त हेयर अ‍ॅप्लायन्सेस इंडिया, आपली संपूर्ण नवीन एचक्यूएलईडी पी7 प्रो सीरिज लाँच करून होम एंटरटेनमेंट क्षेत्रात नवा मापदंड स्थापित करत आहे. ही पुढच्या पिढीची स्मार्ट टीव्ही मालिका सर्वोत्तम साउंड, अप्रतिम पिक्चर क्वालिटी आणि एआई -चालित अनुभव देण्यासाठी तयार करण्यात आली आहे. याच्या केंद्रस्थानी आहे एक शक्तिशाली सिनेमा-ग्रेड 50डब्ल्यू 2.1 चॅनेल स्पीकर सिस्टम, इंटिग्रेटेड सबवूफरसह — जे खोल बेस, स्पष्ट व्होकल्स आणि खोली भरून टाकणारा समृद्ध आवाज निर्माण करते आणि प्रत्येक चित्रपट, सामना आणि संगीत सादरीकरण अविस्मरणीय बनवते. डॉल्बी अ‍ॅटमॉस® टोटल सोनिक्सऑडिओ एन्हान्समेंटसह, पी7 प्रो सीरिज एक खऱ्या अर्थाने सिनेमॅटिक ऑडिओ अनुभव प्रदान करते आणि आपल्या श्रेणीत साउंड परफॉर्मन्समध्ये नवा मानदंड स्थापित करते.

## टोयोटा किर्लोस्कर मोटरने 31,016 वाहनांच्या विक्रीची नोंद केली

**बंगळुरू:** टोयोटा किर्लोस्कर मोटर (टीकेएम) ने आज जून २०२६ महिन्यातील विक्रीची कामगिरी जाहीर केली.कंपनीने जून २०२६ मध्ये एकूण ३१,०१६ वाहनांची विक्री केली असून,जून २०२५ मधील २८,८६९ वाहनांच्या विक्रीच्या तुलनेत ७ टक्के वाढ नोंदवली आहे. यामध्ये देशांतर्गत बाजारपेठेत विक्री झालेल्या २८,४४१ वाहनांचा आणि निर्यात करण्यात आलेल्या २,५७५ वाहनांचा समावेश आहे. जून २०२५ च्या तुलनेत जून २०२६ मध्ये टोयोटा किर्लोस्कर मोटरच्या एकूण विक्रीत ७ टक्के वाढ झाली आहे. जून २०२५ मध्ये कंपनीने २८,८६९ युनिट्सची विक्री केली होती, तर जून २०२६ मध्ये ही संख्या ३१,०१६ युनिट्सपर्यंत पोहोचली.देशांतर्गत विक्री जून २०२५ मधील २६,४५३ युनिट्सवरून जून २०२६ मध्ये २८,४४१ युनिट्सवर पोहोचली असून, त्यामध्ये ८ टक्के वाढ नोंदविण्यात आली आहे.

## लहू उघडे ठरले आदिमानव'चे विजेते

**मुंबई :** पुणेस्थित गिर्यारोहक लहू उघडे यांनी वॉर्नर ब्रदर्स डिस्कव्हरीच्या 'नेकेड अँड अफ्रेड: आदिमानव' या भारतीय सर्व्हायव्हल शोचे विजेतेपद पटकावले. फिलिपाइन्समधील पालावानच्या कठीण रानावनात सहा स्पर्धकांमध्ये त्यांनी चिकाटी, निर्णयक्षमता आणि सर्व्हायव्हल कौशल्यांच्या जोरावर विजय मिळवला. शोचे सर्व भाग डिस्कव्हरी आणि डिस्कव्हरी+ वर उपलब्ध आहेत.

## अदाणी ग्रीन एनर्जीने 20 गीगावॅट नवीकरणीय ऊर्जा क्षमतेचा टप्पा गाठला

**मुंबई :** अदाणी ग्रीन एनर्जी लिमिटेडने 20 गीगावॅट कार्यरत नवीकरणीय ऊर्जा क्षमतेचा टप्पा पार केला आहे. ग्रीनफिल्ड प्रकल्पांच्या माध्यमातून हा टप्पा गाठणारी कंपनी भारतातील पहिली नवीकरणीय ऊर्जा कंपनी ठरली आहे. एजीईएल दरवर्षी 52 अब्ज युनिट्सपेक्षा अधिक स्वच्छ वीज निर्मिती करते, जी भारताच्या एकूण वीज वापराच्या सुमारे 3 टक्के आहे. आर्थिक वर्ष 2025-26 मध्ये कंपनीने 5,051 मेगावॅट नवीन क्षमता कार्यान्वित केली असून, चीनबाहेरील कोणत्याही कंपनीने एका वर्षात केलेली ही सर्वाधिक क्षमता वाढ असल्याचे कंपनीने म्हटले आहे.

## महावीर हॉस्पिटलमध्ये नवीन डायलिसिस सेंटर सुरू

**छत्रपती संभाजीनगर :** नेफ्रोप्लस या आशियातील आघाडीच्या डायलिसिस केअर नेटवर्कने आज महावीर हॉस्पिटल, बिझ झोन, कॉनॉट प्लेस, सिडको कॉनॉट, सिडको, छत्रपती संभाजीनगर, महाराष्ट्र येथे आपल्या नवीन डायलिसिस सेंटरच्या शुभारंभाची घोषणा केली. ही नवीन सुविधा नेफ्रोप्लसचे या भागातील पहिले आणि शहरातील दुसरे सेंटर आहे, ज्यामुळे क्रॉनिक किडनी आजार असलेल्या रुग्णांसाठी जागतिक दर्जाच्या डायलिसिस उपचारांची उपलब्धता अधिक सुसाध्य होईल. नव्याने सुरू करण्यात आलेले हे सेंटर पाच प्रगत डायलिसिस मशिन्सनी सुसज्ज आहे, ज्यामध्ये चार निगेटिव्ह एचडी मशिन्स आणि एक पॉझिटिव्ह एचडी मशीनचा समावेश आहे. या सेंटरमध्ये दररोज प्रति मशीन सरासरी चार डायलिसिस सेशन्स देण्याची क्षमता आहे. तसेच, हे सेंटर एफएमसी ५००८ एस मशीनने सुसज्ज आहे, ज्यामुळे हेमोडियाफिल्ट्रेशन (एचडीएफ) करणे शक्य होते. एचडीएफ प्रगत डायलिसिस पद्धती आहे, जी पात्र रुग्णांच्या शरीरातून घातक विषारी द्रव्ये अधिक प्रभावीपणे बाहेर काढण्यास मदत करते.

## जागतिक ॲल्युमिनियम पुरवठा साखळीत ओडिशाला महत्त्वाचे स्थान

**भुवनेश्वर, भारत – 3 जुलै 2026:** अदाणी समूहाची प्रमुख कंपनी अदाणी एंटरप्रायझेस लिमिटेड (एईएल) आणि 2 पॉइंटझिरो मार्फत आयएचसी समूहाची कंपनीतसेच अबू धाबीस्थित नैसर्गिक संसाधन गुंतवणूक व्यासपीठ इंटरनॅशनल रिसोर्सेस होल्डिंग (आयआरएच) यांनी आज खनिजसंपन्न ओडिशा राज्यात एकात्मिक ग्रीनफिल्ड ॲल्युमिनियम प्रकल्प विकसित करण्यासाठी ओडिशा सरकारसोबत सामंजस्य करार (एमओयू) केला. प्रस्तावितप्रकल्पासाठी एईएलआणि आयएचसीआपली उपकंपनी आयआरएचमार्फत 50:50 संयुक्त उपक्रम (जॉईंट व्हेंचर) स्थापन करणार आहेत.सुमारे ₹1.08 लाख कोटी (11.5 अब्ज अमेरिकन डॉलर्स) किमतीच्या या प्रस्तावित गुंतवणुकीला ओडिशामधील आतापर्यंतचा सर्वात मोठा थेट परकीय गुंतवणूक (एफडीआय) प्रस्ताव तसेच भारतातील धातुकर्म क्षेत्रातील सर्वात मोठी परकीय गुंतवणूक होण्याची अपेक्षा आहे. या प्रकल्पामध्येदरवर्षी 4 दशलक्ष मेट्रिक टन (एमएमटीपीए) क्षमतेची ॲल्युमिना रिफायनरी, 2 एमएमटीपीए क्षमतेचा ॲल्युमिनियम स्मेल्टर, 4,000 मेगावॅट क्षमतेचा कॅप्टिव्हवीज प्रकल्प आणि आवश्यक पायाभूत सुविधांनी सुसज्ज 1 एमएमटीपीए क्षमतेचे डाउनस्ट्रीम मॅन्युफॅक्चरिंग पार्क उभारण्यात येणार आहे. या प्रकल्पामुळेबांधकाम आणि संचालन या दोन्ही टप्प्यांमध्ये मिळून सुमारे 53,500 रोजगारनिर्माण होण्याची अपेक्षा आहे.

## झी 5वर 'फ्रेम'चा प्रीमियर

**छत्रपती संभाजीनगर :** मराठी झी5ने 'फ्रेम'या आपल्या आगामी ओरिजिनल चित्रपटाची घोषणा केली आहे. व्यावसायिक जबाबदारी आणि माणुसकी यांच्यातील नाजूक सीमारेषेचा वेध घेणाऱ्या या प्रभावी सामाजिक चित्रपटाच्या कथानकात सतत नैतिक मूल्यांची कसोटी घेण्यात आली आहे.या चित्रपटाची निर्मिती आटपाट आणि झी स्टुडिओज यांनी केली आहे.फोटो जर्नालिझमच्या माध्यमातून शोकांतिकेचे चित्रण करताना त्यासाठी मोजावी लागणारी भावनिक आणि नैतिक किंमत हा या चित्रपटाचा मध्यवर्ती विषय आहे. चित्रपटाचा प्रीमियर 10 जुलै 2026 रोजी मराठी झी5वर होणार आहे.

# 'सहकारातून समृद्धीकडे'चा संदेश; युवकांना सहकार चळवळीत सहभागी होण्याचे आवाहन



तभा वृत्तसेवा

**छत्रपती संभाजीनगर :** केंद्रीय सहकार मंत्रालयाच्या स्थापनेला पाच वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने सहकार भारती, वर्धमान नागरी सहकारी पतसंस्था, छत्रपती संभाजीनगर सहकार विभाग आणि ऑडिटर कौन्सिल अँड वेल्फेअर असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित "सहकारातून समृद्धीकडे" सहकार संवाद मेळावा उत्साहात पार पडला. युवकांमध्ये सहकाराविषयी जागरूकता निर्माण करून त्यांचा सहकार क्षेत्रातील सहभाग वाढविण्याच्या उद्देशाने आयोजित या मेळाव्याला मोठा प्रतिसाद मिळाला.

मेळाव्यात "सहकारातील संधी" या विषयावर आयोजित संवादात विभागीय सहनिबंधक (सहकार) संतोष बिडवई, जिल्हा उपनिबंधक (सहकारी संस्था) समृत जाधव, वर्धमान नागरी सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष तथा महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था संघाचे उपाध्यक्ष शांतीलाल शिंगी आणि किशोर चव्हाण यांनी मार्गदर्शन केले. सहकार क्षेत्रात युवकांसाठी उपलब्ध रोजगार, उद्योजकता आणि नेतृत्वाच्या संधींचा लाभ घेत सहकार चळवळ अधिक सक्षम करण्याचे आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ऑडिट सह प्रकोष्ठ, महाराष्ट्र राज्य सहकार भारतीचे आबासाहेब देशमुख यांनी केले.

यावेळी सहकार भारती महाराष्ट्र प्रदेशचे प्रदेश सचिव सुनील मोटलग, सहकार भारती छत्रपती संभाजीनगर विभागाचे विभागीय प्रमुख संभाजी राचुरे, ऑडिटर कौन्सिल अँड वेल्फेअर असोसिएशनचे विभागीय अध्यक्ष संजय वाणी, सिद्धनाथ नागरी सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष तथा नियोजन समिती प्रमुख रामेश्वर मानकापे यांच्यासह विविध सहकारी संस्थांचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि मोठ्या संख्येने युवक उपस्थित होते.

मेळाव्यात सहकार क्षेत्रातील नव्या संधी, युवकांचा सहभाग आणि सहकार चळवळीच्या भविष्यासंदर्भात सखोल मार्गदर्शन करण्यात आले. उपस्थितांनी या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद देत सहकाराच्या माध्यमातून समृद्ध समाज घडविण्याचा निर्धार व्यक्त केला.

# घाटीत बायोमेट्रिक हजेरी सक्तीची; निवासी डॉक्टरांना 8 तासांची ड्युटी



तभा वृत्तसेवा

**छत्रपती संभाजीनगर :** शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय (घाटी) तसेच राज्य कर्करोग रुग्णालयातील प्रशासन अधिक कार्यक्षम, शिस्तबद्ध आणि रुग्णसेवा सक्षम करण्याच्या उद्देशाने शुक्रवारी महाविद्यालयीन परिषदेची बैठक पार पडली. अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीत कर्मचारी, निवासी डॉक्टर आणि रुग्णसेवेशी संबंधित अनेक महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले.

बैठकीत वर्ग-३ कर्मचारी व नर्सिंग स्टाफसाठी बायोमेट्रिक हजेरी सक्तीची करण्यात आली. निवासी डॉक्टरांचे वेतन दर महिन्याच्या ५ तारखेपूर्वी अदा करण्याचे बंधनकारक करण्यात आले असून, त्यांना दिवसाला केवळ ८ तासांचीच ड्युटी देण्याचे निर्देश सर्व विभागांना देण्यात आले. प्रत्येक विभागाने निवासी डॉक्टरांचे ड्युटी वेळापत्रक एका आठवड्यात अधिष्ठाता कार्यालयात सादर करावे, असेही आदेश देण्यात आले.

राज्य कर्करोग रुग्णालयातील स्थानिक स्तरावर भरता येणाऱ्या विविध रिक्त पदांच्या भरती प्रक्रियेला मान्यता देण्यात आली. डॉक्टर व कर्मचाऱ्यांच्या सेवापुस्तिका अद्ययावत करण्यासाठी विशेष शिबिर आयोजित करण्यात येणार असून, सर्व व्हेंटिलेटर १०० टक्के कार्यान्वित करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या. किरणोपचार विभागातील यंत्रसामग्रीच्या दुरुस्तीसाठी ५५ लाख रुपये, तर ग्रंथालयासाठी २० लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला. पेट-सीटी स्कॅन तपासणीसाठी डॉ. दर्पण जक्कल यांची नोडल अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली. तसेच सर्व डॉक्टरांनी सकाळी १०.३० वाजेपर्यंत कर्तव्यावर हजर राहावे, अन्यथा लेखी खुलासा मागविण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला.

यावेळी डॉ. अरविंद गायकवाड, उपअधिष्ठाता डॉ. काशिनाथ गर्कळ, डॉ. सुरेश हरबडे, डॉ. विनोद मुंदडा, डॉ. गायत्री तडवळकर, डॉ. मिर्झा सिराज बेग, डॉ. भारत सोनवणे, डॉ. अर्चना राठोड-पवार, डॉ. अंजली दहिफळे, वैद्यकीय अधीक्षक सुचिता जोशी, डॉ. एम. बी. लिंगायत यांच्यासह विविध विभागांचे प्रमुख उपस्थित होते.

# गंगापूर तालुक्यात 14 अंगणवाडी मदतनिस पदांसाठी भरती; 14जुलैपर्यंत अर्ज करण्याचे आवाहन

तभा वृत्तसेवा

**गंगापूर दि.४:** एकात्मिक बाल विकास सेवा योजना, गंगापूर-१ प्रकल्पांतर्गत तालुक्यातील विविध गावांमध्ये मंजूर अंगणवाड्यांसाठी अंगणवाडी मदतनिस (महिला) पदांच्या भरतीसाठी अर्ज मागविण्यात आले आहेत. इच्छुक व पात्र महिला उमेदवारांनी दि. १ जुलै ते १४ जुलै २०२६ या कालावधीत अर्ज सादर करावेत, असे आवाहन बालविकास प्रकल्प अधिकारी गोविंद अंधारे यांनी केले आहे.

या भरती प्रक्रियेत नेवरगाव-२(१), जामगाव-१ व २ (२), प्रतापूरवाडी वस्ती (२), वैरागड (१), सावंगी-२ (१), दायगाव (१), पिंपळगाव (१), गाजगाव-२ (१), कनकोरी (१), अकोलीवाडगाव-२ (१), पिंपरी (१) आणि उत्तरवाडी (१) अशा एकूण १४ गावांमध्ये १४ अंगणवाडी मदतनिस पदे भरण्यात येणार आहेत.

अर्जदार महिला किमान बारावी उत्तीर्ण असणे आवश्यक असून अर्जासोबत बारावीची स्वसाक्षांकित गुणपत्रिका जोडणे बंधनकारक आहे. तसेच पदवी, पदव्युत्तर, डी.एड., बी.एड., एमएस-सीआयटी किंवा शासनमान्य संगणक अभ्यासक्रमाची प्रमाणपत्रे असल्यास त्यांच्याही स्वसाक्षांकित प्रती अर्जासोबत जोडाव्यात. केवळ अर्जात गुण नमूद करून गुणपत्रिका न जोडल्यास त्या गुणांचा विचार केला जाणार नसल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. यापूर्वी अंगणवाडी मदतनिस पदासाठी अर्ज केलेल्या उमेदवारांनीही नव्याने अर्ज करणे आवश्यक असून, पूर्वीचे अर्ज ग्राह्य धरले जाणार नाहीत. अर्जदाराने स्वतः कार्यालयात उपस्थित राहूनच अर्ज सादर करावा. पोस्टाने, प्रतिनिधीमार्फत किंवा इतर कोणत्याही माध्यमातून आलेले अर्ज स्वीकारले जाणार नाहीत.

सर्वसाधारण महिला उमेदवारांसाठी १८ ते ३५ वर्षे, तर विधवा महिलांसाठी १८ ते ४० वर्षे वयोमर्यादा निश्चित करण्यात आली आहे. पात्र महिला उमेदवारांनी आवश्यक कागदपत्रांसह विहित मुदतीत अर्ज सादर करून या भरती प्रक्रियेचा लाभ घ्यावा, असे आवाहन बालविकास प्रकल्प अधिकारी गोविंद अंधारे यांनी केले आहे.

# महाकर्जमुक्ती योजनेतील लाभार्थी शेतकऱ्यांना दिलासा, लाभ मिळेपर्यंत व्याज आकारू नये; शासन निर्णय निर्गमित

**छत्रपती संभाजीनगर :** राज्य शासनाच्या 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०२६' अंतर्गत पात्र ठरलेल्या शेतकऱ्यांना आणखी एक मोठा दिलासा देण्यात आला आहे. योजनेचा प्रत्यक्ष लाभ शेतकऱ्यांच्या कर्जखात्यात जमा होईपर्यंत जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका तसेच विविध कार्यकारी सहकारी संस्थांनी पात्र थकीत पीककर्जाच्या रकमेवर कोणत्याही प्रकारची व्याज आकारणी करू नये, असे स्पष्ट आदेश सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाने जारी केले आहेत.

मंत्रिमंडळाने मंजूर केलेल्या कर्जमुक्ती योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. शासन निर्णयानुसार ३० सप्टेंबर २०२५ रोजी थकीत असलेली आणि ३१ मार्च २०२६ पर्यंत परतफेड न झालेली पात्र पीककर्जे या योजनेसाठी ग्राह्य धरण्यात आली आहेत. अशा पात्र शेतकऱ्यांना दोन लाख रुपयांपर्यंत कर्जमुक्तीचा लाभ मिळणार असून, दोन लाख रुपयांपेक्षा अधिक कर्ज असलेल्या शेतकऱ्यांना अतिरिक्त रक्कम भरल्यानंतर एकवेळ समाझोता योजनेचा लाभ मिळणार आहे. तसेच नियमित पीककर्जाची परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहनपर लाभ देण्यात येणार आहे.

या योजनेत अल्पमुदतीची पीककर्जे तसेच पुनर्गठित आणि फेरपुनर्गठित पीककर्जांचाही समावेश करण्यात आला आहे. योजनेच्या अंमलबजावणीसाठी मानक कार्यपद्धती (SOP) निश्चित करण्यात आली असून, पात्र कर्जखात्यांची माहिती संगणकीय प्रणालीवर अपलोड करणे, कर्जखात्यांचे पडताळणीकरण, आधार प्रमाणीकरण आणि त्यानंतर कर्जमाफीची रक्कम संबंधित कर्जखात्यात हस्तांतरित करण्याची प्रक्रिया राबविण्यात येणार आहे.

# जिल्हा मध्यवर्ती बँकेसाठी पैठणला 99. 4 टक्के मतदान



तभा वृत्तसेवा

**पैठण दि ०४ :-** दि औरंगाबाद जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लिमिटेड छत्रपती संभाजी नगर संचालक मंडळ निवडणुकीसाठी पैठण सहाय्य निबंधक कार्यालय मार्केट कमिटी जवळ मतदान केंद्रावर एकूण १०५ मतदाना पैकी १०४ मतदान झाले. मतदान केंद्रावर पैठण तालुक्याचे प्रथम नागरिक जिल्हा बँकेचे संचालक आमदार विलास बाप्पू भुमरे यांनी आपला मतदानाचा हक्क बजावला. मतपेटीत संचालक पदासाठी उभे असलेल्या उमेदवारांचे भवितव्य बंद झाले असून त्याचा फैसला रविवारी जिल्हा बँकेच्या सभागृहात होणाऱ्या मतमोजणीत होणार आहे.

जिल्हा मध्यवर्ती बँकेची ही निवडणूक अत्यंत महत्त्वाचे समजले जात असून या निवडणुकीत महायुती पुरस्कृत शेतकरी विकास पॅनलचे वीस पैकी आठ उमेदवार बिनविरोध निवडून आले आहे. यात पैठण तालुक्याचे लोकप्रिय आमदार विलास बापू भुमरे यांची संचालक मंडळावर प्राथमिक कृषी पतपुरवठा सोसायटी पैठण वर्गातून बिनविरोध निवड झाल्याने त्यांचे अभिनंदन करण्यात आले. तालुक्यातील सहकार क्षेत्रात महत्त्वाचे नाव असलेले शिवाजी नागरी बँकेचे अध्यक्ष रवींद्र काळे हे नॉन ॲग्री मतदार वर्गातून या निवडणुकीत उभे आहेत त्यांचे पाठोपाठ महिला राखीव मतदार संघातून मुक्ता शाम तांगडे या उमेदवार आहेत एकूण 20 संचालक मंडळासाठी ही निवडणूक पार पडणार आहे. यात शेतकरी विकास पॅनलचे आठ उमेदवार बिनविरोध निवडून आले आहेत तर त्यांना महाविकास आघाडी पुरस्कृत भूमिपुत्र शेतकरी सहकार बँक बचाव पॅनल तगडी झुंज देत आहे पैठण सहाय्यक निबंधक कार्यालय या ठिकाणी शनिवारी सकाळी 8 ते सायंकाळी 4 या कालावधीत मतदान प्रक्रिया पार पडली असून यात पैठणला एकूण 105 मतदार आहेत. त्यात सोसायटी मतदार संघातून 88 पैकी ८७ मतदारांनी आपल्या मतदानाचा हक्क बजावला नॉन एग्री संघाच्या १६ पैकी १६ म तदारांनी तसेच पणन संघातून एकमेव असलेल्या मतदाराने आपल्या मतदानाचा हक्क बजावला असे एकूण १०५ पैकी १०४ मतदारांनी आपल्या मतदानाचा हक्क बजावला आहे. रविवारी जिल्हा बँकेच्या कार्यालयात मतमोजणी प्रकिया होऊन निवडणूकीचा निकाल जाहिर करण्यात येणार आहे. सहाय्यक निबंधक बलराम नवथर यांच्या मार्गदर्शनाखाली पैठणच्या मतदान केंद्रावर तुषार खिस्ती -केंद्राध्यक्ष, शैलेश गव्हाणे - मतदान अधिकारी , सुरज टाक -मतदान अधिकारी , ज्योती चव्हाण -मतदान अधिकारी ,रॅम जाधव -कर्मचारी आदींना मतदान प्रक्रिया शांततेत पार पडली .

## आक्षेपार्ह वक्तव्याचा निषेध; सकल मातंग समाजाचा बिडकीनमध्ये मुकमोर्चा, कारवाईची मागणी



तभा वृत्तसेवा

**बिडकीन, दि ४ जुलै :** सोशल मीडियावर आद्य क्रांतिगुरु लहुजी वस्ताद साळवे, साहित्यरत्न डॉ. अण्णा भाऊ साठे तसेच मातंग समाजाबद्दल कथित आक्षेपार्ह व अपमानास्पद वक्तव्य करणाऱ्या व्यक्तीविरुद्ध कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी, या मागणीसाठी सकल मातंग समाज, बिडकीन व चितेगाव सर्कलच्या वतीने शुक्रवारी मुकमोर्चा काढून बिडकीन पोलिस ठाण्यात निवेदन देण्यात आले.निलजगाव फाटा येथून सुरू झालेला मुकमोर्चा बिडकीन पोलिस ठाण्यात पोहोचला. यावेळी सहायक पोलीस निरीक्षक निलेश शेळके यांनी निवेदन स्वीकारून प्रकरणाची कायदेशीर चौकशी करून नियमानुसार आवश्यक ती कारवाई करण्यात येईल, असे आश्वासन दिले.यावेळी ग्रामपंचायत सदस्य रमेश शिंदे, उमेश त्रिभुवन, भरत मोघे,राहुल मिसाळ, किशोर मिसाळ, अंकुश अवचिंदे, किशोर कांबळे, शाम पाटोळे, रविंद्र गायकवाड,संदीप बत्तीसे, अण्णा बत्तीसे, सचिन गायकवाड, निलेश आव्हाड, आदित्य घुले, कृष्णा जगधने, विशाल जगधने, नितीन मोरे, किरण अवचिंदे, निलेश गायकवाड, सुनील गुढेकर, जिजा गुढेकर, आकाश गायकवाड, राहुल उमप, लहु मोघे, संदीप साबळे, आकाश ढगे, ज्ञानेश्वर साळवे यांच्यासह सकल मातंग समाज, बिडकीन व चितेगाव सर्कलमधील मोठ्या संख्येने समाजबांधव उपस्थित होते.

## फळपीक विम्यासाठी 14 जुलैपर्यंत मुदतवाढ

**छत्रपती संभाजीनगर, दि. ३ :** प्रधानमंत्री पीक विमा योजनेअंतर्गत राबविण्यात येणाऱ्या पुनर्रचित हवामान आधारित फळपीक विमा योजनेत सहभागी होण्यासाठी शेतकऱ्यांना मोठा दिलासा देत संत्रा, मोसंबी, डाळिंब, चिकू, पेरू, लिंबू, द्राक्ष आणि हळद या पिकांसाठी विमा भरण्याची अंतिम मुदत १४ जुलै २०२६ पर्यंत वाढविण्यात आली आहे. शासनाची मंजुरी उशिरा मिळाल्यामुळे ही मुदतवाढ देण्यात आली असून, अधिकाधिक शेतकऱ्यांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन विभागीय कृषि सहसंचालक सुनिल वानखेडे यांनी केले आहे. सन २०२६-२७ या वर्षासाठी छत्रपती संभाजीनगर, जालना आणि बीड जिल्ह्यांमध्ये ही योजना लागू करण्यात आली आहे. हवामानातील प्रतिकूल बदलांमुळे होणाऱ्या आर्थिक नुकसानीपासून फळबागांचे संरक्षण करण्यासाठी ही योजना महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

शेतकरी पीक विमा पोर्टलद्वारे स्वतः, आपले सेवा केंद्र, विमा प्रतिनिधी किंवा बँकेच्या माध्यमातून अर्ज करू शकतात. योजनेत कर्जदार तसेच बिगर कर्जदार शेतकऱ्यांना ऐच्छिक सहभागाची संधी असून, डिजिटल पीक सर्वेक्षण (DCS), AgriStack Farmer ID, आधार संलग्न बँक खाते आणि फळबागेचे जिओ-टॅगिंग अनिवार्य करण्यात आले आहे. योजनेअंतर्गत कमी पाऊस, पावसाचा खंड, अतिवृष्टी, जास्त तापमान, आर्द्रता आदी हवामान धोक्यांपासून विमा संरक्षण मिळणार असून, अधिसूचित हवामान केंद्रांवरील नोंदीच्या आधारे नुकसानभरपाई अदा करण्यात येणार आहे. संत्रा, मोसंबी, डाळिंब, चिकू, पेरू, लिंबू, द्राक्ष व हळद उत्पादक शेतकऱ्यांनी १४ जुलैपूर्वी, तर सिताफळ उत्पादकांनी ३१ जुलैपूर्वी विमा योजनेत सहभागी होऊन या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन विभागीय कृषी सहसंचालक, छत्रपती संभाजीनगर यांनी केले आहे.

## जगद्धात्री'त मूसासोबत निर्णायक सामना; कथेत नव्या ट्विस्टची चाहूल



तभा वृत्तसेवा

**छत्रपती संभाजीनगर :** झी टीव्हीवरील 'जगद्धात्री' मालिकेत शिवाय आणि जगद्धात्रीच्या लग्नसोहळ्यासोबतच मूसाच्या शोधाचे मिशन निर्णायक टप्प्यावर पोहोचले आहे. आगामी भागांमध्ये जगद्धात्रीचा थेट मूसासोबत सामना होणार असून ॲक्शन, भावना आणि थरार यांचा संगम प्रेक्षकांना पाहायला मिळणार आहे. मुख्य अभिनेत्री सोनाक्षी बत्रा म्हणाल्या, "मूसाविरुद्धची लढाई महत्त्वाची असली तरी जगद्धात्रीचे मिशन इथे संपत नाही. पुढे आणखी मोठे रहस्य आणि अनपेक्षित ट्विस्ट प्रेक्षकांना पाहायला मिळतील." दरम्यान, शिवाय-जगद्धात्रीच्या लग्नसोहळ्याच्या आनंदातही धक्कादायक घडामोडी घडणार असून मालिकेचे कथानक नव्या वळणावर जाणार आहे. 'जगद्धात्री' मालिका दररोज रात्री १० वाजता झी टीव्हीवर प्रसारित होते.

### जाहीर प्रगटन / सायटेशन नोटीस

**मा. श्री. अ. अ. कळमकर, 2 रे सह. दिवाणी न्यायाधिश, (क.स्तर) न्यायालय गंगापूर**

सिव्हील एम.ए. क्रं. 449/2026

प्रकरणात पुढील तारीख 07/08/2026

अर्जदार : विजयकुमार गोविंदराव वळामे वय 66 वर्षे, धंदा मजूरी रा. प्लॉट नं. ए-43, नाथ नगर, श्री चिंतामणी प्रोविजन समोर, बाजाली नगर, औरंगाबाद, ता. जि. औरंगाबाद

// विरूध्द //

गैरअर्जदार - निरंक

प्रकरण - बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट VIII 1827 अन्वये लिगल हेअरशिप सर्टिफिकेट मिळणेबाबत.

सर्व जनतेस कळविण्यात येते उपरोक्त अर्जदारांनी या न्यायालात ॲड. आसिफ आय. शहा रा. लासूर स्टेशन, ता. गंगापूर जि. औरंगाबाद यांच्या मार्फत बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट VIII 1827 अन्वये लिगल हेअरशिप सर्टिफिकेट / वारस प्रमाणपत्र मिळणेकामी अर्ज सादर केला की, अर्जदार वरील नमुद ठिकाणचे कायमस्वरूपी राहणार असून अर्जदाराचे वडील नामे गोविंदराव नारायण वळामे दिनांक 13/05/1996 रोजी मौजे लासूर स्टेशन, ता. गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) येथे मयत झाले आहे. तसेच अर्जदाराची आई नामे आशाबाई गोविंदराव वळामे दिनांक 29/05/2013 रोजी मौजे लासूर स्टेशन, ता. गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) येथे मयत झालेली आहे. त्यामुळे मयत आशाबाई गोविंदराव वळामे यांना अर्जदार हा ऐकमेव मुलगा या नात्याने कायदेशीर वारसदार असून अर्जदाराच्या व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारसदार नाही. मयत आशाबाई गोविंदराव वळामे यांच्या मृत्युमुळे अर्जदारांना शासकिय, निमशासकिय व इतर कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने अर्जदारांनी सदरचा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला असून वारस प्रमाणपत्राची मागणी केलेली आहे. सबब सदर प्रकरणी कोणाचाही कोणत्याही प्रकारचा आक्षेप किंवा उजर असल्यास त्यांनी प्रस्तुत जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून 30 दिवसांच्या आत या न्यायालात नोंदवावा. त्यानंतर आलेल्या उजर, आक्षेपाचा विचार केला जाणार नाही व अर्जदारांच्या मागणीप्रमाणे त्यांच्या हक्कात वारस प्रमाणपत्र देण्यात येईल करीता जाहीर प्रगटन.

आज दिनांक 04/07/2026 रोजी माझ्या सहिने व या न्यायालयाच्या शिक्कयानिशी दिले.

आदेशावरून

लिपीक | सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय क. स्तर गंगापूर

### जाहीर प्रगटन / सायटेशन नोटीस

**मा. श्री. एम. ए. शेख, सह. दिवाणी न्यायाधिश, (क.स्तर) न्यायालय गंगापूर**

सिव्हील एम.ए. क्रं. 445/2026

प्रकरणात पुढील तारीख 14/08/2026

चर्च जवळ, सिरसाठ गल्ली, लासूर स्टेशन, ता. मजूरी रा. चर्च जवळ, सिरसाठ गल्ली, लासूर 46 वर्षे, धंदा घरकाम रा. मु. पो. देवगांव घरकाम रा. मस्तुमिया मस्जिद 50 वर्षे, धंदा घरकाम अर्जदार 1) कलिम नसिर शेख वय 51 वर्षे, धंदा मजूरी रा. गंगापूर, जि. औरंगाबाद 2) मोईन नसीर शेख वय 48 वर्षे, धंदा स्टेशन, ता. गंगापूर, जि. औरंगाबाद 3) जकिया बी शब्बीर शेख वय रंगारी, ता. कन्नड, जि. औरंगाबाद 4) सुलताना एजाज शेख वय 37 वर्षे, धंदा जवळ, बाजार तल, गंगापूर ता. गंगापूर, जि. औरंगाबाद 5) जेबुन्निसा सलीम शेख वय रा. चर्च जवळ, सिरसाठ गल्ली, लासूर स्टेशन, ता. गंगापूर, जि. औरंगाबाद 6) शाकीर सलीम शेख वय 35 वर्षे, धंदा मजूरी रा. चर्च जवळ, सिरसाठ कॉलोनी, लासूर स्टेशन, ता. गंगापूर, जि. औरंगाबाद 7) जाकीर सलीम शेख वय 32 वर्षे, धंदा मजूरी रा. चर्च जवळ, चर्च गल्ली, लासूर स्टेशन, ता. गंगापूर, जि. औरंगाबाद 8) आफरीन मुजाहिद शेख वय 31 वर्षे, धंदा घरकाम रा. कनकुरीरोड, पूनमनगर, शिर्डी, ता. राहता जि. अहमदनगर

// विरूध्द //

गैरअर्जदार - निरंक

प्रकरण - बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट VIII 1827 अन्वये लिगल हेअरशिप सर्टिफिकेट मिळणेबाबत.

सर्व जनतेस कळविण्यात येते उपरोक्त अर्जदारांनी या न्यायालात ॲड. आसिफ आय. शहा रा. लासूर स्टेशन, ता. गंगापूर यांच्या मार्फत बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट VIII 1827 अन्वये लिगल वारस प्रमाणपत्र मिळणेकामी अर्ज सादर केला की, अर्जदार क्रं. 1 ते 8 हे वरील नमुद ठिकाणचे कायमस्वरूपी राहणारे असून अर्जदार क्रं. 1 ते 4 हे आपसात सख्खे भाऊ व विवाहीत बहिणी आहे. तसेच अर्जदार क्रं. 5 ही अर्जदार क्रं. 1 ते 4 यांची वहिणी म्हणजेच भावाची पत्नी असून अर्जदार क्रं. 6 ते 8 हे अर्जदार क्र. 5 यांचे मुले व विवाहीत मुलगी आहे. अर्जदार क्रं. 1 ते 4 यांचे वडील व अर्जदार क्रं. 5 हिचे सासरे आणि अर्जदार क्रं. 6 ते 8 यांचे आजोबा नामे नसिर शेख रहीम हे दिनांक 05/01/2021 रोजी मौजे लासूर स्टेशन, ता. गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) येथे मयत झाले आहे. तसेच अर्जदार क्रं. 1 ते 4 यांची आई व अर्जदार क्रं. 5 हिची सासू व अर्जदार क्रं. 6 ते 8 यांची आजी नामे शमा नसिर शेख ह्या दिनांक 19/08/2024 रोजी मौजे सिरसाठ गल्ली, लासूर स्टेशन, ता. गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) येथे मयत झालेली आहे. तसेच अर्जदार क्रं. 1 ते 4 यांचा भाऊ व अर्जदार क्रं. 5 यांचे पती आणि अर्जदार क्रं. 6 ते 8 यांचे वडील नामे सलीम नसिर शेख दिनांक 27/11/2001 रोजी मौजे लासूर स्टेशन, ता. गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) येथे मयत झालेले आहे. त्यामुळे मयत नसिर शेख रहीम यांना अर्जदार क्रं. 1 व 2 मुले असून अर्जदार क्रं. 3 व 4 विवाहीत मुली आहे. तसेच अर्जदार क्रं. 5 ही सुन असून अर्जदार क्रं. 6 व 7 नातु असून अर्जदार क्रं. 8 ही विवाहीत नात या नात्याने कायदेशीर वारसदार असून अर्जदार क्रं. 1 ते 8 यांच्या व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारसदार नाही. मयत नसिर शेख रहीम यांच्या मृत्युमुळे अर्जदारांना शासकिय, निमशासकिय व इतर कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने अर्जदारांनी सदरचा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला असून वारस प्रमाणपत्राची मागणी केलेली आहे. सबब सदर प्रकरणी कोणाचाही कोणत्याही प्रकारचा आक्षेप किंवा उजर असल्यास त्यांनी प्रस्तुत जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून 30 दिवसांच्या आत या न्यायालात नोंदवावा. त्यानंतर आलेल्या उजर, आक्षेपाचा विचार केला जाणार नाही व अर्जदारांच्या मागणीप्रमाणे त्यांच्या हक्कात वारस प्रमाणपत्र देण्यात येईल करीता जाहीर प्रगटन.

आज दिनांक 4/07/2026 रोजी माझ्या सहिने व या न्यायालयाच्या शिक्कयानिशी दिले.

आदेशावरून

लिपीक | सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय क.स्तर गंगापूर